CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २९० | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



शिवदेवाने संपूर्ण भारतात आपले शाश्वत रूप स्थापित केले आहे (उदाहरणार्थ- पूर्वेला महाकाली, पश्चिमेला गणपती, दक्षिणेला कैलासपती शिव आणि उत्तरेला भगवान विष्णू). संपूर्ण भारतात देवाप्रती भक्तीची भावना जागृत होत आहे. देशभरातील लाखो मंदिरांमध्ये देवाची पूजा अखंडपणे सुरू आहे.

**अशोक सिंघल**
विश्व हिंदू परिषदेचे पूर्व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष तथा रामजन्मभूमी आंदोलनाचे प्रभारी

## आज ऋषिपंचमी



नरकेसरी बॅरिस्टर मो. वा. अभ्यंकर यांची आज जयंती

# भारत हे हिंदू राष्ट्रच; घोषणेची गरज नाही

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन ● संघ शताब्दीनिमित्तच्या त्रिदिवसीय व्याख्यानमालेचा समारोप

◆ **नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

व्यक्तीनिर्माण आणि चारित्र्यनिर्माण, समाजसंघटित झाला तर परिवर्तन आपोआप येईल आणि हिंदुस्थान हे हिंदू राष्ट्र आहे, या तीन अढळ सिद्धांतावर संघाचे काम सुरू असून अन्य, भूमिकांत कालानुरूप बदल झाला, तरी या भूमिकांत कधीच बदल होणार नाही, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी गुरुवारी येथे केले. भारत हिंदूराष्ट्र घोषित करण्याचे कारण नाही, ते हिंदूराष्ट्रच आहेच असा आश्वासक निर्वाळाही त्यांनी दिला.

रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित त्रिदिवसीय व्याख्यानमालेचे तिसऱ्या आणि अंतिम सत्रात जिज्ञासूच्या विविध शंकाचे समाधान करताना डॉ. भागवत बोलत होते. व्यासपीठावर संरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे उत्तर क्षेत्र संघचालक पवन जिंदल आणि दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल उपस्थित होते. संघावर होत असलेले आरोप आणि आक्षेप यांचे मुद्देसूद निराकरण डॉ. भागवत यांनी अडीच तासांच्या आपल्या उद्‌बोधनात केले.



भारत हे हिंदू राष्ट्र आहेच, त्यामुळे ते घोषित करण्याचे कारण नाही. हे जो मान्य करेल त्याचा फायदा होईल आणि जो मान्य करणार नाही, त्यांचे नुकसान होईल.

संविधानसंमत आरक्षणाला संघाचा पाठिंबा आहे, तसा प्रस्तावही संघाने पारित केला आहे, याकडे लक्ष वेधत डॉ.भागवत म्हणाले की, आरक्षणाचा विचार तर्कातून नाही, तर संवेदनेतून केला पाहिजे. तरच आम्ही आरक्षणाची गरज आणि महत्त्व समजू शकू, त्या लोकांनी हजार वर्षे अन्याय सहन केला आहे, त्यामुळे त्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण आणखी काही वर्षे थोडा त्रास सहन करायला हरकत नाही. आपल्याला आता आरक्षण नको, असे त्या समाजातील शेवटची व्यक्ती म्हणत नाही, तोपर्यंत आरक्षण कायम राहिले पाहिजे.

भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषा या राष्ट्रभाषा आहेत, असे एका प्रश्नावर स्पष्ट करीत डॉ. भागवत म्हणाले की, आपल्या देशातील सर्व भाषा या राष्ट्रभाषा असल्या तरी त्यातील एक भाषा ही व्यवहारभाषा असली पाहिजे. मातृभाषा चांगली आली पाहिजे, सोबतच आपल्या प्रांतातील भाषाही आपण शिकली पाहिजे. मात्र, भाषेच्या मुद्यावरून संघर्ष होणे योग्य नाही.

भारत हा बुद्धाचा देश असला, तरी इतर देश बुद्धाचे नाहीत. त्यामुळे भारत हा शांततेला प्राधान्य देत आला आहे. संरक्षणासाठी शस्त्रसज्ज असणे गरजेचे आहे. आरक्षणावर बोलताना मोहनजी म्हणाले की, आता आपल्याला आरक्षणाची गरज नाही, असे लाभार्थ्यांना वाटत नाही तोपर्यंत आरक्षण असण्याला हरकत नाही. आरक्षण हा खरे तर एक संवेदनशील मुद्दा आहे. तळागाळातील घटकांचा विकास व्हावा, असा दृष्टिकोन दीनदयालजी यांचा होता. त्यामुळे वरच्या घटकांनी त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. घटनेने जे आरक्षण दिले आहे त्याला संघाचा सदैव पाठिंबा राहिलेला आहे. कधीतरी जाती-आधारित व्यवस्था समाजात होती, पण आज ती अस्तित्वात नाही. जाती व्यवस्थेबाबत पुराणातील दाखल्यांचा हवाला दिला जातो, पण पुराण अथवा शास्त्रांमध्ये जे लिहिले जाते त्यानुसार लोक वागतात, असे नाही.

आज धर्मपरिवर्तन आणि घुसखोरीमुळे लोकसंख्येच्या रचनेत बदल होताना दिसून येत आहे. हा गंभीर धोका असून त्यावर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे. देशातील नोकऱ्या घुसखोरांना मिळता कामा नये. ही केवळ सरकारची जबाबदारी नसून नागरिकांनीही सजग राहणे आवश्यक असल्याचे सांगत डॉ. मोहनजी पुढे म्हणाले की, धर्म हा आपआपल्या आवडीचा विषय आहे. आपण सर्व भारतीय आहोत. त्यामुळे हिंदू-मुस्लिम एकतेबाबतच का बोलले जाते? या देशात राहणारे सर्वजण एक आहोत. या देशात इस्लाम राहू नये, अशी शिकवण हिंदू देत नाही. अखंड भारत हे आपल्या जीवनाचे सत्य आहे आणि आपली संस्कृती आणि आपले पूर्वज एकच आहेत, हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे. ◂(वृत्तसंस्था)

### काशी आणि मथुरेसाठी हिंदू समाजाचा आग्रह

» संघ कोणत्याही आंदोलनात सहभागी होत नाही, याला अपवाद फक्त रामजन्मभूमी आंदोलनाचा होता, संघ पूर्ण ताकदीने त्या आंदोलनात सहभागी झाला, आणि त्यामुळेच ते आंदोलन यशस्वी झाले, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, अयोध्येनंतर काशी आणि मथुरा मंदिरांच्या मुक्तीचा हिंदू समाजाचा आग्रह आहे. काशी आणि मथुरेच्या आंदोलनात संघ सहभागी होणार नाही, पण संघाचे स्वयंसेवक सहभागी होऊ शकतात. अयोध्या, मथुरा आणि काशी यातील दोन जन्मभूमी तर एक निवासभूमी आहे. ■

### मुस्लिमांच्या नावांनाही हरकत नाही

रस्ते आणि ठिकाणांना मुस्लिमांची नावे असण्याला कुणाचीही हरकत नाही. पण, परकीय आक्रमकांची नावे नकोत. माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम, रामप्रसाद बिस्मिल यांच्या नावाला कुणाचाही विरोध असण्याचे मुळीच कारण नाही. ■

### ...तरच संस्कृती वाचेल

प्रत्येक कुटुंबात तीन अपत्य हवे आहेत. यामुळे देशाची लोकसंख्या नियंत्रणात राहील आणि संस्कृतीचे रक्षणही होईल. तसेच लोकसंख्येचा विचार करताना आपल्याला संसाधनाचाही विचार करावा लागणार आहे, असे डॉ. मोहनजी म्हणाले. ■

## मोठ्या प्रमाणातील पर्यटकांमुळे हल्ल्यासाठी बैसरनची निवड

◆ **नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

पर्यटकांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती आणि तुलनेत वेगळे पडले असल्याने जम्मू-काश्मिरातील पहलगाम येथे झालेल्या भीषण हल्ल्यासाठी दहशतवाद्यांनी नयनरम्य बैसरन कुरणाची निवड केली, असे राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने गुरुवारी सांगितले.

२२ एप्रिल रोजी झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्यात तीन दहशतवाद्यांचा थेट सहभाग होता. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, असे एनआयएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या एनआयएच्या प्रवक्त्याने सांगितले की, हल्ला झाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा बचावासाठी किती वेळात येतील, याचा विचार करून लक्ष्य निवडण्यात आले.

पर्यटकांची संख्या जास्त असल्याने आणि तुलनेत वेगळे असल्याने सुरक्षा दलांकडून प्रतिसाद मिळण्यास वेळ लागेल, हे लक्षात घेतल्यानंतर दहशतवाद्यांनी बैसरनची लक्ष्य म्हणून निवड केली. या लक्षित हल्ल्यात दहशतवाद्यांनी 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पहलगामजवळील कुरणात, भोजनालयांत फिरणाऱ्या, पोनी राईड करणाऱ्या किंवा कुटुंबीयांसोबत पिकनिक करणाऱ्या पुरुष पर्यटकांना ठार मारले.

मागील महिन्याच्या अखेरीस सशस्त्र दलांनी मारलेल्या पाकिस्तानातील तीन दहशतवाद्यांना आश्रय दिल्याबद्दल एनआयएने जूनमध्ये दोन जणांना अटक केली. अटक केलेल्या बटकोट येथील परवेझ अहमद जोथार आणि पहलगाम येथील बशीर अहमद जोथार या दोघांनी तिन्ही हल्लेखोर पाकिस्तानी असल्याचे आणि ते लष्कर-ए-तोयबाशी संबंधित असल्याची कबुली दिली होती. पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांनी ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर अचूक हल्ले केले. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### विरार इमारत दुर्घटनेतील मृतांची आकडा १७

**पालघर** : जिल्ह्यातील विरार येथील चार मजली इमारत दुर्घटनेतील मृतांचा आकडा १७ झाला आहे. गुरूवारी आणखी दोन मृतदेह ढिगाऱ्याखाली सापडले. नऊ जण गंभीर जखमी असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मृतकांच्या नातेवाईकांना पाच लाखांच्या मदतीची घोषणा राज्य सरकारने केली आहे. इमारतीचे बांधकाम अनधिकृत असल्याचे आढळल्याने बिल्डरला पोलिसांनी अटक केली आहे.

### युक्रेनच्या राजधानीवर रशियाचा भीषण हल्ला

**कीव** : युक्रेनची राजधानी कीव शहरावर गुरुवारी रशियन लष्कराने भीषण हल्ले केले, यात तीन मुलांसह १८ नागरिक ठार झाले असून ११८ पेक्षा अधिक जखमी आहेत. ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्याने निवासी इमारती जमीनदोस्त झाल्या, तर पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. हल्ल्यामुळे हजारो नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. कीव शहर प्रशासनाचे प्रमुख तैमूर तकाचेन्को यांनी सांगितले की गुरुवारी पहाटे कीव शहरावर रशियच्या हवाई दलाने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्यात अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या. बचाव पथकाने ढिगाऱ्यातून १८ मृतदेह बाहेर काढले, तर ११८ पेक्षा अधिक नागरिकांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात भरती केले. ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा शहराच्या मध्यभागी करण्यात आला. आतापर्यंत हा भाग सुरक्षित मानला जात होता, परंतु पहिल्यांदाच रशियन लष्कराने येथे हल्ले केल्याने नागरिकांमध्ये मोठी दहशत आहे.

### पंतप्रधान मोदी, जिनपिंग रविवारी भेटणार

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीची तारीख निश्चित झाली आहे. दोन्ही नेते शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन अर्थात् एससीओ शिखर परिषदेच्या निमित्ताने तियानजिनमध्ये रविवारी ३१ ऑगस्ट रोजी भेटणार आहेत. जपानचा दोन दिवसांचा दौरा संपल्यानंतर, पंतप्रधान मोदी जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून एससीओ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनमध्ये असतील. त्याचवेळी त्यांची भेट जिनपिंग यांच्याशी होणार असून दोन्ही नेते द्विपक्षीय संबंधावर चर्चा करणार आहे. चीनचे भारतातील राजदूत झू फेहोंग म्हणाले की, एससीओ शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदींचा तियानजिन दौरा दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा आणि विकासाला एक नवीन चालना देईल. ही भेट यशस्वी करणे खूप महत्वाचे आहे, आम्ही या भेटीला खूप महत्त्व देतो. गेल्या सात वर्षांत मोदींचा पहिला चीन दौरा असेल.

# मनोज जरांगे यांचे आज मुंबईत उपोषण

## शिवनेरीवरुन हजारोंच्या संख्येने मराठा बांधव आझाद मैदानाच्या दिशेने

◆ **मुंबई, २८ ऑगस्ट**



मराठा आरक्षणासाठी आरपारची लढाईसाठी सज्ज झालेले मनोज पाटील जरांगे यांचा ताफा शिवनेरी येथून मुंबईकडे रवाना झाला आहे. शिवरायांचे जन्मस्थळ शिवनेरी किल्ल्यावर माथा टेकवत मराठा बांधव आझाद मैदानाकडे रवाना झाले. २९ ऑगस्टपासून जरांगे मुंबईत उपोषणाला बसणार आहेत. त्यांना अटी शर्थीसह उपोषणाची परवानगी दिली आहे. गुरुवारी पहाटे मोर्चाचे जुन्नर येथे आगमन झाले.

दरम्यान आझाद मैदानावर राज्यातील मराठा समाजाचे आंदोलक गुरूवारीच दाखल झाले असून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. तसेच मुंबईतील काही मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

**शनिवारपासून ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण आंदोलनाला सुरूवात करताच आता ओबीसी महासंघानेही शनिवारपासून साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेतला. नागपुरात ओबीसी नेत्यांची बैठक झाली. ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांनी आंदोलनाचा निर्णय जाहीर केला. मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, अशी आमची मागणी आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नसल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे आणि आम्ही त्याचे स्वागत करतो. पण, वेळ आल्यास आम्ही मुंबईकडे कूच करण्यास सज्ज आहोत, असे तायवाडे यांनी स्पष्ट केले. ◂(वृत्तसंस्था)

### मराठा समाजाचे प्रश्न आम्हीच सोडविले : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

लोकशाहीत आपली मते मांडण्याचा अधिकार सर्वांना आहे. लोकशाही पद्धतीने होणाऱ्या आंदोलनाला आम्ही सामोरे जाऊ. असे असले तरी मराठा समाजाचे प्रश्न आम्हीच सोडविले, इतर कुणीही नाही. आम्ही मराठा समाजाला दिलेले आरक्षण कोर्टात टिकेल आणि आम्हीच हा प्रश्न सोडवू, असे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरांगेंच्या आंदोलनाबाबत काढले. मराठा आणि ओबीसी समाजासाठी काम करू. मराठ्यांना दहा टक्के आरक्षण दिले आहे. मी आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना आरक्षणाचा प्रश्न सोडविले आहेत. आता म्हणतात की मराठ्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण द्या, पण ओबीसीत आधीच ३५० जाती सामाविष्ट आहेत. मराठा समाजाच्या नेत्यांनी मराठा समाजाच्या हिताचा अभ्यास करून मागणी केली पाहिजे. हे आंदोलन राजकीय होत असल्याचे दिसत आहे. काही राजकीय पक्ष आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत पण त्यात ते यशस्वी होणार नाहीत. उलट, त्यांचे नुकसानच होईल. कोणतेही आंदोलन झाले तरी आम्ही त्याला सामारे जाऊ पण आंदोलन लोकशाहीच्या चौकटीबाहेर जाता कामा नये, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. ■

### आरक्षण घेऊनच माघारी परतणारः जरांगे पाटील

फडणवीसजी , तुम्ही आमचे वैरी नाही किंवा शत्रू नाही. आमचा लढा फक्त गोरगरीब मराठ्यांसाठी आहे. पण, प्रत्येकवळे आमची थट्टा केली जाते. समाजाचा अपमान केला जातो. पण, यावेळी मागे हटणार नाही. गोळ्या झाडल्या तरी चालतील. आरक्षण घेऊनच माघारी परतणार, असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. शिवनेरीवर माथा टेकविल्यानंतर गडाच्या पायथ्याशी पत्रकारांशी ते बोलत होते. एका दिवसाचे आंदोलन कसे शक्य आहे ? ही तर आमची चेष्टा आहे. तसे असेल तर आमच्या मागण्याही एका दिवसात पूर्ण करा. इथूनच माघारी फिरतो. मुख्यमंत्र्यांनी आरक्षण दिल्यास मराठे तुमचे उपकार मरेपर्यंत विसरणार नाहीत, असे जरांगे यावेळी म्हणाले. ■

## जरांगेंच्या आंदोलनामागे राजकीय पाठबळ

### मुख्यमंत्र्यांचा विरोधकांवर निशाणा

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ ऑगस्टः**

लोकशाही मार्गाने आणि न्यायालयाने घालून दिलेल्या अटीनुसार आंदोलन करण्याला कोणाचाही विरोध नाही. मात्र या आंदोलनासाठी रिसोर्सेस उभे करणारे कोण आहेत? हे पाहायला मिळत आहे. काही राजकीय पक्ष हे त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यामध्ये त्यांचे नुकसान होईल, फायदा होणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी गुरुवारी विरोधकांना दिला.



ऐन गणेशोत्सवाची धामधूम सुरु असताना मनोज जरांगे- पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा शुक्रवारी आझाद मैदानात दाखल होत असल्याने मुंबईत अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या पाश्वभूमीवर पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले की,' यापूर्वी काय झालं हे तुम्ही सर्वांनी बघितलेले आहे. सरकार मराठा, ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही, मराठा समाजाला आरक्षण दिले आहे, ते कोर्टातही टिकले आहे. कोणाचेही आरक्षण काढून घेणार नाही, लोकशाहीच्या चौकटीबाहेर कुणीही जाऊ नये.अशी आमची इच्छा आहे. मराठा समाजाच्या नेत्यांनी अभ्यास करून मागणी करावी, असे सांगून ते म्हणाले की मराठा आंदोलनासाठी जे नियम निकष केले आहेत, त्या नियमानुसार हे आंदोलन झाले तर आम्हाला काही अडचण नाही. आज आपल्याला माहिती आहे की, जवळपास साडेतीनशे जाती या ओबीसीमध्ये आहेत. आणि समजा आता आपण मेडिकलच्या प्रवेशाबाबत बघितलं तर ओबीसीचा कटऑफ हा एसीबीसीच्यावर आहे. एसीईबीसीचा कट ऑफ हा इडब्ल्यूएसच्यावर आहे, त्यामुळे या मागणीमुळे नेमकं किती भले होणार आहे?, याची मला कल्पना नाही. आपण जर आकडेवारी नीट बघितली तर मराठा समाजाच्या हिताचे काय आहे, हे आपल्या लक्षात येईल, असे सांगून फडणवीस म्हणाले,' या आंदोलनासाठी कोणाचे रिसोर्सेस मिळत आहेत, हे उघड आहे.

# देशातील ५२ टक्के नागरिक सरकारवर समाधानी

## इंडिया टुडे-सी व्होटरचे सर्वेक्षण

◆ **नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

लोकसभा निवडणुकीला एक वर्ष झाले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकार म्हणून रालोआची कामगिरी कशी राहिली याचे सर्वेक्षण इंडिया टुडे-सी व्होटरने केले. १ जुलै ते १४ ऑगस्ट या कालावधीत झालेल्या सर्वेक्षणात सरकारच्या कामगिरीवर समाधानी असल्याचे ५२ टक्के नागरिकांनी सांगितले.



पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांची कामगिरी कशी राहिली, असा प्रश्न नागरिकांना विचारण्यात आला. नरेंद्र मोदी यांची कामगिरी अतिशय चांगली असल्याचे ३४ टक्के लोकांनी सांगितले. चांगली कामगिरी असल्याचे २४ टक्के लोकांनी सांगितले. तर १३ टक्के लोकांनी खराब आणि १४ टक्के नागरिकांना अतिशय खराब असल्याचे सांगितले.

५२ टक्के लोकांनी रालोआ सरकारची कामगिरी समाधानकारक किंवा अतिशय चांगली असल्याचे सांगितले. २७ टक्के लोकांनी समाधानी नसल्याचे स्पष्ट केले. रालोआ सरकारचे मोठे यश कोणते, असा प्रश्न लोकांना विचारण्यात आला. त्यावर १७ टक्के लोकांनी राममंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडोर मोठे यश असल्याचे सांगितले. १२ टक्के लोकांनी ऑपरेशन सिंदूर, १० टक्के लोकांनी पायाभूत विकासात रालोआ सरकारने मोठे यश मिळाल्याचे सांगितले. ९ टक्के लोकांनी काश्मिरातील कलम ३७० निष्प्रभ करणे, ७ टक्के नागरिकांनी कल्याणकारी योजना आणि ६ टक्के लोकांनी भ्रष्टाचारमुक्त सरकार हे मोठे यश असल्याचे सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### बेरोजगारी, महागाईच्या मुद्यावर अपयशी

रालोआ सरकारचे अपयश कोणते असा प्रश्नही नागरिकांना विचारण्यात आला. यावर लोकांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. बेरोजगारी हे सरकारचे मोठे अपयश असल्याचे २७ टक्के लोकांनी सांगितले. महागाईच्या मुद्यावर सरकार अपयशी ठरल्याचे २१ टक्के लोकांनी सांगितले, तर ७ टक्के लोकांनी आर्थिक विकास, ६ टक्के लोकांनी जातीय हिंसाचार आणि अल्पसंख्यकांमधील भीती तसेच सरकार महिला सुरक्षेत अपयशी ठरल्याचे ५ टक्के लोकांनी सांगितले.

# शिंदे गटाचे आमदार खताळ यांच्यावर भ्याड हल्ला

## ● मंत्री विखे-पाटलांनी केला निषेध; असे हल्ले करून महायुतीचा आत्मविश्वास कमी होणार नाही

**संगमनेर, दि.२८ ऑगस्ट-**

शिवसेना शिंदे गटाचे आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. संगमनेर फेस्टिव्हलच्या उद्घाटनावेळी हा हल्ला झाल्याची माहिती आहे. या कार्यक्रमात गेले असता अमोल खताळ यांच्याशी हात मिळवण्यासाठी एक तरुण आला आणि यावेळी त्याने हल्ला केला असल्याचे समजते. मात्र, या हल्ल्याचे कारण अद्याप समजू शकले नाही. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे.



एका वृत्तवाहिनीशी बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मी या भ्याड हल्ल्याचा निषेध करतो. हा हल्ला जो कोणी केला आहे, जे कोणी गुंड प्रवृत्तीचे लोक होते व ते कोणाकडून पुरस्कृत होते याची चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु, अशा प्रकारचा भ्याड हल्ला करून महायुतीच्या आमदारांचा कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास कमी होईल असे वाटत असेल कोणाला तर मला वाटते हा त्यांचा गैरसमज आहे आणि तो गैरसमज सुद्धा दूर करायला वेळ लागणार नाही. शेवटी कायदा हातात घेणे उचित नाही, असे विखे पाटलांनी म्हटले आहे. काही लोकांनी लोकशाहीच्या कौलाल मान्य केले पाहिजे. आता जर त्यांना लोकशाही मान्य नाही, ठोकशाहीच मान्य असेल तर मला वाटते त्याच पद्धतीने तालुक्यातील कार्यकर्ते उतरतील, असा इशारा विखे पाटील यांनी दिला आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांचा अप्रत्यक्ष रोख हा काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर असल्याचे समजते. तसेच गेल्या काही दिवसांपासून संगमनेरच्या राजकारणात बाळासाहेब थोरात आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. त्यातूनच हा हल्ला झाला असावा का, अशी चर्चा सध्या सुरू झाली आहे. या घटनेनंतर संगमनेरमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. अमोल खताळ यांचे कार्यकर्ते ज्या ठिकाणी कार्यक्रम होता व जिथे हल्ला झाला त्या मालपानी लॉनच्या ठिकाणी मोठ्या संख्येने जमले आहेत. अमोल खताळ येथील गणेशोत्सवासाठी आले होते. यावेळी एक तरुण हात मिळवण्याच्या बहाण्याने आला आणि त्याने हल्ला केला. यावेळी खताळ यांचे जे सुरक्षारक्षक होते त्यांनी वेळीच त्याला रोखले आणि त्या तरुणाला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# पंढरपूर तालुक्यातील मराठा बांधव मुंबईकडे रवाना

## आ. अभिजीत पाटील समर्थकांसह सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ ऑगस्ट-**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्यांवरुन मुंबई येथे मराठा समाजाचे आंदोलनवीर मनोज जरांगे पाटील हे येत्या शुक्रवारी (ता.२९) पासून आमरण उपोषण करणार आहेत. त्यासाठी जरांगे पाटील हे सध्या मुंबईच्या दिशेने निघालेले आहेत. या आंदोलनात जरांगेपाटील यांना पाठिंबा देण्यासाठी माढ्याचे आमदार अभिजीत पाटील तसेच पंढरपूर शहर आणि तालुक्यातून मोठ्या संख्येने मराठा बांधव गुरुवारी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपतींच्या पुतळ्याला अभिवादन करुन मुंबईच्या दिशेने रवाना झाले.

मराठा आरक्षणाच्या लढाईसाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. येत्या शुक्रवार (ता.२९) पासून ते मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार आहेत. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळावे या प्रमुख मागणींसह अन्य मागण्या मान्य होईपर्यंत आपला आंदोलनाचा लढा सुरुच राहणार आहे. त्यासाठी प्रसंगी आपणाला प्राण द्यावे लागले तरी आपण मागे पुढे पाहणार नाही. समाजाच्या आरक्षण लढ्यासाठी शासनाकडून आपल्या सर्वच्यासर्व मागण्या मान्य होई पर्यंत आपण मागे हटणार नाही. आपण आपले आमरण उपोषण मुंबई येथील आझाद मैदान येथे सुरुच ठेवणार अशी भिष्मप्रतिज्ञा देखील यावेळी जरांगे पाटील यांनी केली आहे. दरम्यान जरांगे पाटील हे बुधवारीच (ता.२७) आंतरवालीसराटी येथून मुंबईकडे जाण्यासाठी मार्गस्थ झालेले आहेत.



### आमदार अभिजीत पाटील म्हणतात

मनोज जरांगे पाटील यांचा मराठा समाजाच्या हक्काच्या आरक्षणासाठीचा जो लढा आहे त्यासाठी संपुर्ण महाराष्ट्र महासागर म्हणून मुंबईच्या दिशेने निघालेला आहे. मी देखील त्यातील एक कार्यकर्ता म्हणून तसेच माझ्या मतदार संघाचा प्रतिनिधी म्हणून माढा तालुका, पंढरपूर शहर आणि तालुक्यातील समाज बांधवां सोबत मी देखील मुंबईच्या दिशेने निघालेलो आहे. मनोज जरांगे पाटील यांना साथ देण्यासाठी माढा, पंढरपूर या दोन्ही तालुक्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव या लढ्यात सहभागी झालेले आहेत. आम्ही सर्वजण या लढ्यात मनोज जरांगे पाटील यांच्या समवेत सामिल आहोत. आमदार म्हणून निवडून आल्यानंतर पहिल्या अधिवेशनात आपण मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलना बाबत शासनाने ठोस भूमिका घ्यावी अशी विधानसभेत मागणी केलेली होती. दरम्यान गेल्या चार महिन्यापासून २९ ऑगस्टला आम्ही मुंबई येथे आरक्षणाच्या लढ्यासाठी येतो आहोत असा अल्टिमेटम जरांगे पाटील यांनी शासनाला दिलेला होता. मात्र शासनाने त्याकडे गांभिर्याने पाहिले नाही. त्यामुळे आज सणासुदीच्या दिवशी आम्हाला मुंबईकडे जावे लागत आहे. अजून देखील वेळ गेलेली नाही. शासनाने मराठा आरक्षणाच्या पुर्ततेसाठी विशेष अधिवेशन बोलावून मराठा आरक्षणा संदर्भात योग्य तोडगा काढावा अशी देखील मागणी यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी केली.

त्यांच्या या आंदोलनासाठी गेल्या काही दिवसांपासून येथील मराठा क्रांतीमोर्चाच्या आयोजकांकडून आंदोलनाची तयारी केली जात आहे. यासाठी वारंवार बैठकांचे देखील आयोजन करण्यात आलेले होते. त्या बैठकांमधून अनेक मराठा समाजातील बांधवांवर मराठा आंदोलकांच्या जेवणाची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, मुक्कामाच्या ठिकाणी मार्गदर्शन आदी विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या देखील देण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे पंढरपूर शहर आणि तालुक्यातून जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अनेक मराठा बांधवांनी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करीत गुरुवारी सकाळी मुंबईकडे कुच केली. या मध्ये माढ्याचे आमदार अभिजीत पाटील, येथील सामाजिक कार्यकर्ते नागेश भोसले देखील सहभागी झालेले होते.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आरक्षण मिळेपर्यंत जरांगेपाटील यांच्या आंदोलनात सहभागी होण्याचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या समोर निर्धार करुन मराठा बांधव मुंबईकडे रवाना झाले. यावेळी मराठा समाजातील युवकांकडून कोण म्हणते देत नाही, आरक्षण घेतल्या शिवाय रहात नाही. या सरकारचे करायंच काय, खाली डोकेवरती पाय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, तुमचे आमचे नाते काय, जय जिजाऊ, जय शिवराय अशा घोषणांचा जयघोष करुन मराठाबांधव मुंबईकडे रवाना झाले.

---

## महत्त्वाचे...



### अनिल टेकळे यांना अमेरिकेत ८० लाखांचे वार्षिक पॅकेज

**सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॉलेजला अभिमानाचा क्षण**

**पंढरपूर, दि. २८ ऑगस्ट-**

सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर येथील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे २०१५ बॅचचे विद्यार्थी अनिल अरुण टेकळे यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश मिळवले आहे. सध्या ते इनोव्हा सोलूशनस या आंतरराष्ट्रीय आयटी कंपनीत सिनियर सॉप्टवेअर इंजिनियर म्हणून कार्यरत आहेत. अनिल यांना नुकतीच अमेरिकेतील टेम्पा, फलोरीडा येथे नवीन नोकरीची संधी मिळाली असून, त्यांचे वार्षिक पॅकेज ८० लाख ( डॉलर ९२,०००) इतके आहे. ही कामगिरी त्यांच्या मेहनत, कौशल्य आणि सातत्याचा परिपाक आहे. सिंहगड महाविद्यालयातून पदवी घेतल्यानंतर, अनिल यांनी विविध तांत्रिक कौशल्ये आत्मसात करत आपली कारकीर्द घडवली. आपल्या अथक प्रयत्नांमुळे त्यांनी हे यश संपादन केले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे महाविद्यालयाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उजळले आहे. सिंहगड परिवाराकडून अनिल व त्यांच्या पत्नी महाविदयालयाची माजी विदयार्थीनी स्वप्ना गोड यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ.स्वानंद कुलकर्णी, ट्रेनींग प्लेसमेंट ऑफीसर डॉ.समीर कटेकर, डॉ. अनिल निकम, डॉ.संपत देशमुख यांनी त्यांच्या परिवारास शुभेच्छा दिल्या.



### श्री समर्थ तरुण मंडळासमोर ज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांचे ढोल वादन

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

शहरातील लकी चौक मधील श्री समर्थ तरुण मंडळाच्या श्री समर्थ गणपती समोर ज्ञान प्रबोधनी च्या विद्यार्थ्यांनी ढोल ताशा वादन करून नागरिकांची मने जिंकली.दरवर्षी गणेशोत्सवामध्ये सोलापूर शहरातील विविध गणेश मंडळांसमोर ज्ञान प्रबोधिनी प्रशालीतील विद्यार्थ्यांच्या ढोल ताशा पथकाकडून वादन करण्यात येऊन श्री गणेशाचे पूजन करण्यात येते यंदाच्या वर्षीच्या गणेशोत्सवाच्या मंडळांसमोरील ढोल ताशा वादनाला गुरुवारी सुरुवात झाली शहरातील लकी चौकातील श्री समर्थ तरुण मंडळाच्या श्री समर्थ गणपती समोर ढोल ताशा वादन करून टिपरी नृत्य तसेच विद्यार्थ्यांनी एकावर एक उभे राहून मनोरे सादर करी गणेशाला मानवंदना दिली या उपक्रमाची अधिक माहिती ढोल ताशा पथकाचे प्रमुख विलास यादव यांनी माहिती दिली. ढोल ताशा वादनानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते श्री समर्थ गणपतीची आरती करण्यात येऊन गणेशाच्या जयघोष करण्यात आला.याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष रोहित नलावडे भाऊसाहेब रोडगे मेघराज पसारे बापू रोडगे सचिन बावळे दादू रोडगे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### खते व औषधे कंपनीच्या मालकाची, जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. २८ ऑगस्ट-**

येथील खते व औषधे कंपनीच्या मालकाची जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३ व ७ खत नियंत्रन अधिनियम कायदा १९८५ चे कलम १९(१)(र) आरोपामधुन निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.सदर प्रकरणातील फिर्यादी हा सोलापुर जिल्ह्यासाठी फर्टिलायझर इन्स्पेक्टर कम डिस्ट्रीक्ट क्वॉलिटी कंन्ट्रोल इल्पेक्टर म्हणून कार्यरत होता. फिर्यादी हा आरोपीच्या कंपनीमध्ये तपासणीसाठी आला. त्यांनी आवश्यक ते नमुने घेतले व ते नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविले. त्यानंतर प्रयोगशाळेकडील अहवाल आलेनंतर आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे फर्टिलायकर इन्स्पेक्टर यांची तसेच इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. परंतु सदर फिर्यादी पक्षानी यातील आरोपीवर ठेवलेला आरोपाची शाबिती केली नाही. याउलट आरोपीच्या वकिलांनी यातील फिर्यादीने तपासणीसाठी नमुना घेतेवेळी असलेल्या त्रुटी नियमांमधील असलेल्या त्रुटी तसेच फिर्यादीच्या झालेल्या उलट तपासतील विसंगत पण अशा बऱ्याच गोष्टी न्यायालयाच्या निदर्शनास आरोपी पक्षाने आणून दिल्या. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर झाली. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ॲड. एस.एम. गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन मे. न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने ॲड. एस एम गुंड व ॲड. व्ही.पी जाधव, ॲड. आर. आर. घोडके, ॲड. ए. एस.गुंड, ॲड. आर. के. ननवरे, ॲड. पी.ए. शेळवणे यांनी काम पाहिले.

### शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी

**सोलापूर दि.२८ ऑगस्ट-**

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ चे आयोजन शांघाई येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलला भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे. या स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी संबंधित कौशल्य स्पर्धा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्कील कौन्सिल, विविध औदयोगिक आस्थापना यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेचे जिल्हा, विभाग, राज्य तसेच देश पातळीवर आयोजन करुन निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत.

---

# पंढरपूर नगरपरिषद व पोलीस प्रशासनतर्फे पर्यावरणपूरक घरगुती गौरी-गणेश स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ ऑगस्ट-**

येथील पंढरपूर नगरपरिषद आणि पोलिस प्रशासन पंढरपूर यांच्या तर्फे पर्यावरणपूरक घरगुती गौरी, गणेश स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती येथील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. दरम्यान या स्पर्धेत शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे देखील आवाहन करीत चला, एकत्र येऊन साजरा करूया हरित व स्वच्छ पंढरपूरचा गणेशोत्सव असा देखील संदेश पंढरपूर शहरवासियांना त्यांनी दिला आहे.

या गौरी-गणेश स्पर्धे संदर्भात माहिती देताना पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले की, या स्पर्धेसाठी ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या कालावधी मध्ये सहभागी इच्छुकांना नोंदणी करता येणार आहे. या स्पर्धेची थीम पर्यावरणपूरक गणेशोत्सव,स्वच्छ -सुंदर हरित पंढरपूर ही आहे. या बरोबरच या स्पर्धेतील विजेत्यांसाठी मोठ्या रक्कमेची बक्षीसे देखील ठेवण्यात आलेली आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी क्युआर कोड टठ कोड स्कॅन करावा लागणार आहे.

### स्पर्धेतील महत्त्वाचे मुद्दे

पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट. प्लास्टिक व थर्माकोलमुक्त साहित्य. टाकाऊ पासून टिकाऊ. घरगुती कचरा व्यवस्थापन व इको-फ्रेंडली साहित्याचा वापर.

### विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे

या स्पर्धेतील विजेत्यांना मोठ्या रक्कमेची बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांक - सात हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र. व्दितीय क्रमांक - पाच हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र. तृतीय क्रमांक - तीन हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र.

### अधिक माहितीसाठी यांच्याशी साधावा संपर्क

या स्पर्धेत सहभागी होवू इच्छिणाऱ्या स्पर्धेकांनी स्पर्धेबद्दलच्या अधिक माहितीसाठी सविता देशमुख - ( मो.क्रं.८८३०६८४३८५) आणि अंजली काबुगडे- ( मो.क्रं.८४२२०१९०३३ ) यांच्याशी संपर्क साधावा. या शिवाय पंढरपूर नगरपरिषद कार्यालय ४०७५/अ, भादुले चौक, पंढरपूर येथे देखील प्रत्यक्ष संपर्क साधुन स्पर्धे विषयी माहिती घेण्याचे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

# मंगळवेढ्यातील मराठा पुढारी आंदोलनापासून दूर; चर्चेला उधाण

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. २८ ऑगस्ट-**



राज्यात मराठा आरक्षण मागणीसाठी उसळलेल्या आंदोलनाने उग्र वळण घेतले असताना मंगळवेढा तालुक्यातील अनेक मराठा पुढारी मात्र आंदोलनापासून कोसो दूर राहिल्याचे चित्र दिसत आहे.

समाजासाठी लढा देण्याऐवजी हे पुढारी सत्ताधाऱ्यांशी जवळीक साधून स्वतःच्या खुर्च्या व स्वार्थ जपण्यात अधिक रस दाखवत आहेत. एकीकडे आंदोलनात जीव धोक्यात घालून मराठा समाजातील तरुण रस्त्यावर लढत आहेत, तर दुसरीकडे तालुक्यातील भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत वगळता अन्य तथाकथित नेतेमंडळी समाजात एक चेहरा दाखवतात आणि सत्तेच्या गल्लीत दुसरा. या दुहेरी चेहऱ्याच्या राजकारणामुळे मराठा समाजात प्रचंड असंतोष निर्माण झाला असून लोकांमध्ये या पुढाऱ्यांविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

भैरवनाथ शुगर व अनिल सावंत यांनी मुंबईकडे जाणाऱ्या प्रत्येकाला नाष्टा, पाणी बॉटल बॉक्स, टोपी, गमजे आदी साहित्य गाडीसोबत दिले आहे. समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ठोस भूमिका घेणे, आंदोलनाला नैतिक व प्रत्यक्ष साथ देणे ही अपेक्षा असताना अनेक नेते फक्त आश्वासनांवर थांबले आहेत.

काहींनी तर उघडपणे आंदोलनास पाठिंबा देण्याचे टाळले असून, स्वार्थासाठी समाजाला विसरणारे हे पुढारी आता उघडे पडले आहेत अशा तीव्र प्रतिक्रिया जनतेकडून उमटत आहेत.

दरम्यान, आंदोलनाच्या निर्णायक टप्प्यावर तालुक्यातील नेतृत्वाचा अभाव जाणवत असून, मराठा समाजाच्या हक्काच्या लढ्यात पाठीशी उभे न राहणाऱ्या पुढाऱ्यांना आता जनता माफ करणार नाही असा सूर समाजातून उमटू लागला आहे.

गावागावांत चर्चा रंगली असून, समाजाशी विश्वासघात करणाऱ्यांना आता राजकारणातून हद्दपार करण्याची वेळ आली आहे, असे मत नागरिक मांडत आहेत. खऱ्या अर्थाने समाजाशी प्रामाणिक राहून, आंदोलकांसोबत खांद्याला खांदा लावून उभे राहणारे नवे नेतृत्व समाज शोधत आहे.

---



# उत्तम आहारामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण संतुलित ठेवता येते

## डॉ. गौरी कहाते यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

मासिक पाळीची स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी जागरूकता, योग्य माहिती, सुरक्षित उत्पादने आणि पायाभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रत्येक स्त्री सन्मानाने आणि निरोगीपणे मासिक पाळी व्यवस्थापित करू शकेल. केवळ घरकामाने व्यायाम होत नाही तर योगासने व सूर्यनमस्कार याचे महत्त्व आहे. उत्तम आहारामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण संतुलित ठेवता येते. शरीरात योग्य हिमोग्लोबिनचे प्रमाण असणे ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. गौरी कहाते यांनी केले.

संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त), सोलापूर संचालित वुमन डेव्हलपमेंट सेल व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी व प्रबोधन शिबिराच्या उदघाटन प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते.

यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, वुमन डेव्हलपमेंट सेलच्या प्रमुख डॉ. मंजू संगेपांग, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदी उपस्तिथ होते. यावेळी डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप भाषण डॉ. ऋतुराज बुवा यांनी केले. आयोजित हिमोग्लोबिन तपासणी शिबिरात १२५ मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. प्रा. डॉ. संगीता कामत, प्रा. डॉ. कुंडलकेश गायकवाड, प्रा. डॉ. वैशाली अचकनळी, प्रा. डॉ.आरती दिवटे, प्रा. डॉ. शीला रामपुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. नभा काकडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय नम्रता माने यांनी करून दिला. सूत्रसंचालन मानसी वाल्मिकी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. मंजू संगेपांग यांनी मानले.

# मराठा आरक्षणाकरिता मुंबईला सोलापूरकर रवाना

**भर पावसात मावळ्यांची मुंबईकडे आगेकूच**

**मोटरसायकल, कार, जीप, टेम्पो, ट्रक, ट्रॅक्टर, पाण्याचा टँकर ॲम्बुलन्स अशा वाहनांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदान मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातूनच नव्हे तर परराज्यातूनही मराठा समाज मुंबईच्या दिशेने रवाना होत आहे या आंदोलनात सहभागी होण्यासाठी गेल्या दोन दिवसापासून मराठा बांधव एकत्र येत मुंबईला जात आहेत. गुरुवारी सकल मराठा समाजाच्या वतीने माऊली पवार व अमोल शिंदे यांच्या बरोबरीने लाखो समाज बांधव सकाळी दहा वाजता मुंबईला रवाना झाले.

मराठा आरक्षणाकरिता २९ ऑगस्ट रोजी मुंबई मधील आझाद मैदानावरती मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे आंदोलन करणार आहेत सदरचे आंदोलन हे मराठा आरक्षणाकरिता असलेले शेवटचे आंदोलन होणार आहे या आंदोलनात सर्व महाराष्ट्रातील मराठ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले होते त्या आंदोलनास प्रतिसाद देत सोलापूर मधूनही लाखो मराठा बांधव रवाना झाले आहेत. सरकार जोपर्यंत आंदोलनाचा निर्णय जाहीर करत नाही. ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण जाहीर करणे, सग्या सोयऱ्यांचा नियमाची अंमलबजावणी करणे, अशा विविध मागण्याकरिता हे आंदोलन सुरू असणार आहे.आरक्षणाचा निर्णय झाल्याशिवाय कोणीही माघारी फिरणार नाही अशा प्रतिज्ञा करूनच समाज बांधवांनी घर सोडले आहे. जुळे सोलापूर, मोदीसह शहरातील मराठे होम मैदानाजवळ एक आले. महापुरुषांना अभिवादन करून सर्व समाज बांधव मुंबईच्या दिशेने गेले. यामध्ये राजन जाधव, पुरूषत्तोम बरडे, चंद्रकांत वानकर, नाना काळे, राजन जाधव, दत्ता मुळे, प्रा. गणेश देशमुख, सचिन साळूंखे, महादेव गवळी, बापू चराटे महेश चव्हाण, सुनिल शेळके यांच्यासह मराठा बांधव मुंबईकडे गेले आहेत.



### सोलापूरची एक टीम गुरुवारीच आझाद मैदानावर पोहोचली

सीए विनोद भोसले ,गणेश डोंगरे, विलास लोकरे,विठ्ठल शिंदे, शाहू सलगर, संकेत माने, रुपेश गायकवाड यांच्या सह शेकडो मराठा बांधव बुधवारी रात्री सिद्धेश्वर एक्सप्रेस ने मुंबईला रवाना झाले होते ते गुरुवारी सकाळी आझाद मैदानावर पोहोचले आहेत.

### 'एक मराठा लाख मराठा'च्या घोषणा

घरात बसला .... तो मराठा कसला? कोण म्हणतय देत नाय..आरक्षण घेतल्याशिवाय माघारी येत नाय , आता कुठे जायचं मुंबईला जायचं.. एक मराठा, लाख मराठा अशा विविध घोषणा देत सोलापूर शहर व जिल्ह्यातील मराठा बांधव मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. मोर्चात निघणाऱ्या वाहनाकरिता स्टिकर आणि भगव्या टोप्या आणि टावेल यांची वाटप सकल मराठा समाजाच्या वतीने माऊली पवार यांनी केले आहे.

### मुस्लिम बिग्रेडचा आंदोलनात सहभाग

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी छत्रपती शिवाजी मुस्लीम बिग्रेडने जाहीर पाठिंबा दिला आहे. मराठा समाजाबांधवा बरोबर मतिन बागवान, रफिक रसबुरे, सोहेब चौधरी, राजू हुंडेकरी सह मुस्लीम बिग्रेडचे पदाधिकारी आंदोलनासाठी रवाना झाले आहे.

## महत्त्वाचे...

### ईद-ए-मिलादची सुट्टी ८ सप्टेंबरला जाहीर करावी; मुख्यमंत्री व दोन्ही मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई, दि. २८ ऑगस्ट-**

राज्य सरकारने ईद-ए-मिलादची सुट्टी ५ सप्टेंबर ऐवजी ८ सप्टेंबर रोजी जाहीर करावी, अशी मागणी माजी मंत्री नसीम खान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद हे एकाच कालावधीत येत असल्याने दोन्ही सण सोहार्दने साजरे व्हावेत, यासाठी ५ ऐवजी ८ सप्टेंबरला मिरवणूक काढण्यात येणार आहे, त्यामुळे ही मागणी केली आहे. नसीम खान यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या जन्मदिवस ईद-ए-मिलाद व हिंदू समाजाचा अनंत चतुर्थी हे सण एका मागोमाग येत असल्यामुळे राज्यात बंधुभाव व हिंदू-मुस्लिम एकोपा अबाधित राखण्यासाठी मुंबईतील विविध मुस्लिम संघटनाची ऑल इंडिया खिलाफत कमिटी मध्ये बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या जन्मदिनी काढण्यात येणारी मिरवणूक ५ सप्टेंबर ऐवजी ८ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे दोन्ही धर्माचे पवित्र असे सण प्रेम व सद्भावणाने साजरा होतील. गेल्यावर्षीही दोन्ही समाजाचे सण एका मागोमाग येत असल्याने ईद-ए-मिलाद ची मिरवणूक पुढे ढकलण्यात आली होती. यावर्षीही दोन्ही धर्मांचे सण एका मागोमाग येत असल्याने मिरवणूक दिनी म्हणजे ८ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादची सुट्टी शासनाने जाहीर करावी, अशी मागणी केली आहे.

### हवालदारास धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

रामवाडी दवाखाना परिसरात पोलिस हवालदारास धक्काबुक्की केली व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका विधी संघर्ष बालकासह तिघांवर सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी दुपारी साडे तीनच्या सुमारास घडली. संदीपान अंबादास जाधव (वय २२ रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं तीन,सोलापूर), विधी संघर्ष बालक, दत्तात्रय सिद्राम जाधव (वय ३१ रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं सहा सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.याबाबत पोलिस हवालदार योगेंद्र राठोड यांनी फिर्यादी दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार श्री ची प्रतिष्ठापना होणार असल्याने राठोड हे बुधवार दि २७ रोजी रामवाडी परिसरात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी दोनजण शर्ट काढून हवेत फिरवत होते. तसेच अश्लील हावभाव करीत होते. त्यावेळी पोलिस हवालदार यांनी त्या दोघांना शर्ट परिधान करण्यास सांगितले. तसेच त्याची नावे विचारली असता त्यांनी संदीप जाधव व विधी संघर्ष बालक अशी नावे सांगितली. त्यांना पोलिसांनी तुम्ही असे का करीत आहात अशी विचारणा केली असता संदीप जाधव याने पोलिस कर्मचाऱ्यास तुला काय करायचे आहे. आम्ही काहीही करू, तु जास्त शहाणपणा करू नको असे म्हणून दत्तात्रय जाधव याने पोलिस हवालदार राठोड यास धक्का बुक्की केली. व सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी सदर बझार पोलिसांत विधी संघर्ष बालकासह तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार कुंभार करीत आहेत.



### एमआयटी संस्थेच्या विश्वस्त स्वाती कराड-चाटे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनिअर कॉलेज तर्फे माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव स्वाती कराड-चाटे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. यानिमित्ताने विद्यार्थी व शिक्षकांनी मोरवंची येथीलप्रार्थना फाऊंडेशन या अनाथाश्रम व वृध्दाश्रमाला भेट देऊन धान्य, किराणा साहित्य तसेच दैनंदिन जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप केले. तसेच पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने पुढाकार घेत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून रांगोळी व चित्रकला स्पर्धांचेही आयोजन यावेळी करण्यात आले. ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड व शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा पाटील यांच्यासह विद्यार्थी व शिक्षकांनी सर्व उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवला.

# आजोबा गणपती समोरील साऊंड जबरदस्तीने काढले

### सार्वजनिक मध्यवर्तीने दिला गंभीर इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे दुखावलेल्या साऊंड लाईट्स असोसिएशनने गुरुवारी मानाच्या आजोबा गणपती समोरील साऊंड, लाइट्स, डेकोरेशन जबरदस्तीने काढून नेल्याचा आरोप अध्यक्ष मेंडके यांनी केला आहे. गणेश चतुर्थीच्या अगोदरच आम्ही काही रक्कम साउंड अँड लाईट असोसिएशनला दिलेली होती कोणतीही माहिती न देता असे करणे चुकीचे आहे. याचे गंभीर परिणाम असोसिएशनला भोगावे लागतील असा थेट इशारा दिला. याप्रसंगी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

सोलापुरात डीजे बंदीविरोधात सोलापूरकर एकवटले असून अनेक प्रकारची आंदोलन सोलापुरात होत आहेत. ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर, लहान मुले यांच्याकडून आंदोलने करण्यात येत आहेत. डीजे बंदीबाबत प्रशासनाचा दबाव वाढत असल्याने सोलापुरातील सांऊड लाईट असोसिएशनने गुरुवारी सोलापुरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील लोकांना आपली सेवा देणार नसल्याची शपथच घेतली. डीजे असोसिएशनने तर सोलापुरातील मानाचा आजोबा गणपतीसमोरील लाईट डेकोरेशन बंद केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी जेलरोड पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांनी तात्काळ संवेदनशिलतेने परिस्थिती हाताळल्याने पुढचा अनर्थ टळला. सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचे उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके यांनी डीजे असोसिएशनच्या लोकांना सूचित केले की, गणेशभक्तांच्या भावना दुखावु नका अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागेल.









# प्रशासनातील समांतर यंत्रणा रोखण्यासाठी अनुभव पणाला लावावा लागतो : देशमुख

### उद्योग बँक - रोटरी बौद्धिक व्याख्यानमालेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

प्रत्येक प्रशासनात एक समांतर यंत्रणा सक्रिय असते. चांगल्या अधिकाऱ्यांना काम करताना व लोकांच्या अडचणी समजून घेताना या समांतर यंत्रणेचा सामना करावा लागतो. यामुळेच प्रशासनाची बदनामी होते. अशा लोकांना रोखण्यासाठी चांगल्या अधिकाऱ्यांना त्यांचा अनुभव पणाला लावावा लागतो,'' असे मत सोलापूर महसूल प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी व्यक्त केले.



सोलापूर उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ व रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त आयोजित बौद्धिक व्याख्यानमालेचा शुभारंभ गुरुवारी सायंकाळी झाला. ''प्रशासकीय सेवेतील माणुसकी'' या विषयावर उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम हे या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफणार होते. मात्र कौटुंबिक कारणामुळे ते अचानक गावी गेल्याने त्यांच्या ऐवजी देशमुख यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानमालेचे यंदा ६० वे वर्ष आहे. या वेळी विचारमंचावर व्याख्यानमाला समितीचे प्रेसिडेंट यल्लादास लछमापुरे, अध्यक्ष श्रीनिवास बिंगी, रोटरी अध्यक्ष रमेश कमटम, सचिव काशिनाथ कुंटला, ज्योती चिडगुपकर, विकासक शिवा इंजामुरी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल वंगा यांनी केले तर आभार प्रदर्शन रमेश कमटम यांनी मानले. यावेळी जयेश पटेल, यशश्री केळकर, परशुराम रापेल्ली, गोवर्धन चव्हाण, पुंडलिक पगडीमल, गणेश इराबत्ती, सदानंद चिंता, बुचय्या गूंडेटी, व्यंकटेश बिटला, सत्यनारायण गुर्रम,श्रीनिवास सामलेटी आदी मान्यवर उपस्थित होते.

### आज तेलगू निरूपणकार डॉ. अनंतलक्ष्मी यांचे व्याख्यान

शुक्रवार दि. २९ ऑगस्ट रोजी तेलुगुवारी पेन्ली आचारालू'' या विषयावर हैदराबाद येथील प्रसिद्ध तेलगू निरूपणकार डॉ. अनंतलक्ष्मी यांचे व्याख्यान होणार आहे. ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी ६.३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात सुरू आहे.

## १ सप्टेंबरला देशभरात

# 'आपले विद्यालय आपला स्वाभिमान'

### अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे आयोजन

### उपक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणार - हिरेमठ, राज्य संघटनमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८-**

शाळांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्यावतीने देशभरात 'आपले विद्यालय-आपला स्वाभिमान' हा उपक्रम राबविला जाणार आहे. संपूर्ण देशातील ५ लाख विद्यालयांमध्ये १ सप्टेंबर या एकाच दिवशी या संकल्पाचे आयोजन शैक्षिक महासंघाने केले आहे. ५ लाख शाळेमधील लाखो शिक्षक व कोट्यावधी विद्यार्थी एकाच वेळेस हा संकल्प करणार आहेत. या उपक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार असल्याचे शिक्षक महासंघाचे राज्य संघटनमंत्री कृष्णा हिरेमठ यांनी सांगितले.




विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी प्रेम निर्माण व्हावे, शिस्त, स्वच्छता, ज्ञान, संस्कार, शिक्षण, परंपरा यांसारख्या मूल्यांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास व्हावा यासाठी हा उपक्रम राबविला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये शाळे बद्दल चे नाते दृढ करण्याचा प्रयत्न आहे, स्वच्छता, शिस्तप्रियता, प्रेरणा, सामाजिक जबाबदारी, प्रामाणिकपणा या विविध गुणांचा विकास आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे.

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ या उपक्रमात विद्यार्थी शिक्षकांबरोबरच पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व समाजातील सर्व घटकांच्या सक्रिय सहभाग घेणार आहे. आमचा प्रयत्न आहे. शैक्षिक महासंघाशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर महासंघ या संघटनेच्या वतीने राज्यातील सर्व शाळांना आवाहन करण्यात आले आहे.

महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते जास्तीत जास्त शाळेपर्यंत पोहोचून शाळांना संकल्पपत्र प्रदान करीत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक करून शुभसंदेश पाठविला आहे. महासंघासोबतच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (माध्यमिक विभाग) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद (जिल्हा परिषद शिक्षक संघटना) हा उपक्रम राबवित आहे. तरी सर्व शाळांनी या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करावे असे आवाहन महासंघाने केले आहे.

# सांगोल्याच्या डॉ. केळकर व मैत्रीण केंद्राचे मुंबईत झाले कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२८ ऑगस्ट -**

मुंबई येथील शक्ती संवाद कार्यक्रम अंतर्गत तेरे मेरे सपने या नावाने विवाहपूर्व संवाद केंद्र सुरू करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंत्री अदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांनी सांगोल्याच्या माता बालक संस्थेचा व डॉ.संजीवनी केळकर यांच्या कार्याचा गौरव केला.

भारतीय विवाह व्यवस्था जगात आदर्श मानली जाते. विवाहानंतर उद्भवणाऱ्या समस्यांसाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. मात्र विवाहपूर्व सुयोग्य संवादासाठी कोणतीही संस्था नसल्याचे वास्तव आहे. हे लक्षात घेऊन 'तेरेमेरे सपने' या नावाने विवाहपूर्व संवाद केंद्राची स्थापना करण्यात आली असून देशभरात त्याच्या ११ शाखा सुरू आहेत. यापैकी सांगोल्यातील शाखेचे कार्य विशेषत्वाने उल्लेखनीय असल्याचे मत विजया रहाटकर यांनी यावेळी व्यक्त केले. सांगोला येथील डॉ.संजीवनी केळकर यांच्या माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान या संस्थेचे कार्य अशाच स्वरुपाचे असल्याचे गौरवोद्गार विजया रहाटकर यांनी काढले. विवाहपूर्व संवादातून पती-पत्नीमधील नात्यात सुसंवाद वाढतो व पुढील आयुष्यात उद्भवणाऱ्या अनेक समस्यांना आळा बसू शकतो, त्यामुळे अशा उपक्रमांची समाजात नितांत गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. मुंबई सारख्या मोठ्या शहरात आता हे कार्य तेरे मेरे सपने या उपक्रमाअंतर्गत सुरू झाले आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यातील सांगोला सारख्या ग्रामीण भागात हेच कार्य मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्र या नावाने गेली कित्येक वर्षे सुरू आहे याची आठवण विजयाताई रहाटकर यांनी मनोगत व्यक्त करताना करुन दिली.

### कापसावरील आयात शुल्क सवलतीला चार महिने मुदतवाढ

**नवी दिल्ली, २८ ऑगस्ट**

अमेरिकेच्या ५० टक्के आयात शुल्कामुळे मेटाकुटीस आलेल्या कापड निर्यातदारांना पाठिंबा देण्यासाठी केंद्र सरकारने गुरुवारी कापसावरील आयात शुल्क सवलतीला ३१ डिसेंबर अर्थात् चार महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी कापसावरील आयात शुल्क सवलतीला ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली होती. मात्र अमेरिकेने कापडासह इतर वस्तूंवर ५० टक्के शुल्क लादल्याने व्यावसायिक अडचणीत आले, त्यांना दिलासा मिळावा यासाठी सवलतीला चार महिने मुदतवाढ देण्यात आल्याचे अर्थंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# भविष्य घडवण्यासाठी इतिहास माहित असणे गरजेचे

### दूर्ग संवर्धनचे विनायक खोत यांचे प्रतिपादन

### विवेकानंद प्रतिष्ठानच्या व्याख्यानमालेत गुंफले पहिले पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ ऑगस्ट-**



गड किल्ले स्वराज्याचे इतिहासाचे पराक्रमाचे शौर्याचे प्रतीक आहेत. गडकिल्ल्यांची निगा संवर्धन गरजेची आहे . आपल्या पुर्वाजांचे बलीदान, स्मृती आठवण्यासाठी गडकिल्ले पहावेत. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराज्याचे पहिले क्रांतीकारी पुरुष आहेत. आपला हा इतिहास शौर्य मंदिरे सर्वांना सांगण्यास आपण कमी पडत आहोत. जे इतिहास विसरतात ते भविष्य विसरतात. भविष्य घडविण्यासाठी इतिहास माहित असणे व तो साऱ्यांना सांगणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन दुर्ग संवर्धन संस्थेचे अध्यक्ष विनायक खोत यांनी केले.

**विवेकानंद प्रतिष्ठान गणेशोत्सव व्याख्यानमाला**
**भाग - १**

येथील विवेकानंद प्रतिष्ठानच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेचे पहिले पुष्प आज श्री. खोत यांनी गुंफले. व्याख्यानमालेचा प्रारंभ दिपप्रज्वलन व प्रतिमापुजनाने झाला. यावेळी सुनिल गोरे, मोहन शिंदे, दामोदर शिंगे, गुरुपादप्पा आळगी, राजशेखर उमराणीकर, दत्तात्रय कटारे आदि उपस्थित होते. व्याख्याते खोत यांचा परिचय कल्पना स्वामी यांनी करून दिला. त्यांचा सत्कार समर्थाची प्रतिमा, शाल, रोप देऊन प्रतिष्ठानचे संचालक अशोक येणगुरे, मुकुंद उत्पात, आकाश पटांगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, मल्लीकार्जुन मसुती, अशोक येणगुरे, महाविर येणगुरे, महेश कापसे, मनोहर चव्हाण, प्रा खंडेराव घाडगे, बापुजी निंबाळकर वागदरे, अभिजित लोके, विलास कोरे, विवेकानंद पतसंस्थेचे व्यवस्थापक चंद्रकांत दसले दंतकाळे, प्रशांत भगरे, योगेश कबाडे, अरविंद पाटील, रमेश भंडारी, नंदकुमार जगदाळे, राजेश जगताप, श्रीकांत झिपरे, प्रतिष्ठानचे सदस्य, श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील गड व किल्ले या विषयावर एलईडी प्रेझेन्टेशनद्वारे व्याख्याते श्री. खोत यांनी श्रोत्यांना भ्रमंतीच करवून आणली. स्वराज्य प्राप्ती साठी दिलेला लढा, शौर्य, इतिहास प्रत्येक गड किल्ल्याचे महाराष्ट्राच्या इतिहासात महत्व श्रोत्यांसमोर त्यांनी शब्दाद्वारे उभा केला.

विवेकानंद प्रतिष्ठान गेल्या १३ वर्षापासून अक्कलकोटकरांसाठी विविध विषयावर नामवंत तज्ञ इतिहास अभ्यासक यांच्या व्याख्यानाची मेजवानी देत आहे. व्याख्यानमालेचे हे १४ वे वर्ष आहे.

# दु:खावर मात करून छोट्या गोष्टीतही आनंद घ्या

### प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी यांचे प्रतिपादन

### खेडगी महाविद्यालय व पतसंस्थेतर्फे व गणेशोत्सव व्याख्यानमालेत गुंफले पहिले पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ ऑगस्ट-**



दु:ख प्रत्येकाच्या वाट्याला येते, पण त्यावर मात करून छोट्या गोष्टींमधून आनंद शोधा अन् आयुष्यातील प्रत्येक क्षण आनंदाने जगा' आनंदाने जीवन जगण्यासाठी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सांभाळा, आवडत्या छंदबरोबरच कुटुंबाबरोबर संवाद साधा, चांगले मित्र-मैत्रीणी जोडा, नवीन अनुभव घ्या, इतरांना मदत करा असे प्रतिपादन सोलापूरचे व्याख्याते प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी यांनी केले.

येथील सी. बी. खेडगी महाविद्यालय व अक्कलकोट महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणेशोत्सवानिमित्त यंदा प्रथमच आयोजित व्याख्यानातील 'चला आनंदी जीवन जगू या ' या विषयावरील पहिले पुष्प गुंफताना प्रा. कलशेट्टी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी होते. यावेळी माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी, प्र. प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, उपप्राचार्या वैदेही वैद्य, पर्यवेक्षक संजय कलशेट्टी, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत जिड्डीमनी, उपाध्यक्ष श्रीमंत बुक्कानुरे, सचिव दत्तात्रय होटकर, संचालक मंडळ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. कलशेट्टी पुढे म्हणाले, जीवनात जन्मदात्या आई-वडिलांना विसरू नका. जीवनात आनंदी राहणे खूप सोपे आहे पण आनंद स्वतः उपभोगण्यापेक्षाही तो जगाला दाखविण्यासाठी माणसे केविलवाणी धडपड करतात. बाह्य गोष्टींमध्ये आनंद शोधण्यापेक्षा स्वतःच्या अंतर्मनात डोकावून बघा. निसर्गासोबत स्वतः ला जुळवून घ्या. जात, धर्म, पंथ विसरून समाजाशी नाते जोडा. डोळ्यांत प्रेम अन् हृदयात वात्सल्य असल्याशिवाय माणूस म्हणून जगता येणार नाही. जीवनात पैसा महत्वाचा असला तरी नाती जपायला शिका. मोबाईल पासून अलिप्त राहून कुटुंबाबरोबर जास्त वेळ संवाद साधा. मन व मनगट तंदुरुस्त ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा. लहानसहान गोष्टींसाठी कृतज्ञ राहिल्याने समाधानी आणि आनंदी राहण्यासाठी वेळ लागणार नाही. असे त्यांनी सांगितले. उद्घाटन माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी यांच्या हस्ते झाले. चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांनी महाविद्यालय सेवकांच्या पतसंस्थेतर्फे विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला व्याख्यानमालेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे अध्यक्षिय समारोपात सांगितले. प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. निलेश भरमशेट्टी यांनी करून दिला. डॉ. किशोर थोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विजया कोन्हाळी यांनी आभार मानले. व्याख्यानमालेस महाविद्यालयातील विद्यार्थी -विद्यार्थिनी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# मंदी, संधी आणि बुद्धी

बुद्धी आणि संधी यांचा योग्य वेळी योग्य वापर केला गेला नाही, तर या दोन्ही बाबी वाया जातात. त्यांना गंज चढतो आणि एकदा या दोन्ही बाबी हातातून निसटल्या, तर पुन्हा त्या केव्हा समोर येऊन उभ्या राहतील, हे कोणासच सांगता येत नाही.या दोन्ही बाबींची अचूक वेळ साधणे व त्यानुसार निर्णय घेणे गरजेचे असते. याचे अनेक दाखले भूतकाळाने समाजासमोर ठेवलेले आहेत. बुद्धी व संधीचा योग्य वेळी योग्य वापर करण्याचा शहाणपणा समाजास यावा यासाठी काही धडे देऊन ठेवलेले आहेत. ते धडे वारंवार गिरविण्याची प्रामाणिक इच्छा असेल, तर या दोन्ही बाबी हात जोडून समोर उभ्या राहतात. त्यांची भाषा ओळखण्याची एक मेख असते. ती साधली, तर बुद्धीचे आणि संधीचेही सोने होते. अशी भाषा जाणणाऱ्यांना संकटातही संधी दिसते; ती साधण्याचा शहाणपणाही सुचतो. मंदी ही अशीच एक संधी असते. कोविड काळात धास्तावलेले जग जेव्हा भविष्याच्या काळजीने काळवंडलेले होते, तेव्हा संकटाचे संधीत रूपांतर करून घेण्याची बुद्धी भारतास सुचली आणि मंदीच्या काळातही संधी साधून भारताने अवघे जग आपलेसे केले. कोविड महामारीचे हे संकट तर तेव्हा नवखेच होते. त्याच्याशी कसा सामना करावयाचा, त्यास तोंड कसे द्यावयाचे आणि ते परतवून लावण्यासाठी कोणती बुद्धी पणाला लावावयाची, याची काहीच कल्पना नसल्याने जग अंधारात चाचपडत असताना, अनिश्चित भविष्यास सामोरे जायचेच, असा विचार बहुधा एकट्या भारतानेच तेव्हा केला आणि संकटाचे संधीत रूपांतर करून जगाच्या पटलावर आपले स्थान भक्कम करून घेतले. हा केवळ योगायोग नव्हता, तर बुद्धी आणि संधी या दोन्हीचा वापर करण्याची हीच वेळ आहे, हे ओळखल्यामुळेच ते साध्य झाले होते. कदाचित संकटाच्या रूपानेदेखील संधी समोर येऊन उभ्या राहतात, हेच त्यावेळी ओळखण्याकरिता बुद्धी पणाला लावली गेली. संधीनेही त्यास साथ देऊन स्वतःचेच सोने करून घेतले. अशा वेळा वारंवार येत नाहीत हे खरे असतेच तसेच प्रत्येक संकटात संधी दडलेली असतेच असे नाही, पण तशी संधी नसेलच अशा समजुतीने प्रत्येक संकटात संधी शोधणेच सोडून दिले, तर ते संकट सरल्यानंतर त्यातील संधीची जाणीव होऊन पश्चात्तापाचीही वेळ येते. म्हणून संधी शोधावी लागते, तिचे सोने करण्याचा शहाणपणा दाखवावा लागतो. अलिकडच्या काळातील काही निर्णयांकडे आणि विशिष्ट राजकीय भूमिकांकडे पाहताना, केंद्र सरकारने कोणत्याही संकटाकडे संधी म्हणूनच पाहावयाचे ठरविलेले दिसते आणि त्या संधीचे सोने करण्याकरिता पुरेपूर प्रयत्न करण्याची भूमिकादेखील दिसते.

वर्तमानातील जागतिक परिस्थिती, भू-अर्थशास्त्र यांच्या संदर्भात जगाकडे पाहिल्यास, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या आलेखाची उत्तरेकडे सुरू असलेली वाटचाल पाहून जग अचंबा व्यक्त करत आहे, ही बाब नाकारता येणार नाही. आज भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, यावर वित्त क्षेत्रातील जागतिक संस्थांनी शिक्कामोर्तब केले आहे. लवकरच देश जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल, याविषयीही आता फारसे दुमत राहिलेले नाही. जागतिक विकासात भारताचे योगदान २० टक्क्यांहून अधिक राहील तसेच गेल्या दशकातील संकटावर मात करून त्यामध्ये दडलेल्या संधीचे सोने केल्यामुळेच प्रगतीच्या वाटचालीचा हा वेग कायम राखता आला, हेही आता स्पष्ट झाले आहे. यामुळेच देशात महिन्यागणीक परदेशी गुंतवणुकीचा वाढता ओघ सुरू असून भांडवली बाजाराने परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे. अर्थव्यवस्थेचे सर्व घटक आणि आर्थिक स्थितीचा पाया मजबूत असल्याचीच ही एक प्रकारची हमी असल्याने, त्याचे परिणाम सर्वत्र दिसू लागले आहेत. गेल्या १५ ऑगस्ट रोजी, स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणातूनही याचेच संकेत मिळाले होते. संकटातून संधी शोधण्याच्या आणि संधीचे सोने करण्याच्या उमेदीची ती पायाभरणी ठरली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या ५० टक्के अतिरिक्त करांच्या बोजाचे ओझे स्वीकारण्याची मानसिक तयारी भारताच्या कृतीत आणि धोरणातही प्रतिबिंबित झालेली दिसते. अमेरिका ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्याने, जगावर आर्थिक सत्ता लादण्याचा या देशाचा इरादा आता ट्रम्प यांच्या धोरणाच्या रूपाने उघड झाला आहे. अशा स्थितीत जगातील सर्वात मोठी आणि भक्कम लोकशाही असलेल्या भारताने सर्वात मोठ्या अर्थसत्तेसमोर गुडघे टेकावेत का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देणे कोणासही रुचणारे नाही. त्यामुळेच अशा काहीशा कठीण काळाने समोर आणून ठेवलेल्या संधीचे सोने करण्याची भारताची भूमिका जगाला नवा मार्ग दाखविणारी ठरणार आहे.

ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बच्या संकटात संधी दडलेली आहे, याचे संकेत देणारी परिस्थिती आपली अनुकूलता दर्शवित आहे. जागतिक पत बाजारात भारताच्या मानांकनाचा दर्जा उंचावल्याची बातमी आठवडाभरापूर्वी हाच दिलासा देऊन गेली. संधी समोर आली आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करून ती वाया घालविली तर तो करंटेपणा ठरेल, हे ओळखून स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेच्या जुन्या सिद्धांतांस नवी झळाळी येऊ पाहात आहे. ट्रम्प यांच्या निर्बंधांच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी केवळ सरकारची धोरणे पुरेशी नाहीत. त्यासाठी देशातील जनतेची एकमुखी साथ आणि संधी साधण्याच्या प्रयत्नांत हातात हात असणेही गरजेचे आहे. स्वदेशीचा वापर हा आपल्या देशाच्या आर्थिक स्वावलंबनाचा जुनाच संदेश आहे. आत्मनिर्भर भारत ही मोदी सरकारने सत्तेवर आल्यानंतर केलेली घोषणा एव्हाना देशाच्या कानाकोपऱ्यात भिनलेली आहेच; आता ट्रम्प टॅरिफच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी हा मंत्र आणि याच घोषणा नव्या संधी घेऊन समोर दाखल झाल्या आहेत. याआधी आलेल्या अशा अनेक संधी गमावल्यामुळे भारताचा आत्मनिर्भरतेचा मार्ग दुर्लक्षित राहिला आणि भारताची जीवनव्यवस्था आयातकेंद्रित झाली. कोणतीही अत्याधुनिक गोष्ट प्रगत देशांनी विकसित करावयाची आणि भारताच्या बाजारपेठेत त्याचा व्यापार करावयाचा, हीच आजपर्यंतची रीत होती. जेव्हा कोणत्याही गोष्टीची गरज पडेल, तेव्हा जगाच्या बाजारपेठेतून ती आयात करावी या आयातकेंद्री धोरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज भारताला वाटलीच नाही. असे तंत्रज्ञान आपण विकसित करू शकतो, याची जाणीव भारतास झालीच नाही. संधी गमावण्याचाच हा परिणाम होता, हे आता मागे वळून पाहिल्याने लक्षात येऊ लागले आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणास तोंड देताना भूतकाळातील ही चूक सुधारून संकटाच्या रूपाने समोर उभ्या राहिलेल्या संधीचा मागोवा घेण्याची उमेदही निर्माण झाली आहे. सेमीकंडक्टरच्या निर्मितीचे गेल्या पाच-सहा दशकांपासून रखडलेले भारताचे स्वप्न आता साकार होण्याच्या मार्गावर आहे, हे त्याचेच उदाहरण आहे. अंतराळ संशोधन क्षेत्रातील भारताच्या अंतरिक्ष वैज्ञानिकांनी दाखविलेली कर्तबगारी त्याच जाणिवांचे रूप आहे. सामाजिक सुधारणांच्या वाटांवरील काटे दूर करण्यासाठी अनावश्यक कायद्यांचे विसर्जन, नव्या समाजाभिमुख कायद्यांची निर्मिती आणि भारतीयत्वाच्या भावनेस बळ देणाऱ्या धोरणाची अंमलबजावणी त्याच भावनेचे प्रतिबिंब आहे.

अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या आत्मनिर्भरतेच्या भावनेस नवी साद घातली आहे. स्वदेशीचा नारा नव्याने दिला आहे. ट्रम्प यांची भारताची कोंडी करण्याची आडमुठी भूमिका दिवसागणीक अधिक स्पष्ट होत असताना, कोणत्याही स्थितीत अमेरिकेसमोर नाक घासण्याची वेळ येऊ नये यासाठी स्वदेशी व आत्मनिर्भरतेची पंतप्रधानांनी दिलेली हाक ही भारताच्या भविष्यातील परिवर्तनाची नांदी ठरू शकते. आता हातपाय गाळून चालणार नाही, तर या परिस्थितीचा फायदा घेऊन संपूर्ण जगाला मंद वाढीच्या टप्प्यातून बाहेर काढण्यासाठी भारत सक्षम होत आहे, हा मोदी यांचा विश्वास पाहता, जनतेच्या सहभागाच्या विश्वासावरच मोदी सरकारने संधीचे सोने करण्याचे साहस केले आहे, हे स्पष्ट होते. आता अमेरिकेच्या तालावर नाचायचे, आत्मनिर्भरतेच्या सुरांनी भारावून जायचे हे ठरविण्याची वेळ आली आहे. आपण किनाऱ्यावर बसून पाण्यात दगड मारावेत आणि उमटणारे तरंग न्याहाळत स्वस्थ बसावे ही स्थिती आता चालणार नाही, तर वाहत्या प्रवाहास बांध घालून त्याला आपल्याला हव्या त्या दिशेला वळविण्याची ताकद आपल्याकडे आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी केले होते. ट्रम्प आणि अमेरिकेच्या टॅरिफ बॉम्बला निकामी ठरविण्यासाठी हे सामर्थ्य वापरण्याची भारताची उमेद यशस्वी ठरली, तर जागतिक राजकारणातील ती ऐतिहासिक घटना ठरेल, यात शंका नाही.

## तंत्रवेध

# एआयच्या माध्यमातून सायबर गुन्हेगारी

डॉ. दीपक शिकारपूर

'एआय' ही मानवी जीवनातील एक क्रांतिकारी शक्ती आहे, जी अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणेल. तंत्रज्ञान हे एक शक्तिशाली साधन आहे. त्याचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी केला पाहिजे. झटपट अर्थार्जन करण्यासाठी काही अनुभवी संगणकतज्ज्ञ सायबर गुन्हेगारीचा मार्ग पत्करत आहेत. सायबर गुन्हेगार नवीन तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून गुन्हे करण्याच्या नवनवीन युक्त्या शोधतात. संगणक प्रणाली 'हॅक' करून माहिती चोरण्याची तर इतकी विविध तंत्रे आहेत की बस्स. त्यांना या बाबतीत काही तज्ज्ञ हॅकर्स आणि गुन्हेगार मार्गदर्शनही करीत आहेत. आता यात भर पडली आहे कृत्रिम बुद्धिमत्तेची. सुरक्षिततेच्या दृष्टीने डिजिटल युग अत्यंत धोकादायक ठरत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक सोयी उपलब्ध झाल्या असल्या, तरी सायबर गुन्हेगारांनाही आधुनिक साधनांचा वापर करून गुन्हे करणे सोपे झाले आहे. सायबर गुन्हेगारी म्हणजे इंटरनेट, संगणक, मोबाईल किंवा इतर डिजिटल साधनांचा वापर करून कायद्याच्या विरोधात केले जाणारे कृत्य. यात डेटा चोरी, बँकिंग घोटाळे, ओळख चोरी, खंडणीसाठी मालवेअर, बनावट वेबसाईट्स, सोशल मीडिया फसवणूक आदींचा समावेश होतो.

सायबर गुन्हेगार फिशिंग आणि स्पूफिंगसाठी एआयचा वापर करतात. एआय वापरून अगदी खरीखुरी वाटावीत अशा ईमेल्स, एसएमएस किंवा वेबसाईट्स तयार केल्या जातात. हे संदेश बँक, सरकारी संस्था किंवा प्रसिद्ध कंपन्यांच्या नावाने येतात. एआय आणि मशीन लर्निंग अल्गोरिदमचा वापर करून गुन्हेगार एखाद्या व्यक्तीच्या सोशल मीडिया प्रोफाईल, ई-मेल आणि इतर ऑनलाईन माहितीचे विश्लेषण करतात. या माहितीच्या आधारे ते व्यक्तीच्या आवडीनिवडी, नोकरी आणि सामाजिक संबंधांनुसार अत्यंत विश्वसनीय फिशिंग ई-मेल तयार करतात. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या बँकेचे ग्राहक असाल तर तुम्हाला त्याच बँकेसारखा दिसणारा ई-मेल येऊ शकतो. 'आपले बँक खाते बंद होणार आहे. कृपया लगेच लॉगिन करा.' त्यातील लिंकवर क्लिक करताच बनावट वेबसाईटवर वापरकर्त्याचे लॉगिन व पासवर्ड घेतले जातात. एआय अर्थात कृत्रिम प्रज्ञेच्या मदतीने अशा संदेशांची भाषाशैली, लोगो, लेआऊट हे सर्व खरे वाटावे असे तयार केले जाते. हल्ली बरेचदा डीपफेक तंत्रज्ञानाचाही वापर केला जातो. डीपफेक म्हणजे एआयच्या सहाय्याने बनवलेले बनावट व्हिडीओ किंवा ऑडिओ क्लिप्स. उदाहरणार्थ कंपनीच्या सीईओचा बनावट व्हिडीओ तयार करून कर्मचाऱ्यांना पैसे दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर करायला सांगणे किंवा एखाद्या व्यक्तीचा आवाज वापरून त्याच्या नातेवाईकांना फसवणे. यासाठी डेटा विश्लेषण करून लक्ष्य निवडले जाते. एआयच्या मदतीने सोशल मीडिया, वेबसाईट्स, ॲप्सवरून लोकांचा वैयक्तिक डेटा गोळा केला जातो. यासाठी एआय मदत करते.



सर्वसाधारणतः ऑनलाईन कोण जास्त सक्रिय असतात, कोण आर्थिकदृष्ट्या सक्षम वाटतात, कोण सोशल इंजिनीअरिंगला बळी पडण्याची शक्यता जास्त आहे, याबाबत एआय सोशल मीडिया प्रोफाईल विश्लेषण करून संभाव्य सावज शोधून देते. एआय आधारित बॉट्स वापरूनही मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली जाते. उदाहरणार्थ हजारो फेक अकाऊंट्स तयार करणे, सोशल मीडियावर बनावट प्रचार करणे. एका क्षणात हजारो फिशिंग ई-मेल्स पाठविणे असे प्रकार केले जातात. बरेचदा रॅन्समवेअर वापरले जाते. हे एक प्रकारचे मालवेअर असते. ते संगणकातील संपूर्ण डेटा गायब (डिलीट) करून टाकते. यानंतर डेटा परत मिळविण्यासाठी पैसे मागितले जातात. व्हॉईस स्कॅम्स हा फसवणुकीचा आणखी एक हुकमी प्रकार. एआयच्या मदतीने कोणाच्याही आवाजाची हुबेहुब नदकल केली जाऊ शकते. एखाद्याच्या आईचा आवाज वापरून 'मी अडचणीत आहे, पैसे पाठव' असे सांगणारा कॉल करणे. ओळख चोरी हा असाच एक प्रकार. डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगार मंडळी बनावट ओळखपत्रे, जसे की आधार कार्ड किंवा पॅन कार्ड तयार करू शकतात. यामुळे आर्थिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. अलिकडे तर तंत्रज्ञानाची झेप स्वयंचलित हल्ल्यांपर्यंतही गेली आहे. मशीन लर्निंगचा वापर करून सायबर गुन्हेगार स्वयंचलित हल्ले करू शकतात, जे मानवी हस्तक्षेपाशिवाय चालतात. पासवर्ड क्रॅकिंग आणि क्रिप्टोग्राफीचा गैरवापर करून फसवणुकीचे प्रकार अंमलात आणले जातात. पारंपरिक पद्धतीने पासवर्ड क्रॅक करण्यासाठी खूप वेळ लागतो. एआयमुळे हे काम खूप सोपे झाले आहे.

फसवणुकीच्या शृंखलेतील ताजा प्रकार म्हणजे अनुमानित पासवर्ड हल्ला. अल्गोरिदम मोठ्या प्रमाणात लीक झालेल्या पासवर्ड डेटाबेसचे विश्लेषण करतात आणि वापरकर्ते सामान्यतः कोणते पासवर्ड वापरतात, याचा अंदाज घेतात. यामुळे ते पासवर्ड क्रॅक करण्यासाठी संभाव्य कॉम्बिनेशन्स तयार करतात आणि मोठ्या प्रमाणात हल्ले करतात. स्टेगानोग्राफी हे तंत्रज्ञान एका फाईलमध्ये दुसरी फाईल लपवण्याचे काम करते. सायबर गुन्हेगार एआयचा वापर करून मालवेअर किंवा गोपनीय डेटा फोटो किंवा ऑडिओ फाईलमध्ये लपवतात. यामुळे तो सामान्य तपासणीत सापडत नाही. सायबर गुन्ह्यांशी लढण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक ठरते. सायबर गुन्हेगार एआयचा वापर करत असले, तरी त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्याशी लढता येते. एआय आधारित सुरक्षा प्रणाली हा एक महत्त्वाचा उपाय. सायबर सुरक्षा कंपन्या आता एआय सक्षम सुरक्षा प्रणाली विकसित करत आहेत, ज्या संशयास्पद वर्तन ओळखतात आणि धोक्यांचा अंदाज घेतात. या प्रणाली स्वयंचलितपणे धोके रोखतात. सायबर जागरूकता हा आणखी एक महत्त्वाचा मार्ग. एआय आधारित फसवणुकीपासून वाचण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. अनोळखी कॉल, ई-मेल किंवा संदेशांवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. मजबूत सायबर सुरक्षा धोरण आखणे हा आणखी एक उपाय आहे. कंपन्यांनी मजबूत सायबर सुरक्षा धोरणे, जसे की मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन आणि नियमित सुरक्षा ऑडिट्स लागू करणे महत्त्वाचे ठरते.

सायबर गुन्हेगारी ही एक झपाट्याने वाढणारी आणि अत्यंत गुंतागुंतीची समस्या आहे. एआय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग जसा सकारात्मक कामांसाठी होतो, तसाच गुन्हेगारही त्याचा गैरवापर करीत आहेत. सावज निवडण्यासाठी आणि फसवणूक घडवून आणण्यासाठी हे तंत्रज्ञान प्रभावी ठरते. म्हणूनच समाजातील प्रत्येकाने डिजिटल साक्षरता आत्मसात करणे, सावधगिरी बाळगणे आणि तंत्रज्ञानाचे भान ठेवणे आवश्यक आहे. यामुळेच आपण स्वतःला आणि इतरांनाही सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित ठेवू शकतो. त्यासाठीच शाळा महाविद्यालयांमध्ये संगणक-स्मार्टफोनचे दुष्परिणाम या विषयावर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयात या तंत्राचा समावेश व्हायची हीच वेळ आहे. आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा हुकमी वापर, सोशल मीडियावर सावधपणे माहिती पोस्ट करणे, मर्यादित सेल्फी, योग्य चलत चित्रण, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित ठेवण्याचे उपाय, सायबर कायदे आणि गुन्हेगारांना झालेल्या शिक्षा याबाबत रितसर प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. पूर्वी सुरक्षा ही फक्त भौतिक गोष्टींची गणली जायची. आता सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब बनली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या-कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपरिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# काहीही खा हो, पण...!

महाराष्ट्रातील खाद्य संस्कृती जगात प्रसिद्ध आहे. इथल्या पुरणपोळीला तोड नाही. अगदी, मिरचीचा ठेचा आणि भाकरीची चवही अवर्णनीय असते. गावखेड्यात फोडणीला तेल नसेल तर तिखटावर पाणी टाकून भाकर गोड मानणारेही आहेत. एरवी उपवास करीत दिवस काढणारे आणि संधी मिळताच मांसाहारावर तुटून पडणारेही याच समाजात आहेत. सणवार, दिवस, काळ पाहून वर्ज्य करणारेही आहेत. काळवेळ, दिवस, सणवार न पाळता आपल्याला काही बंधन नाही, असे सांगणारेही याच समाजात आहेत. अशात शरद पवारांच्या सुकन्या सुप्रिया सुळे यांनी 'मी मटन खाल्लेले माझ्या पांडुरंगाला चालते. मी 'रामकृष्णहरी' वाली आहे, फक्त माळ घालत नाही. कधी- कधी खाते, तुम्हाला काय प्रॉब्लेम?' असा प्रश्न विचारला. त्यांनी विचारलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. पण, त्यामागील भाव हा काही नेम-नियम पाळणाऱ्यांच्या श्रद्धेवर आघात करणारा आहे. कुणी काय खावे, यावर समाजाचे कोणतेही नियंत्रण नसते. त्याची गरजही नाही. भारत हा खाद्यवैविध्य असलेला देश आहे. तरीही इतरांच्या खाद्यविषयक भावनांचा आदर करण्याची रीत आपल्या देशात आहे. सुप्रियाताईसारख्या लोकप्रतिनिधी असलेल्या व्यक्तीने जाहीरपणे अशी भाषा करणे योग्य नाही. राजकारण्यांनी नेहमी सांभाळूनच बोलले पाहिजे. कारण त्यांचा थेट समाजासोबत संपर्क येतो आणि समाजाच्या डोक्यात सणक गेली तर एखाद्याचा करेक्ट कार्यक्रम कधीही, कसाही होऊ शकतो. सुप्रियाताईंनी किमान हे लक्षात ठेवायला हवे होते की, ज्या विठ्ठलाचे नाव घेऊन त्यांनी उपरोदत शब्द उच्चारले, त्या विठ्ठलाचे निस्सीम भक्त म्हणजे वारकरी मंडळी गळ्यात तुळशीची माळ घालतात. त्यांना मांसाहाराचा शाब्दिक उल्लेखदेखील चालत नाही. परंतु, सध्या धर्माची, श्रद्धेची टवाळी करणारी एक जमातच तयार झाली आहे. सुप्रिया सुळे या एरवी समंजस बोलतात, पण त्यांच्या या प्रश्नामुळे आता त्यांचीही नोंद अशा टवाळी करणाऱ्यांच्या रांगेत झाली आहे. त्यांना हे कळायला हवे की, वारकरी संप्रदाय म्हणजे साधेपणा, सात्त्विकता आणि निस्सीम भक्ती. वारकरी पंढरीला जाताना कांद्यालाही हात लावत नाहीत. काही लोक तर वर्षभर असे काही ना काही नेम पाळतात. विठ्ठलाच्या भक्तीपोटी लौकिकातल्या अनेक आमिषांपासून दूर राहतात. तो त्यांच्या श्रद्धेचा भाग आहे. साध्या भात-भाजीवर समाधानी होणारा वारकरी विठोबाच्या नामस्मरणात तृप्त होतो. तरीही सुप्रियाताईंनी मांसाहाराच्या संदर्भात विठोबाचेच नाव घेतले, हा प्रकार आक्षेपार्ह आहे. एकीकडे सर्वधर्मसमभावाची झूल पांघरायची आणि दुसरीकडे केवळ व्यापक हिंदू समाजाच्या श्रद्धास्थानांचे नाव घेऊन अशी टिप्पणी करायची, हे सुप्रियाताईंना शोभत नाही. त्यांना दुसऱ्या कोणत्याच धर्मातील दैवताचे नाव आठवले नाही, हे नवल नाही. कारण ही कृती त्यांनी जाणीवपूर्वक केलेली आहे. स्वातंत्र्यदिनी मटनाची दुकाने बंद ठेवण्याचा आग्रह सत्ताधाऱ्यांनी केला असल्याच्या पृष्ठभूमीवर त्या बोलल्या. आपण आधुनिक, उदारमतवादी आहोत, हे दाखवण्यासाठी त्यांनी असे म्हटले असावे. त्यांची आधुनिकता त्यांना लखलाभ होवो. पण, महाराष्ट्राशी नाते असलेल्या सुप्रियाताईंना हे कळायलाच हवे की, पांडुरंगाला फक्त भक्ती चालते. बाकी कशाचाही तो भुकेला नाही. तो केवळ भावनांचा भुकेला आहे. सुप्रियाताईंना एवढेच सांगावेसे वाटते की, त्यांना जे काही आवडते, ते सारे त्यांनी खावे. पण, असे वेडेवाकडे बोलून वारकऱ्यांचा तळतळाट घेऊ नये. समस्त वारकरी वर्ग चांद्यापासून बांद्यापर्यंत एक आहे. विठ्ठलाच्या बाबतीत तो अतिशय भावनाशील, संवेदनशील आहे. एरवी कुणाच्याही वाटेला न जाणारा हा वर्ग आहे. अशा वर्गाच्या भावनांवर आघात करणे वेदनादायक आहे. सुप्रियाताईंच्या माहितीसाठी हे सांगितले पाहिजे की, हिंदू धर्म आधीपासूनच उदारमतवादी आहे. या परंपरेच्या खऱ्या पाईकांनी कधीही कोणत्याही वैविध्यावर आक्षेप घेतला नाही. हा धर्म कोणत्याही पक्क्या नियमांनी बांधलेला नाही. विशिष्ट उपासना पद्धतीचा त्यात आग्रह नाही. हा धर्म भेदाभेद करीत नाही. जी उदारमतवादिता सुप्रियाताई सुळे यांच्यासारखे लोक आता मिरवितात, ती हिंदू धर्माची प्राचीन परंपरा आहे. त्याच परंपरेचा वारसा चालविणारे वारकरी संप्रदायातील लोक सोशिक, समंजस आहेत. त्यामुळे ते यावर प्रतिक्रिया देणार नाहीतच. तरीही सुप्रियाताई आणि त्यांच्यासारख्या अन्य मंडळींना हे समजावून सांगितले पाहिजे की, अशा प्रकारची वक्तव्ये करून ते उदारमतवादी ठरत नाहीत. उदारमतवाद इतका उठवळ नसतो. जो स्वतःचे मत मांडताना आणि स्वतःच्या श्रद्धांचा सन्मान करताना इतरांच्याही मतांचा आदर करतो आणि इतरांच्या श्रद्धांचाही सन्मान करतो, तो खरा उदारमतवादी असतो. ज्यांचे वर्तन याहून वेगळे असते, ते उदारमतवादी असूच शकत नाहीत.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

# खेळाचे महत्त्व करिअरच्या नव्या क्षितिजाकडे

प्रा. धन्यकुमार बिराजदार, सोलापूर

आजच्या युगात खेळ केवळ विरंगुळा, मनोरंजन, शारीरिक तंदुरुस्ती साधण्याचे साधन राहिलेले नाहीत, तर ते एक आशादायी आणि उज्ज्वल करिअरचे क्षेत्र बनले आहे. पूर्वी खेळाकडे छंद म्हणून पाहिले जात असे, परंतु आज खेळाडूंना केवळ देश-विदेशात फक्त नावच होईल असे नाही, तर आर्थिक स्थैर्य, सामाजिक सन्मान आणि व्यावसायिक संधीही विपुल प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्या आहेत. अनेकदा ८0-९0 वर्षीय वयोवृद्धांचे शारीरिक व मानसिक आरोग्य संपन्न असल्याचे वृत्त वाचतो. हे शक्य आहे का असा प्रश्न निर्माण होतो, खेळाडू खेळाचे महत्त्व ओळखून असतो.

**''आरोग्यं परमं भाग्यं, स्वास्थ्यं**
**सर्वार्थसाधनम।**
**आरोग्येणैव साध्यं हि सर्वं सर्वत्र मानवैः।।''**

आरोग्य उत्तम असणे म्हणजे सर्वात मोठे भाग्य आहे. कारण चांगल्या आरोग्यामुळेच चार पुरुषार्थ प्राप्त करू शकतो, सर्व कार्य यशस्वी होऊ शकतात. कोरोना सारख्या कठीण काळानंतर सुद्धा अनेकांचे आरोग्य उत्तम कसे, हा प्रश्न मनात असेल पण व्यायाम हेच त्याचे उत्तर आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक संतुलन आणि सहनशीलतेचा विकास होतो. एवढेच नव्हे तर व्यावसायिक खेळाडूंमध्ये शिस्तबद्ध जीवनशैली, ताणतणावावर मात करण्याची क्षमता आणि संघभावना ही गुणवैशिष्ट्ये नैसर्गिकरीत्या विकसित होतात, जी कोणत्याही क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची असतात.

वृत्तपत्र असो किंवा टीव्ही चॅनेल असो प्रत्येकामध्ये खेळाच्या बातम्या असतात. याचाच अर्थ खेळाची व्याप्ती आज वाढली आहे. खेळाच्या क्षेत्रात केवळ खेळाडू म्हणूनच नव्हे, तर प्रशिक्षक, फिटनेस ट्रेनर, फिजिओथेरपिस्ट, स्पोर्ट्स जर्नालिस्ट, क्रीडा व्यवस्थापक, विश्लेषक आणि पंच अशा विविध व्यवसायांची संधी सुद्धा उपलब्ध झाली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा, लीग सामने, तसेच खाजगी अकॅडमीमुळे करिअरच्या असंख्य वाटा खुल्या झाल्या आहेत. खेळाडूंना आज केवळ पदके किंवा ट्रॉफी मिळत नाहीत, तर प्रायोजकत्व, ब्रँड अँबॅसडरशिप, जाहिराती आणि सरकारी नोकरी अशा अनेक सुविधा उपलब्ध होतात. त्यांच्या यशामुळे समाजात आदर्श निर्माण होतो आणि तरुण पिढीला प्रेरणा मिळते. सरकारकडून खेळाडूंना शिष्यवृत्ती, शासकीय योजना, पुरस्कार व सवलती दिल्या जातात. खाजगी उद्योगसंस्थाही विविध लीग किंवा स्पर्धांद्वारे खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. या पाठबळामुळे खेळ क्षेत्रात दीर्घकालीन करिअर करणे शक्य झाले आहे.

खेळाडूंना जागतिक पातळीवर स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याची संधी मिळत आहे. यामुळे फक्त व्यक्तिगत प्रगतीच होत नाही, तर देशाचे नावही उज्ज्वल होते. क्रिकेट मध्ये रवी शास्त्री, सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, विराट कोहली, एम. एस. धोनी, हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद, धनराज पिल्लै, सरदार सिंग, रूपिंदर पाल सिंग, बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू, सायना नेहवाल, कुस्तीपटू सुशील कुमार, विनेश फोगाट तर पी. टी. उषा, महेश भूपती, सानिया मिर्झा यांनी इतर अनेक खेळामध्ये देशाची किर्ती वाढवली आहे. त्यांना राष्ट्रीय पातळीवर गौरवण्यात आले. आजच्या स्पर्धात्मक जगात खेळ हे केवळ छंद न राहता एक सशक्त करिअरचा मार्ग बनले आहे. यासाठी योग्य प्रशिक्षण, चिकाटी आणि सातत्य आवश्यक आहे. खेळाडू केवळ मैदानात नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो. खेळातून मिळालेली शिस्त, सांघिक शक्ती, संघर्षाची तयारी, निर्णय क्षमता आणि जिंकण्याची जिद्द म्हणजेच जीवनशिक्षण आहे. सरकारने २0२0 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात खेळाडूंना अनेक सवलती दिल्या आहेत. याचा विद्यार्थ्यांनी नक्की लाभ घेतला तर जीवनात यशस्वी होणे सहज शक्य आहे यात शंका नाही.

९४२३३३0७३७

## आत्मसाधनेचे महापर्व म्हणजे दशलक्षण-पर्युषण महापर्व

भारतामध्ये अनेक जाती-धर्माचे लोक आनंदाने राहतात. प्रत्येक धर्माचे सण-उत्सव आपापल्या पद्धतीने साजरे केले जातात. युगारंभाच्यावेळी संवत्सरी पर्व मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा केला जातो. यालाच जैन दर्शनामध्ये पर्युषण महापर्व-दशलक्षण महापर्व असे म्हटले जाते. हा सण प्रत्येक वर्षी भाद्रपद शुक्ल पंचमीपासून चतुर्दशीपर्यंत भारतातच नाही, तर जगभरात साजरा केला जातो. पर्युषण म्हणजे परि+उषण=पर्युषण. सतत आत्म्याजवळ राहणे. आत्म्याचे ध्यान करणे. हा आत्मचिंतनाचा पर्व होय. दश म्हणजे दहा प्रकारे आत्म गुणांची आराधना करणे होय. भौतिक पंचेंद्रिय विषय जनित सुख सोडून आत्मिक सुखाकडे वाटचाल करणे, हा या सणाचा उद्देश आहे. क्रोध, मान, माया, लोभ हे कषाय नाहीसे करून उत्तम क्षमा-मार्दव-आर्जव-शौच (पवित्रता) या गुणांच्या अभिव्यक्तीचा हा पर्व आहे. क्रोध, अहंकार, कपट, हव्यास यांना व्यवहारामध्ये वाईट मानले जाते. हिंसा, असत्य, चोरी, कुशील व परिग्रह ही पाच पाप मानली आहेत. याउलट संयम, सत्य, त्याग, ब्रह्मचर्य, आकिंचन्य या आत्मिक गुणाद्वारे आत्म्याच्या विकासाचा हा महापर्व आहे. संसार दुःखातून काढून आध्यात्मिक सुखाकडे नेणारा हा पर्व आहे.



आजच्या धावपळिच्या युगात स्वतःसाठी जगण्याची प्रेरणा देणारा हा पर्व आहे. भोगापेक्षा त्यागाचा कानमंत्र देणारा असा हा पर्व आहे. उत्तम क्षमा धारण केल्याने क्रोध, वैर नष्ट होतो. संपूर्ण जगात शांतता येईल. 'क्षमा वीरस्य भूषणम्।' क्षमा करणे हे वीर पुरुषाचे लक्षण आहे. क्रोध हा आत्म्याचा विभाव आहे तर क्षमा हा मूळ स्वभाव आहे. मृदुता, कोमलता, पवित्रता, सत्य, संयम, तप, त्याग या गुणांमुळे आत्मिक सौंदर्य वाढते. ब्रह्मचर्य तत्त्वाने ज्ञानवृद्धी होते तसेच सर्व माता, भगिनी यांची रक्षा होईल. विश्वातील संपूर्ण प्राणिमात्राच्या कल्याणाची भावना या पर्वात केली जाते.

## वाचक पत्रे

दशलक्षण-पर्युषण महापर्वाच्या शुभेच्छा.

**सुनील बेलोकर शास्त्री**/८३०८१२३४९८

### वाहतूक पोलिसांचे अभिनंदन!

नागपूर शहरात वाहतुकीची समस्या विक्राळ रूप घेताना दिसत आहे. आरटीओच्या माहितीनुसार २० लाखांच्यावर दोनचाकी व ५ लाखांच्यावर चारचाकी वाहने शहरात धावतात. राज्य शासनाच्या वाहनांबरोबर खाजगी वाहनांची होत असते. मात्र खाजगी बसेसच्या मनमानीची तक्रार नेहमीच होत आहे. खाजगी बसेसकडून प्रवाशांना त्रास होतो. निर्धारित जागा सोडून वाट्टेल तेथून सवारी घेणे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यातल्या त्यात गुंड प्रवृत्तीच्या एजंटचे वर्चस्व अनुभवास येते. जबरदस्ती करणे, वेळांचे पालन न करणे, धाक दाखवून प्रवाशांना आपल्या वाहनांत बसण्यास प्रवृत्त करणे, महाराष्ट्र शासनाच्या बसथांब्यावर दोन-चार बसेस उभ्या करून प्रवाशांची व शासनाच्या बसेसची गैरसोय करणे या सर्व गोष्टी अतिशय साधारण झालेल्या आहेत, ज्यामुळे एसटी बसेस तिथे न थांबता सरळ पुढे जाण्यास प्रवृत्त होतात. ज्येष्ठ नागरिक, अपंगांना असलेल्या सवलती एसटी बसेस उपलब्ध न झाल्यामुळे खाजगी बसेसचे पूर्ण भाडे घेण्यास प्रवृत्त करतात. जर एखाद्याने विरोध केला तर त्या स्थानकांवर पुन्हा न दिसण्याच्या गंभीर धमक्याही दिल्या जातात. खाजगी बसेसच्या या त्रासापासून आणि त्यांच्या तक्रारीपासून नागपूर शहर वाहतूक विभागातर्फे घेतले गेलेले पाऊल खरंच कौतुकास्पद आहे. १२ ऑगस्ट २०२५ पासून नागपूर वाहतूक पोलिसांतर्फे केलेल्या आदेशानुसार प्रायोगिक स्तरावर एक महिना खाजगी बसेस आपल्या निर्धारित स्थानकांव्यतिरिक्त विशिष्ट वेळेकरिता प्रवासी घेणे व उतरविणे करू शकणार नाही. याकरिता वाहतूक पोलिसांतर्फे विशेष पथक याबद्दल काळजी घेत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी बसेसवर दंड व योग्य कारवाई करतील. वाहतूक पोलिसाचे याबद्दल अभिनंदन!

**लक्ष्मीकांत शिरास**/९७६६१७८१९७

### गणेशोत्सवात अश्लीलता टाळा

विद्येचा गणनायक गणपती बाप्पाचे आगमन झाले. सगळीकडे प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. घरगुती गणेशोत्सव ५-७ दिवसांचा असतो तर सार्वजनिक उत्सव १० दिवस असतो. या उत्साहात आजकाल अतिप्रमाणात नवनवीन धांगडधिंगा होत असल्याने उत्सवाचे वातावरण बिघडून जाते. विशेषतः जी गाणी लावली जातात, ती हिडीस प्रकारची असतात. यामुळे कार्यक्रमात तारतम्य राहत नाही. उत्साही कार्यकर्त्यांनी असल्या प्रकारची गाणी बंद करावी व गणेश स्तोत्र, विघ्नहर्ताची गाणी, देवाधिकांची गाणी, भावगीते, भक्तिगीते लावावी. गणेशोत्सवाचे पावित्र्य राखावे, आरतीचे स्वरूप भक्तिमय असावे.

**शिरीश बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# उत्तम मार्दव धर्म

जैन धर्मातील पर्युषणपर्व हा वर्षातील सर्वात पवित्र आणि महत्त्वाचा धार्मिक उत्सव मानला जातो. हा उत्सव आत्मचिंतन, आत्मशुद्धी आणि संयम यांचा अनोखा संदेश देतो. हा केवळ धार्मिक विधी नसून तो सामाजिक सौहार्द, मैत्री, परस्पर क्षमा आणि शांततेचा संदेश देणारा उत्सव आहे. आत्मशुद्धीच्या मार्गाने चालत इतरांशी सद्वर्तन करण्याचा संकल्प या पर्वात घेतला जातो. त्यामुळे पर्युषणपर्वाला समाजातच नव्हे तर संपूर्ण मानवजातीसाठीही सदाचाराचा दीपस्तंभ म्हणता येईल. जैन धर्मात दहा प्रमुख धर्म सांगितले आहेत. त्यापैकी एक महत्वाचा धर्म म्हणजे उत्तम मार्दव धर्म. 'मार्दव' म्हणजेच नम्रता किंवा विनयशीलता. मनुष्य कितीही विद्वान, श्रीमंत वा सामर्थ्यवान असला तरी जर त्याच्यात नम्रता नसेल तर त्याचे व्यक्तिमत्त्व अपूर्ण राहते. संस्कृत श्लोकात म्हटले आहे.




''**विनयाद् यत्र संपन्नं सर्वं तत्रैव शोभते।**
**विनयं हीनम् सर्व वैभवं निर्जलं जलम्।**''

म्हणजे जिथे नम्रता आहे तिथेच सर्व काही शोभते. नम्रता नसल्यास ज्ञान, पैसा, पदवी हे सर्व निरर्थक वाटतात. मार्दव धर्म म्हणजे अहंकाराचा त्याग करून साधेपणा स्वीकारणे. अहंकारी व्यक्ती लोकांना दुखावते, पण नम्र व्यक्ती सर्वांना आपल्याकडे आकर्षित करते. नम्रतेमुळे बोलण्यात गोडवा येतो, मन शांत राहते आणि इतरांशी वागताना सौजन्य वाढते. सर्वांनी जर हा धर्म आचरणात आणला तर शिक्षणातील अडचणी सहज पार करता येतात. कारण नम्र विद्यार्थी शिक्षकांचे मार्गदर्शन स्वीकारतो, सहाध्यायांशी चांगले संबंध ठेवतो आणि ज्ञानात प्रगती करतो. संस्कृत श्लोक सांगतो

''**नाहंकारेण साध्यं हि ज्ञानं धर्मश्च केनचित।**
**मार्दवेना विनीतस्य सर्व सुलभमात्मनः।।**''

म्हणजे अहंकाराने कधीच ज्ञान मिळत नाही. पण नम्रतेमुळे सर्व काही सहज प्राप्त होते. आजच्या काळात स्पर्धा, ताणतणाव आणि अहंकार यामुळे नातेसंबंध कमकुवत होत आहेत. अशा वेळी उत्तम मार्दव धर्म आपल्याला साधेपणा, शांती आणि परस्पर स्नेह शिकवतो. शास्त्रात म्हटले आहे

''**मार्दवं हि मनुष्याणां भूषणं परमं स्मृतम्।**''

म्हणजे नम्रता हेच माणसाचे खरे भूषण आहे. म्हणूनच, विद्यार्थ्यांनी व समाजातील प्रत्येकाने नम्रतेचा स्वीकार केला तर व्यक्तीगत प्रगतीबरोबरच समाजातही ऐक्य आणि सौहार्द टिकून राहील.

**- प्रा. अजित देवसाळे**
९८५००९२९७५



# कुमठ्यात भगवंताच्या जयघोषात पर्युषण पर्वाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

कुमठे येथील अतिशय क्षेत्र १००८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीच्या वतीने पर्युषण पर्वाचा शुभारंभ सकाळी भगवंतास महाभिषेक करून नमोकाराच्या जयघोषित करण्यात आला.

पर्युषण पर्वाचा या कार्यक्रमावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील, सचिव वालचंद पाटील, उपाध्यक्ष नितीन कासार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुमठे येथील चंद्रपूर जैन मंदिर हे नऊशे वर्षापासून खूप पुरातन असून सोलापुरातले पहिले जैन मंदिर आहे. या मंदिरात आचार्य शांतीसागर महाराजांपासून अनेक त्यागी या मंदिरात येऊन गेले आहेत. अलीकडेच जिर्णोध्दाराच्या माध्यमातून या मंदिराचे कायापालट झाला असून या मंदिर समितीच्या वतीने त्यागीभवन व सांस्कृतिक भवन याची उभारणी करण्यात आली आहे.

यासाठी कुमठे येथील युवक वर्गाचा खूप मोठा सहभाग आहे. या संस्कृती भवनची लवकरच लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील यांनी सांगितले.

या पर्युवर्षण पर्व कार्यक्रमासाठी सचिन कासार, सचिन पाटील, आनंद पाटील, सागर पाटील, अजित पाटील, भाग्येश पाटील, प्रथमेश कासार, मनोहर कासार, शितल कासार, रवि कासार, किरण पाटील, नितीन पाटील, महावीर पानपट आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# महापालिकेने पाच महिन्यात केला १ लाख ९० हजार रुपये दंड वसूल

## महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने गेल्या पाच महिन्यात शहरातील विविध ठिकाणी अतिक्रमण विरोधी कारवाया करून एकूण एक लाख ९० हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. महापालिकेच्या पथकाकडून नियमितपणे ही कारवाई करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांच्या माध्यमातून पथकाकडून सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम नियमितपणे राबविण्यात येत आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या नगर अभियंता, नगर रचना आणि भूमी मालमत्ता विभागाच्या



पत्रानुसारही अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्यात येते. या मोहिमेअंतर्गत कारवाई करून खोके, हात गाड्या आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले तसेच त्यांच्यावर दंडात्मक कारवाईही करण्यात आली आहे. या विभागातील कनिष्ठ अभियंता सुफियान पठाण, दीपक कुंभार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही मोहीम राबविण्यात आली होती.

दरम्यान, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून विविध ठिकाणी कारवाई अंतर्गत माहे एप्रिल ते २५ ऑगस्ट अखेरपर्यंत पाच महिन्यात एकूण १ लाख ९० हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये एप्रिल २०२५ मध्ये २४ हजार रुपये, मे - १८ हजार ९०० रुपये, जून - ३० हजार १०० रुपये, जुलै - ६२ हजार २०० रुपये, २५ ऑगस्ट २०२५ अखेर ५५ हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिली.

### अतिक्रमण आढळून आल्यास कारवाई

महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने यापुढेही शहरातील प्रमुख रस्ते, चौक व गर्दीच्या भागात अतिक्रमणावर कठोर कारवाई नियमितपणे करण्यात येणार आहे. नागरिकांनी सार्वजनिक मालमत्तेचा गैरवापर करू नये. शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा श्री. डोंगरे यांनी दिला आहे.

# अश्लील कृत्य करीत घरगड्याकडून विनयभंग

**सोलापूर दि.२८ ऑगस्ट-**

एका राजकीय व्यक्तीच्या घरातील महिलेशी घरगड्याने अश्लील कृत्य करीत विनयभंग केला. याप्रकरणी ४७ वर्षीय व्यक्तीवर सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ ऑगस्ट रोजी घडली आहे. याबाबत ४० वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. ४० वर्षीय पीडित महिला २६ ऑगस्ट रोजी राहत्या घरात जेवण घेण्यासाठी स्वयंपाक घरात गेली होती. त्यावेळी पीडिता ही घरात पाठमोरी उभी होती. त्यावेळी घरगडी ही तेथे आला. पीडिताने त्यास जेवन देवू का असे विचारणा केली,त्यावेळी संशयित आरोपीने त्या महिलेशी अश्लिल कृत्य व मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करीत विनयभंग केला असल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. याप्रकरणाचा तपास पोलिस करीत आहेत.


## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विषेशतः सोलापूर महानगरपालिका नवीन शहर हद्दवाढभागातील शेळगी हद्दीतील लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन**: डि। व सब डि। सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, मौजे सोलापूर महानगरपालिका नवीन शहर हद्दवाढभागातील शेळगी येथील सर्व्हे नंबर १८/२ब/१अ पैकी 'कुमारस्वामी नगर-क' मधील प्लॉट नं. २४ यांसी सोलापूर महानगरपालिका मिळकत क्र. ५१८२३३ असा असून याचे एकूण क्षेत्रफळ ९२.९३ चौरस मीटर अथवा १००० चौरस फूट इतकी प्लॉट जागा असून यात २ पत्र्याचे शेड, संडास बाथरूम व लाईट कनेक्शनसह. याची चतुःसिमा खालीलप्रमाणेः- पुर्वेस :- प्लॉट नंबर २५, पश्चिमेस :- प्लॉट नंबर २३, उत्तरेस :- रस्ता, दक्षिणेसः- प्लॉट नंबर ३१

सदर जागा **शिवा रजाक मग्रुमखाने** यांनी नोटरी सिरियल नं. २१९० अन्वये दिनांक ३०/०६/२०२० रोजी घेतली असून त्यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणीचे निरसन करण्याकरिता सदर जागा आमचे अशिलांना कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरवून आमच्या अशिलांकडून तोंडी इसारा रक्कम स्विकारले आहेत. तसेच सदर जागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. सबब, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, पोटगी, टाच, सरकारी व निम सरकारी बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा असल्यास किंवा दान, बक्षीस, वहिवाट, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यूपत्र, वारसपत्र, अधिकारपत्र, करार मदार अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क दिल्यास किंवा हस्तांतरण केले असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली. सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीख - २८/०८/२०२५

सही/-
**ॲड. उज्वला आर. कुलकर्णी**
**बी.ए., एलएल.बी., एलएल.एम.**
पत्ताः २१२/२१३, कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर, महाराष्ट्र
मो.नं. ९३७३९७७९७९
अशिला तर्फे ॲडव्होकेट



## हरवले आहे

१) खरेदी खत क्र. २४२१/२०११ व खरेदीची पावती क्र. २४२२ दि. २५/०५/२०११
२) खरेदी खत क्र. १४३४/२०१४ च्या खरेदी खताची पावती क्र. २४५५ दि.२७/०३/२०१४
३) खरेदी खत क्र. २९४२/२०१४ च्या खरेदी खताची पावती क्र. ५०२२ दि.०७/०७/२०१४

हे दि. १०/०८/२०२५ रोजी बळीराम उकीरडे यांच्याकडुन पांडे चौक भाजी मार्कट बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर येथे गेल्यानंतर हरवले / गहाळ झाले आहे. तरी सापडल्यास संपर्क साधावा.

सही/-
**ॲड. धनंजय नामदेवराव पाडुळे**
(B.Com L.L.B G.D.C & A)
Authorised & Certified Auditor
जिल्हा व सत्र न्यायालय, धाराशिव.
मो. ९८९०९१८३८४ / ८६६८४५५१२०



## जाहीर प्रगटन

**स्पे.मु.नं.३९१/२०२४**
**नि.१३**

**सोलापूर मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

**श्रीमती एस.ए.आर सैय्यद सो. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सोलापूर**

**उत्तर प्रतिवादीस दाव्याच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस**

**श्री. चंदू मेघु चव्हाण --- वादी**
**विरुध्द**
**सौ.अलका दगडू राठोड, इतर १ --- प्रतिवादी**

**प्रतिवादी नं.१ - सौ. अलका दगडू राठोड, रा. प्रताप नगर, विजापूर रोड, सोलापूर**

तुम्हास नोटीस देण्यात येते की, या प्रकरणात स्पे.मु.नं.३९१/२०२४ अन्वये इसारा कराराची पूर्तता होऊन खरेदीखत होऊन मिळणे, जाहीर ठराव होऊन मिळणे व निरंतर ताकीदीसाठीचा दावा दाखल केला असून, ते या मे. न्यायालयात नोंदविण्यात आलेले आहे. या दाव्याच्या सुनावणीसाठी दिनांक ०६/१०/२०२५ ही तारीख न्यायालयाने निश्चित केलेली आहे. तुम्ही स्वतः किंवा तुमच्यातर्फे वकील किंवा तुमचे काम चालविण्यास विधीज्ञाद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत सदरील दाव्याची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल. आज दि.२५/८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**आदेशावरून**
**अधिक्षक, दिवाणी न्यायालय सोलापूर**



M.V.C. No.2060 OF 2012

**BEFORE THE MOTOR ACCIDENTS CLAIMS TRIBUNAL No.V, VIJAYAPURA AT : VIJAYAPURA.**

**1. Smt. Savita W/o. Vilas Hande and others --- Petitioners.**
**V/s-**
**1. Shri Mahadev S/o. Machindra Jagadale and others --- Respondents.**

**NOTICE**
**(UNDER ORDER V RULE 3 OF C.P.C.)**

**Respondent No.1**
**Shri. Mahadev S/o. Machindra Jagadale,**
**Age: 55 years, Occupation: Business & Agriculture,**
**R/o Dahiwal Madha, Tq. Madha, Dist. Soalpur**
**Maharashtra State.**

WHEREAS, Petitioner has instituted a Petition against you for injuries sustained in the alleged accident on 15.09.2012 you are hereby summoned to appeared in this Court in person on the 29th day of September 2025 at 10:30 O' Clock in the noon to answer the claim; and you are directed to produce on that day all the documents upon which you intend to rely in support of your defense.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the Petition will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of the Court, this 28th of Aug 2025.

**B O C.**
**sd/-**
**S. Sheristedar,**
**Prinicpal Senior Civil Judge and M.A.C.T. Vijayapura.**

seal



## जाहीरनामा

दिवाणी किरकोळ अर्ज नं.१९/२०२५

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

१. भारती सुधाकर रेऊरे
२. वैष्णवी सुधाकर रेऊरे
३. वैभवी सुधाकर रेऊरे
४. श्रेयस सुधाकर रेऊरे
५. श्रीधर सुधाकर रेऊरे
६. हणमंत शेठ्यप्पा रेकरे
७. पार्वती हणमंत रेऊरे
**-- अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही -- सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टीफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. यातील अर्जदार नं.१ ते ७ सुधाकर हणमंत रेऊरे हे दि.२४/११/२०२४ रोजी अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र सोलापूर येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार नं. २ ते ५ हे नात्याने मुले व मुली म्हणून त्यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं. ६ वडील व अर्जदार नं. ७ असे आहेत.

अर्जदार हे मयताचे मृत्यू पश्चात वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थ तमाम लोकांना जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देणेबाबत कोणाचेही कसलीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत अथवा उक्त नेमलेल्या तारखेस दिनांक २९/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस जाहीर करुन देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीरनामा केले दिनांक :- २८/०८/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**हुकुमावरुन**
**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**



# साई श्रद्धा मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित भूम ता. भूम जिल्हा. धाराशिव

## जाहीर ई-निविदा सुचना क्र. ०१/२०२५-२६

**दिनांकः- २८/०८/२०२५**

साई श्रद्धा मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित भूम ता. भूम जिल्हा. धाराशिव नोंदणीकृत ठेकेदार । पुरवठाधारक यांच्याकडून दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपली निविदा ऑनलाईन पद्धतीने दि.२९/०८/२०२५ ते १३/०९/२०२५ रोजी १८:५५ या कालावधीत सादर करावी. उपरोक्त ई-निविदा फॉर्म विक्री व स्विकृतीची संपूर्ण कार्यवाही वरील कालावधीत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येत आहे. तरी सर्व निविदा धारकांनी विहित वेळेत आपला तांत्रिक लिफाफा online पद्धतीने सादर करावा. अधिक माहितीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर व ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७ या टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा.

**अटी व शर्ती :-**

खादी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार अध्यक्ष/सचिव साई श्रद्धा मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित भूम यांनी राखून ठेवलेला आहे.

**स्वाक्षरीत/-**
**अध्यक्ष/सचिव**
**साई श्रद्धा मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित भूम**



# बार्शी नगरपरिषद, बार्शी

## ''रिक्त गाळेंचा जाहिर लिलाव''

**लिलाव - मंगळवार दि. ०९/०९/२०२५ वेळ - सकाळी ११:०० वाजता**
**स्थळ : कै. डॉ. मामासाहेब जगदाळे समिती सभागृह, बार्शी**

| अ.नं. | शॉपींग सेंटरचे नाव | लिलाव करावयाचे गाळे क्रमांक |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजी राजे शॉपिंग सेंटर | गाळा क्र. ०९ |
| २ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटर | गाळा क्र. ०१,०३,०५,०८,०९,१०,११ |
| ३ | कै. अण्णासाहेब बारबोले शॉपिंग सेंटर | गाळा क्र. २५,२६ व हॉल क्र.०५ |
| ४ | नगरशेठ कै. बाळासाहेब नागनाथ (अप्पा) कथले व्यापारी संकुल | गाळा क्र.०१ व डिस्पेंसरी ०१ ते ०८, १०,११,१२ |
| ५ | आ.क्र.४३ दुकान केंद्रामधील (गाडेगाव रोड) दुकान गाळे | गाळा क्र. ०४ |
| ६ | आ.क्र.४४ दुकान केंद्रामधील (गाडेगाव रोड) दुकान गाळे | गाळा क्र. ०१,०५,०८,०९,१४ |
| ७ | कोठारी गॅस दुकानासमोरील सि.स.नं.४५५८ व ४२५० लगतच्या नाल्यावरील शॉपिंग सेंटर | गाळा क्र. ०७,०८ |
| ८ | नगरभूषण कै. शंकरराव उर्फ भाऊसाहेब झाडबुके व्यापारी संकुल | ऑफिस क्र.०३ व हॉल क्र.०१,०२,०३ |
| ९ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर | गाळा क्र. अप्पर- ५४,५९,०७ लोअर-०४,०५ व १८ ते ३१ व ३४ |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग जवाहर लगत | गाळा क्र.१४,२०,२१,२२,२३ |
| ११ | आ.क्र.६० मंगळवार पेठ टेकडीसमोरील वरच्या मजल्यावरील शॉपिंग सेंटर | गाळा क्र.०४,०५,१०,११,१२,१३ |
| १२ | महात्मा गांधी शॉपिंग सेंटर | गाळा क्र. एम-२२ (दुसरा मजला) |
| १३ | वीर शिरोमणी महाराणा प्रताप व्यापारी संकुल | गाळा क्र. ०१ ते ११, १३ ते २३ व ३४ ते ४१ |
| १४ | फौडदार बंगला पिछाडी खुली जागा | खुली जागा क्र.०१ |
| १५ | उपळाई रोड शासकीय धान्य गोदाम लगत उपविधी खुली जागा क्र. १६ थकबाकीपोटी न.पा. ने ताब्यात घेतला असल्यामुळे रीक्त झालेल्या खुली जागा क्र. १६ करीता अर्ज मागणी अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी न.पा.कडे दि. २९/०८/२०२५ ते दि. ०९/०९/२०२५ अखेर अर्ज सादर करावेत, उशीरा आलेल्या मागणी अर्जाचा विचार केला जाणार नाही. | |
| १६ | छत्रपती शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर | सदर शॉपिंग सेंटर मधिल तळमजला येथील खुली जागा ११ महिन्याकरीता भाडेतत्वावर देणे. |

**टिपः-**

- लिलावात भाग घ्यावयाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत मिळकत विभागामध्ये पाहवयास मिळतील.
- लिलावामध्ये भाग घेण्यासाठी अनामत र.रु. २५,०००/ रोख जागेवर भरावयाचे आहेत. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
- जाहिर लिलाव ऐक्युपन्सी प्राईसचा (डिपॉझिटचा) आहे. निश्चित डिपॉझिटच्या रक्कमेपैकी २५% रक्कम जागेवर व उर्वरीत रक्कम १ महिन्यात भरावयाची आहे. त्याशिवाय लिलाव कायम झाला असे समजण्यात येणार नाही.
- लिलाव मंजूर अथवा नामंजूर करणेचे सर्व अधिकार मा. मुख्याधिकारी यांना राहतील.

**नगरपरिषद कार्यालय, बार्शी,**
**दि.२८/०८/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी**



**Savitribai Phule Shikshan Prasarak Mandal's**

SPSPM

N B Navale Sinhgad College of Engineering, Kegaon, Solapur

NAAC A

Approved by DTE, AICTE & Affiliated to PAH Solapur University, Solapur
Accredited by **NAAC** with **"A" Grade**
**Website: www.sinhgadsolapur.org**
**Contact No.: 8380025630/8380025688**

ENGINEERING ADMISSION 2025-26
Institute Code: 06640

Applications are invited for Institute Level (IL) Seats & Seats remaining vacant after CAP (ACAP) rounds (if any), for First Year B.Tech., Direct Second Year B.Tech., and First Year M.Tech. on or before date of allotment of final CAP Round of respective course.

| Under Graduate Course | Choice Code | IL Seats for F.Y.B. Tech. |
|---|---|---|
| Computer Science & Engineering | 0664024210 | 12 |

Schedule of admission & vacant seats (for ACAP) will be displayed on college website after completion of final CAP Round of respective course.

**Prof. M.N.Navale**
**Chairman SPSPM**



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः मौजे शेंद्री तालुका बार्शी येथील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे शेंद्री ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत याचा गट नं. २९७ याचे क्षेत्र हे. ०२-२० आर + पो.ख. हे. ००-११ आर याचा आकार रु. ०५-३१ पैसे या जमिनीपैकी पुर्व बाजुची बार्शी कुर्डुवाडी रोड लगतची संपूर्ण जमिन याचे क्षेत्र हे. ००-८५ आर, याचा आकार रु. ०१-९५ पैसे, यांसी चतुसिमा पुर्वेस- गट नं. २४५, दक्षिणेस- शिवरस्ता, पश्चिमेस- बार्शी कुर्डुवाडी रस्ता, उत्तरेस- गट नं. २९६ येणेप्रमाणे जमिन आतील सर्व तद्ंगभुत वस्तुसह.

२) वर नोटीस कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जमिनीपैकी दक्षिण बाजुची जमिन याचे क्षेत्र हे. ००-४२.५० आर, आकार रु. ००-९६ पैसे, येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तद्ंगभुत वस्तुसह.

३) वर नोटीस कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जमिनीपैकी उत्तर बाजुची जमिन याचे क्षेत्र हे. ००-४२.५० आर, आकार रु. ००-९६ पैसे, येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तद्ंगभुत वस्तुसह

वर नोटीस कलम २ मध्ये नमूद केलेली मिळकत ही अतुल मल्लिकार्जुन कुंभारे, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, यांना त्यांचे वडिलांकडून वाटपाने आलेली आहे. तसेच नोटीस कलम ३ मध्ये नमूद केलेली मिळकत ही अरविंद निळकंठ हुणचगी, व महानंदा अरविंद हुणचगी रा. राजगुरु नगर, ता. खेड, जि. पुणे यांच्या खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम घेतलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकती ह्या निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदीदेणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. २८/०८/२०२५.

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड**
**ॲड. अमृतराज पं. पाटील,**
रा. घर नं. ३९२२, भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९०२१३२०१५०
(खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अनाहत, सेंथीलकुमार राष्ट्रीय स्क्वॅश विजेते



अनाहत सिंग



सेंथीलकुमार

**नवी दिल्ली :** येथील ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियममध्ये गुरुवारी झालेल्या ८१ व्या राष्ट्रीय स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेत अनाहत सिंगने आपल्या वर्चस्वाचा फायदा घेत महिला विजेतेपद पटकावले. दरम्यान, वेलावन सेंथिलकुमारने अंतिम फेरीत प्रतिस्पर्धी आणि अव्वल मानांकित अभय सिंगचा ११-८, ११-९, ४-११, ११-८ असा पराभव करून पुरुष विजेतेपद पटकावले. महिलांच्या अंतिम फेरीत १७ वर्षीय अनाहतने दुसऱ्या मानांकित आकांक्षा साळुंखेचा ११-७, ११-६, ११-४ असा पराभव केला. २०२२ मध्ये जोश्ना चिनप्पाकडून अंतिम फेरीत पराभूत झालेल्या अनाहतने त्यानंतर भारतीय स्क्वॅशची राणी म्हणून सूत्रे हाती घेतली आहेत. गत तीन वर्षांत अभयपेक्षा दोनदा उपविजेता राहिलेल्या २७ वर्षीय वेलावनसाठी २०२३ मध्ये पहिल्या क्रमांकानंतर हा दुसरा राष्ट्रीय मुकुट होता.

### जागतिक बुद्धिबळ लीगमध्ये तीन नवीन खेळाडूंना संधी

**मुंबई :** फ्रेन्चायझी-आधारित जागतिक बुद्धिबळ लीगच्या (जीएसएल) तिसऱ्या आवृत्तीपूर्वी नवीन स्पर्धक उपक्रमाद्वारे जगभरातील तीन विजेते जीएसएलमध्ये सहभागी होतील, अशी घोषणा आयोजकांनी गुरुवारी येथे केली. टेक महिंद्राच्या संयुक्त उपक्रमातील जीएसएलची तिसरी आवृत्ती १३ डिसेंबरपासून सुरू होईल. जीसीएल स्पर्धक अंतर्गत नवीन प्रतिभा शोधण्याचा जागतिक उपक्रम गुरुवारपासून नोंदणीसह सुमारे दोन महिन्यांत आयोजित केला जाईल. हौशी आणि तज्ज्ञ बुद्धिबळपटूंसाठी हा उपक्रम खुला आहे. ही बहु-स्तरीय स्पर्धा तळागाळातील प्रतिभेला उजाळा देईल, बुद्धिबळ समुदायाला बळकटी देईल आणि विजेते जगातील अव्वल दर्जाच्या बुद्धिबळपटूंसमवेत समान मंचावर पाऊल ठेवतील, असे जीसीएलने म्हटले आहे.

### प्रो-लीग हॉकीमध्ये भारत, पाकिस्तान लढती होणार

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या (एफआयएच)पुरुषांच्या प्रो-लीगच्या सातव्या हंगामात पाकिस्तान अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, इंग्लंड, जर्मनी, भारत, नेदरलॅण्ड व स्पेन संघांचा सहभाग निश्चित झाला आहे. एफआयएच प्रो-लीग २०२५-२६ च्या हंगामात पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यात दोन सामने खेळवण्यात येणार आहेत. पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाचे (एफआयएच) न्यूझीलंडची जागा घेण्याचे आमंत्रण स्वीकारले आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला मलेशियामध्ये झालेल्या नेशन्स चषकाच्या अंतिम फेरीत पाकिस्तानला हरवून न्यूझीलंडने प्रो-लीगच्या पुढील हंगामासाठी पात्रता मिळवली होती. तथापि, हॉकी न्यूझीलंडने नंतर सूचित केले की आम्ही स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही.

### ''स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-** ग्रँडमास्टर चेस अकॅडमी व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक खुली, १६, १२ व ८ वर्षाखालील गटाच्या जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवार ३१ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता सात रस्ता येथील उपलप मंगल कार्यालयात केले आहे. खुल्या गटातील प्रथम येणाऱ्या चार मुले व चार मुलींची निवड मुंबई येथे होणाऱ्या राज्य बुद्धीबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे.
निवड झालेल्या प्रत्येक खेळाडूंना रु. १०००, तसेच एकूण ३०००० रुपयापर्यंतचे रोख बक्षिसे, मेडल व आकर्षक चषक देऊन विजेत्यांना देऊन गौरविण्यात येणार असुन स्पर्धेत एकूण ६० पारितोषिके देण्यात येणार असल्याबाबतची माहिती ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे अध्यक्ष सरस्वती झंपले व सचिव गणेश मस्कले यांनी दिली. आयोजकांकडून निवासाची व्यवस्था मोफत केल्याचे संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड यांनी सांगितले आहे. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ व प्रज्वल कोरे मो.क्र. ८८३०६२२२२१ यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी केले आहे.

# उपविजेता प्रज्ञानंद ग्रॅण्ड चेस टूर फायनल्ससाठी पात्र

### वेस्ली सो सिंक्विफिल्ड चषक विजेता

♦ **सेंट लुईस, २८ ऑगस्ट**

अमेरिकेच्या वेस्ली सो याने येथे आयोजित सिंक्विफिल्ड चषक विजेतेपद पटकावले. भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने उपविजेतेपद मिळविले आणि ग्रॅण्ड चेस टूरच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. वेस्ली सोने नाट्यमय तीन-मार्गी प्लेऑफ विजयासह विजेतेपदावर आपले नाव कोरले.



विजेता वेस्ली सो उपविजेत्या आर. प्रज्ञानंदशी हस्तांदोलन करताना

सोने नवव्या आणि शेवटच्या फेरीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हला हरवले आणि प्रज्ञानंद आणि त्याचा सहकारी फॅबियानो कारुआना यांच्याशी ५.५ गुणांसह बरोबरी केली. त्यानंतर तो संभाव्य दोन पैकी १.५ गुणांसह प्ले-ऑफमध्ये गेला.

प्रज्ञानंदने अमेरिकेच्या लेव्हॉन आरोनियनशी बरोबरी साधली आणि टायब्रेकमध्ये कारुआनाला हरवून एका गुणाने दुसरे स्थान मिळवले, तर टायब्रेकरमध्ये सो विरुद्ध त्याने एकमेव बरोबरी साधल्यानंतर दुसऱ्या स्थानावर असलेल्या कारुआनाला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

ग्रॅण्ड चेस टूरमध्ये फ्रान्सचा मॅक्सिम वॅचियर-लाग्राव्ह आधीच सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू असल्याने, लेव्हॉन ॲरोनियनने कारुआना आणि प्रज्ञानंदासह जीसीटी ग्रॅण्ड फिनालेसाठी देखील पात्रता मिळवली.

क्लासिकल विभागात, सो, कारुआना आणि प्रज्ञानंदने प्रत्येकी ५.५ गुणांसह समान अव्वल स्थान मिळवले, तर ॲरोनियन त्याच्या नऊ सामन्यांतून ५ गुणांसह एकट्याने चौथे स्थान मिळविले.

वॅचियर-लाग्राव्ह, अमेरिकेचा सॅम्युअल सेव्हियन आणि पोलंडचा डुडा जान-क्रिज्झटोफने प्रत्येकी ४.५ गुणांसह पाचवे स्थान मिळवले. ते जागतिक विजेता डी. गुकेश यांच्यापेक्षा अर्धा गुणांनी पुढे आहे. फ्रान्सचा अलिरेझा फिरोझा ३.५ गुणांसह नवव्या स्थानावर राहिला तर अब्दुसत्तोरोव्ह एकूण २.५ गुणांसह शेवटच्या स्थानावर राहिला.

आता सर्व दिग्गज बुद्धिबळपटू उझबेकिस्तानला जाणार असून तिथे ते ३ सप्टेंबरपासून होणाऱ्या ग्रॅण्ड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत खेळणार आहे. सर्वात मजबूत स्विस स्पर्धेत जगातील बहुतेक अव्वल खेळाडू अव्वल दोन रँकिंगमध्ये स्थान मिळविण्यासाठी स्पर्धा करतील, जे पुढील कॅण्डिडेट स्पर्धेत स्थान निश्चित करेल. या स्पर्धेतील विजेता पुढील जागतिक अजिंक्यपद सामन्यात गुकेशसाठी आव्हान देणारा ठरेल. प्रज्ञानंद हा आतापर्यंत कॅण्डिडेट स्पर्धेसाठी पात्र ठरलेला एकमेव भारतीय आहेत. *(वृत्तसंस्था)*

# सिंधू, ध्रुव-तनिषा उपांत्यपूर्व फेरीत

### बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन

♦ **पॅरिस, २८ ऑगस्ट**

माजी विश्वविजेती पी. व्ही. सिंधू व ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या मिश्र दुहेरी जोडीने गुरुवारी पॅरिसमध्ये आयोजित बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.



दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती ३० वर्षीय सिंधूने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या वांग झी यीचा ४८ मिनिटांत २१-१९, २१-१५ असा पराभव केला आणि अंतिम आठमध्ये तिचा सामना नवव्या मानांकित इंडोनेशियन पुत्री कुसुमा वर्दानीशी होईल. सिंधूने या स्पर्धेत आपल्या तीन सामन्यांमध्ये एकही गेम गमावलेला नाही. पाच वेळा जागतिक पदक विजेत्या सिंधूने पहिल्या गेममध्ये चमकदार सुरुवात केली. मध्यंतराला तिने जोरदार स्मॅश आणि नेट विनरसह ११-६ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये सिंधूने दबाव कायम ठेवला व पुन्हा एकदा ११-६ अशी आघाडी घेतली.

भारतीय खेळाडूने आता जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत चिनी प्रतिस्पर्ध्यांविरुद्धचे तिचे सर्व आठ सामने जिंकले आहेत. जागतिक क्रमवारीत १५ व्या क्रमांकावर असलेली सिंधू उपांत्यपूर्व फेरीत नवव्या मानांकित इंडोनेशियन पुत्री कुसुमा वर्दानीशी लढेल. तिने २३ वर्षीय वर्दानीचा चार वेळा सामना केला आहे व तिचा विजयाचा रेकॉर्ड २-२ आहे.

ध्रुव आणि तनिषाने पिछाडीवर राहिल्यानंतर जोरदार मुसंडी मारून हाँगकाँगच्या तांग चुन मान आणि त्से यिंग सुएत या जोडीचा ६३ मिनिटांत १९-२१, २१-१२, २१-१५ असा पराभव केला. जागतिक क्रमवारीत ५ व्या स्थानावर असलेल्या तांग व त्से या आशियाई विजेत्या व दोन वेळा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेत्या आहेत.

आम्ही यावेळी चांगली तयारी केली. आम्ही सामन्याच्या कोणत्याही टप्प्यावर हार मानली नाही हे महत्त्वाचे, असे तनिषा म्हणाली. *(वृत्तसंस्था)*

## तालुका बुद्धिबळ स्पर्धेत सुलाखे हायस्कूलचा सोहम शेटे प्रथम

**बार्शी दि.२८ ऑगस्ट-** शालेय तालुका बुद्धिबळ स्पर्धेत येथील सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलचा सोहम शेटे याने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रथम तर उदयानंद सोमनाथ दळवी याने द्वितीय क्रमांक पटकविला. तसेच १४ वर्षांखालील गटात मुलांमध्ये रुद्र पवार याने तृतीय आणि मुलींमध्ये राधिका वायचळ हिने चौथा क्रमांक मिळविला. या सर्व खेळाडूंची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. या विदयार्थ्यांना शिक्षक प्रमोद माळी, समीर वायकुळे, संतोष पवार, सुहास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे बार्शी एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंद सुलाखे, सचिव अनंत कवठाळे, प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर, उपमुख्याध्यापक राम कृष्ण इंगळे, आदींनी अभिनंदन केले.



# दानिश मालेवार, पाटीदारचे शतक

### दुलीप करंडक क्रिकेट

♦ **बंगळुरू, २८ ऑगस्ट**

येथे गुरुवारपासून प्रारंभ झालेल्या बीसीसीआयच्या दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्यपूर्व सामन्यात मध्य विभागाचे प्रतिनिधीत्व करताना विदर्भाच्या दानिश मालेवार व रजत पाटीदारने उत्तर-पूर्व विभागाविरुद्धच्या सामन्यात शतके झळकावलीत. या दोघांचे शतक व जखमी निवृत्त आर्यन जुयालच्या (६०) अर्धशतकाच्या बळावर मध्य विभागाने पाऊस व ढगाळ वातावरणाने अडथला आणण्यापूर्वी पहिल्या डावांत ७७ षटकांत २ बाद ४३२ धावांचा डोंगर रचला.

खेळ थांबला तेव्हा मालेवार नाबाद १९८ धावांवर, तर विदर्भाचाच यश राठोड नाबाद ३२ धावांवर खेळत होते.

डावाची सुरुवात करताना सलामीवीर आयुष पांडे ३ धावांवर बाद झाला, त्याला आकाश चौधरीने छेत्रीकडून झेलबाद केले. सलामी जोडीदार आर्यन जुयाल ६० धावांवर खेळत असताना जखमी निवृत्त झाला. त्यानंतर दानिश मालेवार व रजत पाटीदारने तडाखेबंद फलंदाजी केली व शतके झळकावलीत. पाटीदारने ९६ चेंडूंत २१ चौकार व ३ षट्काराच्या मदतीने १२५ धावा केल्या. पुढे मालेवारने यश राठोडसोबत नाबाद खेळी केली. मालेवारने २१९ चेंडूंचा सामना करत तब्बल ३५ चौकारव एका षट्कारसह नाबाद १९८ धावांची खेळी केली, तर यश राठोडने २७ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ३२ धावा केल्या.

**उत्तर विभागाच्या ६ बाद ३०८ धावा**

पूर्व विभागाविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात उत्तर विभागाने पहिल्या डावात ७५.२ षटकांत ६ बाद ३०८ धावा काढल्या.

उत्तर विभागाच्या सर्व फलंदाजांनी थोडे-थोडे योगदान देत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. सलामीवीर शुभम खजुरिया (२६), कर्णधार अंकित कुमार (३०), यश डुल (३९), आयुष बदोनी (६३), निशांत सिंधू (४७) व कन्हैया वधावनने (नाबाद ४२) भरीव योगदान दिले. *(वृत्तसंस्था)*

## तालुका कुस्ती स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयाचे ठोंगे, कुचेकर अजिंक्य

**बार्शी दि २८ ऑगस्ट-** तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सोनाली ठोंगे हिने ५० किलो खालील वजनी गटात व अनुशा कुचेकर हिने ६० किलो वजनी गटात अजिंक्यपद पटकाविले. त्यांना प्रा. संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य शेख यांनी अभिनंदन करून जिल्हा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# तालुका खो-खो स्पर्धेत लोकविकास वेळापूर विजेता



### जिल्हास्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २८ ऑगस्ट-**

येथील लोकविकास इंग्लिश मिडियम स्कूल वेळापूर येथे झालेल्या तालुका खो खो स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली.

संघास क्रीडा शिक्षक अजित बनकर, सागर एकतपूरे, नितिन बनकर, प्रज्वल धनवटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, उपसंरपंच मल्हारी बनकर, रमेश बनकर ,वैभव बनसोडे, धनु शिवपूजे, शहानवाज तांबोळी शिवाजी मंडले, अमोल साठे, मुख्याध्यापक अमोल पांढरे, सुनिल पताळे आदिनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ :** यश कदम, यश बनसोडे, आदित्य जाधव, चैतन्य सांळुखे, प्रतिक बनसोडे, आयुष्य जंवजाळ, कार्तीक बनसोडे, साईराज थिटे, स्वरूप लोहकरे, मंथन पांढरे, नूर शेख, शुभम लोंढे, तन्मय कांबळे, शिवम वागरे, पृथ्वीराज भाकरे.



# व्हॅलेंटाईन व आयडियल स्कूल दुहेरी मुकुटाचे मानकरी

### सूर्या चषक थ्रोबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सूर्या चषक निमंत्रित थ्रोबॉल स्पर्धेत आयडियल स्कूलने १४ व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात तर व्हॅलेन्टाईन्स स्कूलने १७ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. थ्रोबॉल असोसिएशन सोलापूर व सुशीलकुमार शिंदे बीपीएड कॉलेज यांच्या संयुक्त विद्यामाने व उद्योजक राजकुमार सुरवसे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केली होती. बक्षीस वितरण जिम्नॅस्टिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य कार्तिक चव्हाण यांच्या हस्ते व थ्रोबॉल असोसिएशन सोलापूरचे जिल्हाध्यक्ष प्रा. संतोष खेंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी रवींद्र चव्हाण, श्रीधर गायकवाड, संतोष पाटील आनंद लिगाडे हे उपस्थित होते. पंच प्रमुख म्हणून संतोष पाटील यांनी काम पाहिले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**१४ वर्षे :** मुले : आयडियल स्कूल, ऑर्चिड स्कूल, व्हॅलेन्टाईन स्कूल. मुली : व्हॅलेन्टाईन स्कूल, आयडीयल स्कूल, ऑर्चिड स्कूल.

**१७ वर्षे :** मुले : व्हॅलेन्टाईन्स स्कूल, आयडीयल स्कूल, ऑर्चिड स्कूल. मुली : आयडियल स्कूल, व्हॅलेंटाईन स्कूल.

# पुण्यात आज ३३१ पदक विजेत्यांचा गौरव, २९ कोटींची बक्षिसे

## राष्ट्रीय क्रीडादिनी मिशन लक्ष्यवेध योजनेचा शुभारंभ, १६० कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २८ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय पदकविजेत्यांसह राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ३३१ पदकविजेत्यांना रोख पारितोषिकाने गौरविण्यात येणार आहे. यावेळी मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटरचा शुभारंभही केला जाणार आहे.

पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग सभागृहात शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता राष्ट्रीय क्रीडा दिन समारंभ होईल. याप्रसंगी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुणे जिल्हातील खासदार, आमदार, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रनजीतसिंह देओल, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहे.

### मिशन लक्ष्यवेध १२ खेळांची निवड, पहिल्या टप्प्यात ६ खेळ सुरु

या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या मिशन लक्ष्यवेध या महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ व बोधचिन्ह अनावरण केले जाईल. वार्षिक रु.१६० कोटी इतका खर्च मंजुर करण्यात आलेला या योजनेत १२ क्रीडा प्रकारांची निवड करण्यात आलेली असून, या सर्व क्रीडा प्रकारातून राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे, पहिल्या टप्प्यातील सहा क्रीडा प्रकारांच्या प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ शुक्रवारी होईल. यामध्ये ॲथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, रोईंग व लॉन टेनिस खेळाचा समावेश असल्याची माहिती सहसंचालक सुधीर मोरे यांनी दिली आहे.



उत्तराखंड येथे फेबुवारीत संपन्न झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रने गौरवशाली कामगिरी केली होती. ५५ सुवर्ण, ७० रौप्य व ७६ कांस्य अशी एकूण २०१ पदके पटकावून, सहभागी राज्यांमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेतील ३१४ पदकविजेत्या खेळाडूंचा गौरव केला जाणार आहे. सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकविजेत्यांना अनुकमे रू. ७, ५, ३ लाख रोख बक्षिस दिले जाणार आहे. मार्गदर्शकांना अनुक्रमे रू. ५०, ३० व २० हजारांचे पारितोषिक दिले जाणार आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्यांमध्ये ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आशियाई पदक विजेती राही सरनोबत, आदिती स्वामी, ऑलिम्पिकपटू देवेंद्र वाल्मिकी, विश्व करंडक विजेती प्रियंका इंगळे या दिग्गज क्रीडापटूंचा समावेश आहे. सर्वाधिक ८ पदकांचा विक्रम करणाऱ्या आदिती हेगडे हिला ३२ लाखांचे बक्षिस प्राप्त होणार आहे. राज्याच्या क्रीडा धोरण-२०१२ नुसार,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू व मार्गदर्शकांना रु.२८.७० कोटी रकमेची रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. आंतराराष्ट्रीय स्पर्धेत पदकाची लयलूट करणाऱ्या ६ पदकविजेत्यांचाही गौरव केला जाणार आहे.



# पंढरपूरची किरण जाधव सुवर्ण पदकाची मानकरी

### राज्य ज्यूदो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २८ ऑगस्ट-**

लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय ५२ व्या सब-ज्युनिअर ज्यूदो स्पर्धेत किरण प्रकाश जाधव हिने १३ ते १५ वयोगटात सुवर्णपदक पटकाविले. किरणने ४४ किलो वजनी गटात ही कामगिरी केली. महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन व दि. लातूर ज्यूदो असोसिएशनतर्फे पुनीत बालन ग्रुप यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित केली होती.

किरण ही मूळची पंढरपूरची असून तिचे प्राथमिक ज्यूदो प्रशिक्षण योद्धा गुरुकुल फाउंडेशन संलग्न सोलापूर जिल्हा ज्यूदो असोसिएशनच्या ज्यूदो क्लब पंढरपूर येथे झाले. तिला प्रशिक्षक योगेश राजेंद्र भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या ती श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे, पुणे येथील क्रीडा प्रबोधनीमध्ये सराव करत असून प्रशिक्षिका मधुश्री देसाई व प्रज्ञा पाटील यांच्याकडून ती पुढील प्रशिक्षण घेत आहे. किरण व तिचे प्रशिक्षक सोलापूर ज्यूदो असोसिएशनच्या सचिव वैशाली ओमप्रकाश पवार यांनी अभिनंदन केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शेती महामंडळ कामगारांचा आढावा घेण्याचे महसुलमंत्र्यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २८ ऑगस्ट-**

शेती महामंडळातील कायम व नैमैतिक कामगारांच्या प्रश्नासंबंधी महसुलमंत्री चंदशेखर बावनकुळे यांनी कामगारांच्या सद्य स्थितीचा आढावा घेण्याचे आदेश महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांना दिल्याची माहिती श्रीपूर शेती मंडळाचे कामगार प्रतिनिधी भालचंद्र शिंदे यांनी दिली.



राज्यात शेती महामंडळाचे एकूण १४ मळे असून हजारो एकर जमीन महामंडळाकडे होती. परंतू सततच्या अर्थिक तोट्यामुळे महामंडळाने या जमिनी कसण्याचे सोडून दिले. दरम्यान खंडकऱ्यांनी आमच्या जमिनी आम्हांस परत मिळाव्यात यासाठी लढा दिला. त्याप्रमाणे यातील काही जमिनी खंडकऱ्यांना देण्यात आल्या उर्वरित जमिनी महामंडळ वार्षीक भाडेतत्वावर पिकविणेस देत आहे. परंतू या सर्व परिस्थितीत शेती महामंडळाकडे काम करणारे कायम, नैमैतिक कामगार यांची महामंडळाकडे असणारी देणी व विशेष करून हे कामगार महामंडळाचे जागेत राहत असल्याने व सध्या उत्पन्नाचे साधन नसल्याने बाहेरच्या महागड्या जागा खरेदी करू शकत नाहीत. सध्या राहत असलेल्या ठिकाणी त्यांना बांधकाम परवाना व नागरी सुविधा मिळत नसल्याने त्यांचे जगणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कामगार लढा कृती समितीने रामराजे निंबाळकर आयोगाच्या शिफारशी नुसार कामगारांना राहण्यासाठी दोन गुंठे जमीन मिळावी. ४ था व ५ व्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम, समान दाम समान वेतन, ग्रॅज्युईटीची १०० कोटीची रक्कम, कायम कामगार ५ एकर जमीन, नैमैतिक कामगारांना दोन एकर जमीन अशा प्रमुख मागण्या महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केल्या आहेत. याप्रसंगी कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे व महसूल राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते. कामगार कृती समितीचे म्हणणे ऐकून घेवून महसुलमंत्री बावनकुळे यांनी शेती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक, पुणे यांना संपूर्ण चौदा माळ्याची माहिती गोळा करून कामगार राहत असलेल्या खोल्याची व कुटुंबाची सध्याची स्थिती तसेच सर्व मळ्यावर शेती शिल्लक किती याबाबतची माहिती घेण्याचे आदेश देवून दहा दिवसात अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान शेती महामंडळाचे कामगारांची स्थिती पाहता ८ ते ९ हजार घरकुले बांधून देण्याचे आश्वासन महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले. यावेळी शेती महामंडळ लढा कृती समितीचे प्रतिनिधी सुभाष कुलकर्णी, सागर (बाबा) मिसाळ, अँड,संजय चंदनशिवे, शेखर काटे, विनूनाथ भोईज, आकाश पवार, बाबासाहेब सावंत, भिकन शिंदे, सुभाष गुरव, भालचंद्र शिंदे, अमोल चव्हाण उपस्थित होते.

## महत्वाचे...



## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे गुरुकुल प्रकल्पांतर्गत क्षेत्र भेटीचे आयोजन

**पिलीव, दि. २८ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या पाचवी ते आठवी गुरुकुलच्या विद्यार्थीनींची मिनी गुरुकुल प्रकल्पा अंतर्गत स्फूर्ती टेकनालाजी व तुकाराम मळा याठिकाणी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान स्फुर्ती टेकनालाजीचे मालक व कर्मवीर विद्यालयाचे १९८८ या वर्षीचे माजी विदयार्थी लेफ्टनंट कर्नल तुषार घाटे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. २० वर्ष सैनिदलात सेवा करुन सध्या शेतीमध्ये त्यांनी वेगवेगळ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कायापालट केला आहे. त्यांनी ब्राझील मधील लाल मिरा या वनस्पतीची लागवड करुन त्यापासुन तेल निर्मीती व विविध औषधी वनस्पती व भारतीय सैन्य दलाबददल मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक किरगत यांच्या हस्ते तुषार घाटे व त्यांच्या पत्नी सोनीया घाटे यांचा सन्मान केला. सूत्रसंचालन जमदाडे यांनी केले. यावेळी मुटकुळे, जाधव, आठरे, कदम, जाधव, वाघमारे, कारंडे उपस्थित होते. या क्षेत्र भेटीचे आयोजन गुरुकुल विभाग प्रमुख झाडे यांनी केले. यावेळी तुषार घाटे यांच्यावतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.



## अक्कलकोटमध्ये विद्यार्थ्यांना वह्या तर महिलांना साडी वाटप

### सेवा गौरव पुरस्काराने मान्यवरांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २८ ऑगस्ट-**

येथील दिव्याग्नी जयंती उत्सव समितीतर्फे साठे नगर माणीक पेठेत महिलांना साडी वाटप, शालेय विद्यार्थ्यांना वही वाटप, मुकबधीर विद्यार्थ्यांना टावेल वाटप व मान्यवरांचा सेवा गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. संस्थापक अध्यक्ष उद्योगपती किसन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा संपर्कप्रमुख वसंत देडे, जिल्हा अध्यक्ष नागेश जाधव नेतृत्वाखाली क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक शंकर भाऊ तडाखे, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिवशरण जोजन यांच्या उपस्थितीत उत्कृष्ट सेवा पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी तहसीलदार विनायक मगर, पोलीस निरिक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग पवार, पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड या मान्यवरांचा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्काराने स्मृतीचिन्ह, फेटा, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नूतन पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांचाही सत्कार झाला. सुमारे १०५ गरीब महिलांना साड्यांचे, तर होतकरू गरीब विद्यार्थ्यांना १०५ वह्या वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी बाबाजी कांबळे, अनिल झंपले, पृथ्वीराज नाईक नवरे, अमर लोखंडे, राजू लोखंडे, संतोष पारखे, ज्ञानेश्वर कांबळे, लखन पाटोळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवानी भोसले, अतुल जाधव यांनी केले. वसंत देडे यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### जगदेवी हिरोळी



**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

बुधले गल्ली येथील जगदेवी प्रभय्या हिरोळी (वय ९२) यांचे वर्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी, सुन, नातू, नातवंडे असा परिवार आहे. श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे सचिव शांत या स्वामी यांचे त्या सासू होत.


### पत्रकार हर्षद लोहार



**बार्शी, दि. २८ ऑगस्ट-**

शहरातील युवा पत्रकार, हरहुन्नरी कलाकार, रियल न्यूजचे संपादक व व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल विंगचे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार (वय ३५) यांचे गुरुवारी पहाटे ५.३० वाजता निधन झाले. गेल्या दोन महिन्यांपासून ते मेंदूच्या गंभीर आजाराशी झुंज देत होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे. पत्रकारिता, समाजकारण व कलाक्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

### सरस्वतीबाई भूदत्त



**सोलापूर, दि.२८ ऑगस्ट -**

दत्तनगर येथील रहिवासी सरस्वतीबाई पोशेट्टी भूदत्त (वय- ८६) यांचे गुरुवार, दि. २८ ऑगस्ट रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, दोन मुली, नातवंडे व परतवंडे असा परिवार आहे. तानाबाना शोरूमचे चालक राजन भूदत्त यांच्या त्या मातोश्री होत.

### अंबुबाई गदगे



**सोलापूर, दि.२८ ऑगस्ट-**

सोलापूर येथील रहिवासी अंबूबाई अंबादास गदगे (वय-९३) यांचे दि. २७ ऑगस्ट रोजी पहाटे राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी तीन वाजता अक्कलकोट रोड स्मशान भूमि येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



## पदोन्नती मिळालेल्या सभासदांचा पतसंस्थेकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट -**

जिल्हा परीषदेत विविध विभागातून पदोन्नती मिळालेल्या नितीन जाधव, प्रभाकर डोईजोडे, समीर शेख, प्रसाद देवळे या सभासदांचा सोलापूर जिल्हा परिषद पतसंस्था कर्मचारी क्रमांक दोनच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ राज्य उपाध्यक्ष तथा पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन गिरीष जाधव व माजी चेअरमन रणजीत घोडके यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी के. पी. शिंदे, धन्यकुमार राठोड, ऋषिकेश जाधव, सुनिता भुसारे, मकरंद बनसोडे, सतीश लोंढे, विजय हराळे, बिरू वाघमारे, महेश जाधव आदी कर्मचारी व सभासद उपस्थित होते.



## जुळे सोलापूरात घंटागाडी येईना वेळेवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ ऑगस्ट-**

जुळे सोलापूर परिसरातील रूबी, नगर, बँक कॉलनी, पूनम नगर, अमोल नगर, भीमा नगर परिसरात घंटागाडी वेळेवर येत नसल्याने कचऱ्याची समस्या झाली आहे.

गेल्या काही दिवसापासून घंडागाडी येण्यामध्ये नियमितता दिसत नाही. आठ दिवसातून एकदा गाडी येत असल्याने घरोघरी व सार्वजनिक ठिकाणी कचरा साठून दुर्गंधी होत आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ ऑगस्ट-**

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतीची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नविन संधि विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिललेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना आहे. बेरोजगार उमेदवारांनी उद्योग उभारणीसाठी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे. दहा लाखांवरील उत्पादन उद्योग व पाच लाखांवरील सेवा उद्योगासाठी शिक्षण ८ वी पास, वार्षिक उत्पन्नाची अट नाही. वैयक्तिक, भागिदारी, वितीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट/संस्था सोसायटी स्वयंसहाय्यता बचत गट नविन उद्योगासाठी योजना लागू आहे. कुटुंबातील एक व्यक्तीस (पती किंवा पत्नी) लाभ घेता येईल. अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या व महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा. अर्ज करण्याची वेबसाईट https://maha-cmegp.gov.in_ तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व इतर योजनांबाबत या कार्यालयात ऑनलाईन प्रस्ताव निशुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यांत आली आहे. या योजनेसाठी जिल्हा उद्योग केंद्र सोलापूर कार्यालयातीलच अधिकृत अधिकारी व कर्मचारी यांचेशी संपर्क साधावा. या कामासाठी बाहेरील खाजगी एजंट, दलाल, सल्लागार यांचेशी संपर्क करू नये. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, कार्यालय, किल्लेदार मंगल कार्यालयाचा बाजूस, अग्रेसन भवन समोर, आसरा चौक, होटगी रोड, सोलापूर, येथे संपर्क करावा. असे आवाहन महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर यांनी केले आहे.



## वांगीच्या हनुमान मंदिराचा कळसारोहण उत्साहात

### काशीपीठ जगद्गुरूंची अड्डपालखी मिरवणूकीत महिलांचा मोठा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि.२८ ऑगस्ट-**

वांगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री हनुमान मंदिरात दि. २४ ते २८ ऑगस्ट या कालावधीत शिखर कळसारोहण, श्री गणेश व नंदी बसवेश्वर मूर्ती प्राणप्रतिष्ठापना तसेच अड्डु पालखी महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्यास श्री. श्री. श्री. १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी (काशीपीठ) यांचे पावन सान्निध्य लाभले. स्वामीजी यांची अड्डु पालखी मिरवणुक काढण्यात आली. त्याचसोबत वेदमुर्ती महांतेश हिरेमठ स्वामीजी (तद्देवाडी) आणि श्री. ष. ब्र. निलकंठ शिवाचार्य महास्वामीजी (नागणसूर) यांचे पावन सान्निध्य लाभले. महोत्सवामध्ये भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अखेरच्या दिवशी अड्डु पालखी मिरवणुकीनंतर शिखर कळसारोहण सोहळ्याने महोत्सवाचा समारोप झाला. पीर महादेव प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम, नृत्य सादर करून जगद्गुरु, गावातील कन्या, गृहलक्ष्मी तसेच भाविकांचे स्वागत केले. महोत्सव काळात सुवासिनी पूजन, कलश व वस्त्र वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि धर्मसभा यांसारखे विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात आले. या महोत्सवात तब्बल ७५१ पेक्षा अधिक सुवासिनींनी सहभाग नोंदवून स्त्रीशक्तीच्या श्रद्धा-भावनेचे अनोखे दर्शन घडविले. गावातील कन्या व गृहलक्ष्मी यांनी एकत्रितपणे कलश मिरवणूकीत सहभाग घेतला. मंदिराच्या शिखरारोहण सोहळ्यात आपले स्थान अधोरेखित केले.

या सोहळ्यास आमदार सुभाष देशमुख, रामप्पा चिवडशेट्टी, मळसिद्ध मुगळे, जय हनुमान तरुण मंडळाचे पदाधिकारी यांच्यासह हजारो भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित होते. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. जय हनुमान तरुण मंडळ व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## मंद्रुप परीसरातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामा करा

### शिवसेना उपजिल्हा प्रमुख अण्णप्पा सतुबर यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर मंद्रुप अप्पर तहसिल क्षेत्रात येणा-या मंद्रुप, औराद व निंबर्गी या तीन मंडलातील पावसामध्ये नुकसान झालेल्या शेतक-यांच्या पिकांचा पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्यात यावे, या मागणीचे निवेदन शिवसेना जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यात १५ मे पासून सतत पावसाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे तुर, कांदा, सोयाबीन, उडीद, मुग अशा पिकांचे व विशेष करुन द्राक्ष बागयातदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. द्राक्षपीकांवर करपा, दावणी, भुरी अशा प्रकारचे रोग पडुन संपुर्ण बागा उध्वस्त झालेल्या आहेत. तसेच शेतामध्ये पावसाचे पाणी साठुन द्राक्षपिकांची मुळे निकामी झाली आहेत. तरी तात्काळ नुकसान झालेल्या शेतातील पिकांचा पंचनामा करुन एकरी ५० हजार प्रमाणे शेतक-यांना नुकसान भरपाई मिळावी. जेणेकरुन त्यांच्यावरील आर्थिक संकट कमी होण्यास हातभार लागेल, अशी मागणी करण्यात आली आहे . त्याचबरोबर सिना, भिमा नदी व अनेक ओढयांना पाणी येऊन आजूबाजूच्या शेतक-यांची ऊसासह अनेक पिके वाहुन गेली आहेत. मंद्रुप तहसिलदार सुजित नरहरे यांनी कुठल्याही प्रकारचे दखल घेत नसल्याने सदर शेतक-यांचे नुकसान होत आहे. तरी तात्काळ पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा सतुबर यांनी दिला आहे.

## बार्शीच्या महिलेची साडेनऊ लाखांची फसवणूक, पंढरपूरच्या कंत्राटदाराविरुध्द तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, २८ ऑगस्ट-**

बार्शी येथील एका २८ वर्षीय महिलेने पंढरपूर येथील कंत्राटदाराविरुद्ध ९ लाख ४८ हजार २३८ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी अंजली किरण काकडे (वय २८, रा. गाडेगांव रोड, म्हाडा कॉलनी, बार्शी) यांनी पंढरपूर येथील तेजस दत्तात्रय पाटील यांच्यावर फसवणुकीचा आरोप केला आहे. तेजस यांनी रस्त्याच्या कामात भागीदारीचे आमिष दाखवून फिर्यादीकडून पैसे आणि लॅपटॉप घेतल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. अंजली यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात सांगितले की, त्या बी.टेकच्या शिक्षणासाठी बार्शी येथील भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिकत असताना २० जानेवारी २०२१ रोजी जामगांव येथे सिमेंट रस्त्याचे काम सुरु होते. या कामाचे कंत्राट तेजस पाटील यांच्या पाटील कन्स्ट्रक्शन कंपनीकडे होते. अंजली यांनी कामाचा अनुभव घेण्यासाठी तेजस यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी भागीदारीत काम करण्याची ऑफर दिली. तेजस यांनी १० लाख रुपये गुंतवणुकीच्या बदल्यात २० लाख रुपये परतावा देण्याचे आश्वासन दिले आणि थोडे-थोडे पैसे गुंतवण्याची सोय असल्याचे सांगितले. या आमिषाला बळी पडून अंजली यांनी आपल्या पती, सासरे आणि सासूसोबत चर्चा करुन पैसे गुंतवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ५ मार्च २०२१ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत फोनपेद्वारे ३,९७,२३८ रुपये तेजस यांना दिले. याशिवाय, २० डिसेंबर २०२३ रोजी अंजली आणि त्यांचे पती यांनी पंढरपूर येथील एका हॉटेलमध्ये तेजस यांना ४,००,००० रुपये रोख दिले. तसेच, ५ जानेवारी २०२४ रोजी बार्शी येथील भगवंत ग्राऊंड येथे १,००,००० रुपये रोख स्वरुपात दिले. या व्यतिरिक्त, एप्रिल २०२१ मध्ये तेजस यांनी ऑफिससाठी कॉम्प्युटरची गरज असल्याचे सांगितल्यावर अंजली यांनी ५१,००० रुपये किमतीचा डेल कंपनीचा लॅपटॉप दिला. मात्र, कामाचे बिल मिळाले नसल्याचे सांगत तेजस यांनी अंजली यांना वारंवार टाळाटाळ केली. त्यांनी बिल काढण्यासाठी अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतील, असे सांगितले. काही काळानंतर तेजस यांनी अंजली यांचे फोन उचलणे बंद केले.




दुसऱ्या नंबरवरुन संपर्क साधल्यानंतर त्यांनी निवडणुकीमुळे बिल रखडल्याचे कारण सांगितले आणि वारंवार फोन न करण्यास सांगितले. मार्च २०२५ मध्ये अंजली यांनी पंढरपूर येथे तेजस यांच्या ऑफिसची चौकशी केली असता, ऑफिस बंद झाल्याची माहिती मिळाली. तसेच, तेजस यांनी इतर अनेक लोकांचीही फसवणूक केल्याचे समजले. तेजस यांचे वडील दत्तात्रय पाटील यांनीही आपल्या मुलाने अनेकांकडून पैसे घेतल्याचे मान्य केले आणि पोलिसांत तक्रार करण्याचा सल्ला दिला. अंजली यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, तेजस यांनी २० जानेवारी २०२१ ते ३० जून २०२४ या कालावधीत एकूण ८,९७,२३८ रुपये (३,९७,२३८ रुपये ऑनलाइन आणि ५,००,००० रुपये रोख) आणि ५१,००० रुपये किमतीचा लॅपटॉप, असे एकूण ९,४८,२३८ रुपयांची फसवणूक केली. बार्शी पोलिसांनी तेजस दत्तात्रय पाटील (रा. गादेगांव, ता. पंढरपूर) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री डॉ.रामदास आठवले यांना माळशिरस रिपाइं कडून मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२८ ऑगस्ट-**

माळशिरस तालुका व वेळापूर परिसरातील नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्यांचे निवेदन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांना सादर करण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक व शेतकरी वर्गाशी निगडित असलेल्या या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



या निवेदनात दलित-आदिवासींवरील अन्याय रोखण्यासाठी एस.सी.-एस.टी. अत्याचार प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी, सामाजिक कार्यकर्त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नेमणुकीचा आदेश तातडीने राबविणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळणे, केंद्र शासनाचा निधी राज्य शासनाने वळवू नये, यासाठी कायदेशीर तरतूद करणे, माळशिरस तालुक्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह उभारणे, वेळापूर येथे सुसज्ज एस.टी. बसस्थानक व आधुनिक पोलीस वसाहत उभारणे, शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणे,विविध मागासवर्ग महामंडळांची कर्जमाफी, तसेच 'लम्पी' आजाराने मृत झालेल्या जनावरांना नुकसानभरपाई व बाधित जनावरांवर मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करणे, अतिवृष्टी मुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी, आगामी संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधानातील सर्व दुरुस्त्यांसह संविधानाच्या प्रती उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी विशेषतः करण्यात आली. संबंधित विभागांना कार्यवाहीचे आदेश द्यावेत, अन्यथा रास्तारोको आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा देण्यात आल्याचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी सांगितले. यावेळी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस. एम. गायकवाड, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, संपर्क प्रमुख आणासो भोसले, ता. उपाध्यक महेंद्र लोंढे, कार्याध्यक्ष विनोद रणदिवे, संतोष बनसोडे, गौतम वाघंबरे, तुषार केंगार, सुधीर भोसले, स्वप्नील सरवदे, नितीन जाधव, दिलीप भोसले उपस्थित होते.

## महत्वाचे...



### मेहता शाळेत बाप्पाचे जल्लोषात स्वागत

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका रजनी कुलकर्णी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी लेझीमनृत्याचे ढोल-ताशाच्या गजरात उत्कृष्ट सादरीकरण केले. प्राथमिक शाळेच्या महिला शिक्षिकांनी देवा श्री गणेशा या गाण्यावर बहारदार लेझीम नृत्य सादर केले. लेखनिक सुजाता कुलकर्णी यांनी पर्यावरण पूरक गणपतीची सुंदर मूर्ती शाळेस दिली. यानंतर नागेश इनामदार यांनी विधिवत गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. संगीत शिक्षिका श्रुती कुलकर्णी यांनी मधुर आवाजात उठी उठी बा मोरेश्वरा हे गीत सादर केले. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रितपणे गणपती स्तोत्राचे पठण केले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्वांना गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले.



### रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर शाळेत श्री गणेश पूजन

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर शाळेत औचित्यपूर्ण आणि भक्तीभावपूर्ण वातावरणात श्री गणेश पूजन करण्यात आले. यावेळी राज्य गुप्त वार्ताचे निरीक्षक दीपाली जाधव उपस्थित होत्या. त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केली. याप्रसंगी बळीराम पावडे, आरती गांधी, डॉक्टर दर्शना गांधी, बबनराव पावडे, संध्या चंदनशिवे, विजया पिटाळकर, रेणुका पासपुले, विठ्ठल सातपुते, आनंद पारेकर, मदभावी, ठाकर यांसारखे मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन अजित पाटील यांनी तर आभार सचिव सुनील दावडा यांनी मानले. प्रमुख अतिथींच्या हस्ते पूजनाची विधी पार पडली आणि सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे श्री गणेशाची आरती केली.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये श्रींची प्रतिष्ठापना

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. सुरुवातीला झपके वाड्यामध्ये संस्था कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके यांच्या हस्ते श्रींची विधिवत पूजा संपन्न झाली. यावेळी संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सदस्य प्रफुल्लचंद्र झपके, चंद्रशेखर अंकलगी, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे उपस्थित होते. त्यानंतर वाजत-गाजत गणपतीची मिरवणूक सांगोला विद्यामंदिर येथे आली व प्राचार्य अमोल गायकवाड यांच्या हस्ते पूजा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास मुख्याध्यापिका शुभांगी पवार, शिल्पा ढाळे, रोहिणी महारनवर, सुकेशिनी नागटिळक यांचे हस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला. यावेळी टिपरी नृत्य, लेझीम व देखावा याचे सादरीकरण झाले व गणपतीची आरती करून सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आला. श्री गणेश मूर्ती नरेंद्र होनराव यांनी दिली. कार्यक्रमासाठी संस्था सचिव म.शं.घोंगडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे उपस्थित होते.





अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेयजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचे नातू चिरंजीव हर्षवर्धनराजे, नात चिरंजीवी तेजस्विनीराजे, स्वामिनीराजे यांनी विजय व्हिला फार्महाऊसवर आपल्या लाडक्या श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून महाआरती केली. याप्रसंगी श्री. जनमेयजयराजे आणि त्यांचा परिवार.

# नैसर्गिक नदी, नाले प्रवाह रेखांकनाचा समावेश मंजूर डी.पी. प्लॉनमध्ये आवश्यक

- **ब्लू नि रेड लाईननुसार बांधकाम परवानगी संदर्भात सोमवारपासून कार्यवाही करा**
- **महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

शहरातील नैसर्गिक नदी/नाला पाणी प्रवाहामुळे जलनिस्सारणाची सोय काही प्रमाणात होत असली तरी, सर्व नैसर्गिक नदी/नाल्यांचे प्रवाह त्यांचे रेखांकन मंजूर डी.पी. प्लॉन/प्रारूप डी.पी. प्लॉन (ड्राफ्ट डीपी) मध्ये योग्य रीतीने होणे आवश्यक आहे. तसेच यूडीसीपीआर नियमावली मधील नियमानुसार कार्यवाही करावी. दि.१ सप्टेंबर २०२५ पासून ब्लू लाईन व रेड लाईननुसार बांधकाम परवानगी संदर्भात कार्यवाही संबंधित उपअभियंता व कनिष्ठ



अभियंता (नगररचना विभाग) यांनी करावी, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत.

शहरातील नैसर्गिक नदी/नाला पाणी प्रवाहामुळे जलनिस्सारणाची सोय काही प्रमाणात होत असली तरी, सर्व नैसर्गिक नदी/नाल्यांचे प्रवाह त्यांचे रेखांकन मंजूर डी.पी. प्लॉन/प्रारूप डी.पी. प्लॉन (ड्राफ्ट डीपी) मध्ये योग्य रीतीने होणे आवश्यक आहे. तसेच यूडीसीपीआर नियमावली मधील नियम क्र ३.१.१ नुसार कार्यवाही ठेवण्याच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेश दिले आहेत. सोलापूर शहरातील आदीला नदीच्या पात्राच्या अनुषंगाने जलसंपादा विभागाकडून या नदीचे रेड लाईन व ब्लू लाईन मार्किंग करून त्याचे रेखांकन प्राप्त होणार आहे. सदर प्राप्त होणारे रेखांकन अंतिम राहील. या मार्किंग नुसार रेखांकन मंजूरी प्रस्ताव व बांधकाम परवानगी प्रस्तावा करिता यूडीसीपीआर नियमावली मधील नियम क्र ३.१.१ नुसार अभिप्राय देण्याची कार्यवाही संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी करावयाची आहे.

सोलापूर शहरातील प्रवाहित असणारे नाले पात्राच्या अनुषंगाने मंजूर डी.पी. प्लॉन /प्रारूप डी.पी. प्लॉन (ड्राफ्ट डीपी) उपलब्ध असलेले गाव नकाशे व डी.पी प्लॅन मध्ये दर्शविलेले नाल्याच्या पाण्याच्या प्रवाहाचे बाहेरील हद्दीपासून मार्किंग निश्चित करून रेखांकन मंजूरी प्रस्ताव व बांधकाम परवानगी प्रस्तावा करिता यूडीसीपीआर नियमावली मधील नियम क्र ३.१.१ नुसार अभिप्राय देणेची कार्यवाही सबंधित कनिष्ठ अभियंता यांनी करावयाची आहे. नगर रचना कार्यालयाकडून निर्गमित केले जाणारे झोन दाखले व मोजणी वर डिमार्केशन करिता अर्ज प्राप्त झाले नंतर अर्जदार यांचे मोजणी नकाशा नुस्त्रर उपरोक्त अ.क्र १ व २ नुसार मार्किंग कला विभागाकडील आरेखक, अनुरेखक व भूमापक यांचे कडून करून त्याप्रमाणे अभिप्राय देण्यासाठी कार्यवाही कनिष्ठ अभियंता यांनी ठेवण्याची आहे. दि.१ सप्टेंबर २०२५ पासून ब्लू लाईन व रेड लाईननुसार बांधकाम परवानगी संदर्भात कार्यवाही संबंधित उपअभियंता व कनिष्ठ अभियंता (नगररचना विभाग) यांनी कार्यवाही करावयाची आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेश दिले आहेत.



सोलापूर : गुरुवार पेठेतील श्री शंकरलिंग तरुण मंडळाकडून श्री शंकरलिंग मंदिराच्या ऐश्वर्य संपन्न गणपतीची प्रतिष्ठापना मिरवणुकीने मोठ्या जल्लोषात लेझीम खेळ सादर करीत झाली. याप्रसंगी कार्यकर्ते. प्रतिष्ठापनेनंतर भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा विविध प्रकल्प, ऑपरेशन्स आणि मेंटेनन्स केंद्रांसह समाजघटकांमध्ये आयोजित केल्या. टाटा पॉवर या वीज कंपनीने शाश्वत विकास आणि समाजाभिमुख उपक्रमांबद्दलची आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित करत, त्यांनी नैसर्गिक, रसायनमुक्त आणि बियाणे रोपण असलेल्या मूर्तींचा प्रचार करून उत्सव हरित करण्याचा मार्ग दाखवला आहे. या कार्यशाळांदरम्यान ख्यातनाम कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली २५० हून अधिक शाश्वत गणेशमूर्ती हाताने साकारल्या गेल्या.



यामध्ये ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला, ज्यामध्ये बहुसंख्य दिव्यांग विद्यार्थी होते. आचेगांव, अक्कलकोट, खंडके, सुपा,जेवळी आणि कोरल या अनेक ठिकाणी या कार्यशाळा पार पडल्या.

# यंदाचा युवा महोत्सव सांगोला महाविद्यालयात रंगणार!

- **सोलापूर विद्यापीठाकडून यजमानपदाची घोषणा!**
- **७ ते १० ऑक्टोबर दरम्यान युवा महोत्सव होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २१ वा उन्मेष सृजनरंगाचा युवा महोत्सव सांगोला येथील सांगोला महाविद्यालय येथे दि. ७ ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत रंगणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी दिली.

नृत्य, नाट्य, लोककला, ललित, वांग्मय, संगीत विभागातील एकूण ३९कलाप्रकारांचे सादरीकरण या युवा महोत्सवात होणार आहे. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील जवळपास २००० विद्यार्थी कलाकारांचा यामध्ये सहभाग असणार आहे. या युवा महोत्सवात लावणी, समूह गायन (भारतीय), कातरकाम, मूक अभिनय, प्रश्नमंजुषा (लेखी), वक्तृत्व मराठी, भारुड, काव्यवाचन, भित्तीचित्रण, मेहंदी, भजन, एकांकिका, शास्त्रीय

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. युवा महोत्सव उन्मेष सृजनरंगाचा



नृत्य, सुगम गायन, वक्तृत्व इंग्रजी, पथनाट्य, स्थळचित्रण, लोक वाद्यवृंद, जलसा, स्थळ छायाचित्रण, पोवाडा, शास्त्रीय सुरवाद्य, कथाकथन, मिमिक्री, व्यंगचित्र, कव्वालीप्रश्नमंजुषा (तोंडी), निर्मिती चित्र, शास्त्रीय गायन, पाश्चात्य समूहगायन, वक्तृत्व हिंदी, पाश्चिमात्य वादन, रांगोळी, शास्त्रीय तालवाद्य, मातीकाम आणि लोकनृत्याच्या स्पर्धा होणार आहेत. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा युवा महोत्सव आयोजनासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. त्यानुसार यंदाचा हा २१ वा युवा महोत्सव सांगोला महाविद्यालयात होणार आहे.

चार दिवस चालणाऱ्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांच्या उत्साह आणि आनंदाला उधाण येत असते. मागील अनेक वर्षापासून हा युवा महोत्सव अधिकाधिक दर्जेदार होत असून यामुळे चांगले कलाकार घडत आहेत. विद्यार्थी विकास विभागाकडून याचे सूक्ष्म नियोजन केले जाते. या युवा महोत्सवात विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले आहे.

# जनता बँकेच्या चारचाकी वाहन कर्ज मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## अवघ्या अर्ध्या तासात मिळाले कर्जमंजुरी पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे गणेशोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या चारचाकी वाहन कर्ज मेळाव्यात वाहन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना अवघ्या अर्ध्या तासात कर्जमंजुरी पत्र प्रदान करण्यात आले. या चारचाकी वाहन कर्ज मेळाव्यास पहिल्याच दिवशी सोलापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हुतात्मा स्मृती मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय चारचाकी वाहन कर्ज मेळाव्याचे उद्घाटन सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर बँकेचे संचालक राजेश पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे आणि पूजन आणि दीपप्रज्वलन करून चारचाकी वाहन कर्ज मेळाव्याचे उद्घाटन झाले. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले, चारचाकी वाहन घेणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी सोलापूर जनता सहकारी बँकेने आकर्षक व्याजदरासह कर्ज ग्राहकांना उपलब्ध व्हावे याकरिता तीन दिवसीय चारचाकी वाहन कर्ज मेळाव्याचे आयोजन केले आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहनही बँकेचे अध्यक्ष पेंडसे यांनी याप्रसंगी केले.



### आज आणि उद्याही राहणार चार चाकी वाहन खरेदीची सुवर्णसंधी

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे आयोजित करण्यात आलेला चारचाकी वाहन कर्ज मेळावा आज (दि. २९) आणि उद्या (दि. ३०) रोजी सुरू राहणार आहे. सोलापूरकरांनी एकाच छताखाली सर्व कंपन्यांच्या गाड्या पहाव्यात आणि बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या कर्ज योजनेचा लाभ घेऊन आपल्या चारचाकी गाडी खरेदीचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे म्हणाले, सर्व कंपन्यांची चारचाकी वाहने एकाच छताखाली नागरिकांना पाहता यावीत आणि चारचाकी वाहन खरेदी करता यावे याकरिता या वाहन कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी चारचाकी वाहन खरेदीसाठी ग्राहकांना तत्काळ कर्जमंजुरी पत्र देण्यात येत आहे. याप्रसंगी राजशेखर मिणजगी यांना पहिले चारचाकी वाहन कर्जाचे कर्जमंजुरी पत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर जनता सहकारी बँकेचे उपसरव्यवस्थापक मकरंद जोशी, उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, शाखा व्यवस्थापक मल्लिनाथ खुने, विलास दीक्षित, शैलजा देशपांडे, मंजिरी फडके आदी उपस्थित होते. सोलापूर जनता सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे यांनी प्रास्ताविक केले. पूनम बोडा यांनी सूत्रसंचालन तर उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## महत्वाचे...

### माहेरी गेलेल्या विवाहितेला भावाकडून मारहाण

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

माहेरी गेल्यानंतर विवाहितेला भावाकडून मारहाण करण्यात आली. ही मारहाण २७ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास दोन नंबर एसटी स्टँड परिसरात झाली. गौराबाई लक्ष्मण गोटे (वय ३८, या. शास्त्री नगर सोलापूर) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. यातील जखमी विवाहिता हिचे माहेर दोन नंबर एसटी स्टँड परिसरात आहे. २७ ऑगस्ट रोजी दुपारी विवाहिता आईला भेटण्याकरिता म्हणून तेथे गेली होती. त्यावेळी भाऊ अर्जुन अनंतकर याने दगडाने मारहाण केली. या मारहाणीत गौराबाई यांच्या उजव्या पायाला जखम झाली. गुरुनानक चौक येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री आठ वाजता रुग्णवाहिकेतून गौराबाई स्वतः शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### अज्ञातांनी फायटरने केलेल्या मारहाणीत एकजण जखमी

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

विजापूर रोड परिसरातील ब्रह्मचैतन्य नगर भागात गेले असता अज्ञातांनी फायटरने मारहाण केल्याने एक जण जखमी झाला. ही मारहाण २७ ऑगस्ट रोजी रात्री ११:४५ च्या सुमारास झाली. शिवशंकर मल्लेश पाटणकर ( वय ४३, भैरु वस्ती) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. शिवशंकर हे २७ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास विजापूर रोड परिसरातील ब्रह्मचैतन्य नगर भागात गेले होते त्यावेळी तेथे त्यांना सहा ते सात जणांच्या टोळक्याने अज्ञात कारणातून फायटरने मारहाण करून जखमी केले. यात शिवशंकर यांच्या डोक्याला जखम झाली आहे तसेच सर्वांगास मुका मार लागल्याने रात्री एक वाजता ते स्वतः उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल झाले.

### महिलेकडे पाहण्याच्या कारणावरून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

एकता नगर परिसरातून जाणारी मिरवणूक पाहत असताना पत्नीकडे पाहिल्याच्या रागातून तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. ही मारहाण २७ ऑगस्ट च्या रात्री ९.३० च्या सुमारास झाली. परशुराम अरुण मुंडलिक ( २१, या. एकता नगर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. एकता नगर परिसरात परशुराम हा २७ ऑगस्ट रोजी मिरवणूक पहात थांबला होता त्यावेळी त्यास माझ्या पत्नीकडे पाहिले असे म्हणून सोनू बुक्कानुरे व इतरांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुका मार लागल्याने परशुराम स्वतः रात्री दहाच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल झाल्याची नोंद सिव्हल पोलीस चौकीत झाली आहे

### मिरवणुकीत नाचताना धक्का लागल्याने तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

मिरवणुकीत नाचताना धक्का लागल्याने तरुणाला मारहाण करण्यात आली. २७ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० च्या सुमारास झाली. विजय विनोद कट्टीमनी (वय १९ रा. राहुल गांधी झोपडपट्टी सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. विजय हा गणपती मिरवणुकीत नाचत होता त्यावेळी त्याचा धक्का लागल्याने प्रेम जाधव आदित्य आवळे व इतर दोन जणांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुका मार लागल्याने रात्री दहा वाजण्याच्या सुमारास मावशीने उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले.











# डीजेमुक्त सोलापूरसाठी झाली मानवी साखळी

**• सजग सोलापूरकर समितीतर्फे विविध शाळा, महाविद्यालयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सोलापुरात कायमस्वरूपी १०० टक्के डीजेवर बंदी आणावी या मागणीकरिता गुरुवारी सोलापुरातील विविध १२ शाळा महाविद्यालयातील २ हजार विद्यार्थी - विद्यार्थिनींनी तसेच नागरिकांनी रस्त्यावर उतरून डीजे मुक्त सोलापूरचा नारा दिला. डीजेमुक्त सोलापूर व्हावे याकरिता गुरुवारी सात रस्ता ते चार हुतात्मा पुतळा या मार्गावर मानवी साखळी करण्यात आली.

प्रारंभी मानवी साखळीच्या मार्गावरील सात रस्ता येथील महाराणा प्रताप यांच्या मूर्तीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास तसेच सोलापूरच्या चार हुतात्म्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून मानवी साखळीस प्रारंभ झाला. या मानवी साखळीमध्ये संगमेश्वर महाविद्यालय, सुयश विद्यालय, हिंदुस्थानी कॉन्व्हेंट स्कूल, रॉजर्स स्कूल, मेरी बी हार्डिंग स्कूल, हरिभाई देवकरण प्रशाला, ज्ञानप्रबोधिनी, मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सेवासदन प्रशाला, सिद्धेश्वर प्रशाला अशा १० शाळा आणि महाविद्यालये सहभागी झाली होती.

सात रस्ता येथून प्रारंभ झालेली मानवी साखळी रंगभवन, होम मैदान, डफरीन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे चार हुतात्मा पुतळा परिसरापर्यंत तयार करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी डीजे मुक्त सोलापूर झालेच पाहिजे, बंद करा बंद करा कर्णकर्कश डीजे बंद करा अशा घोषणा दिल्या. तसेच डीजे मुक्त सोलापूर झाले पाहिजे या मागणीचे फलक हाती धरले होते.

**भर पावसात रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक**

गुरुवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. तरीही पावसाला न जुमानता डीजेमुक्त सोलापूरसाठी सरसावलेल्या शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींचे सोलापूरकरांनी कौतुक केले.

**अथर्वशीर्ष पठण**





**सोलापूर : मानाचा आजोबा गणपती समोर शहरात गुरुवारी पहाटे भर पावसात हजार महिलांनी अथर्वशीर्ष पठण केले.**

**अथर्वशीर्ष पठण**





**सोलापूर : मानाचा कसबा गणपतीच्या मंडपात महिलांनी इरकल साडी परिधान करून अथर्वशीर्ष पठण केले.**



*दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन...*

**सोलापूर : गणपती घाटावर गुरुवारी दीड दिवसाच्या घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यात आले.**

## जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ४५ प्रस्ताव

**२४ पुरस्कार देणार**

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पाच सप्टेंबर शिक्षकदिनी जिल्हा परीषदेकडून देण्यात येणाऱ्या २४ आदर्श शिक्षक पुरस्कारांसाठी ४५ प्रस्ताव दाखल झाले आहेत.

दहा वर्षापेक्षा अधिक काळ काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रस्तावांची तपासणी सुरू आहे. एका तालुक्यातील प्रस्तावाचे दुसऱ्या तालुक्याच्या अधिकाऱ्यांकडून तपासणी सुरू असून लवकरच पुरस्काराप्राप्त शिक्षकांची नावे जाहीर करण्यात येणार असल्याची माहीती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली. जिल्हा परिषदेकडून सर्वसाधारण ११, शिष्यवृत्ती ११, माध्यमिक १ व कला, क्रीडा व संगीत या क्षेत्रातून १ असे २४ पुरस्कार देण्यात येणार आहे. तपासणीसाठी प्रत्येक तालुक्यात तीन सदस्यांची समिती असून यामध्ये गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचा समावेश आहे.

## पणजोबा गणपतीला २१ किलो चांदी अर्पण

**'लोकमान्य'च्या श्रींची भक्तिभावाने प्रतिष्ठापना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पत्रा तालीम तरुण मंडळ व लोकमान्य संयुक्त गणेशोत्सव महामंडळाच्या मानाच्या श्री पणजोबा गणपतीची प्रतिष्ठापना मोठ्या भक्तिभावाने करण्यात आली. बुधवारी, पत्रा तालीम येथे मंडळाचे अध्यक्ष आदित्य घाडगे व महामंडळाचे अध्यक्ष दत्ता भोसले, बापू जाधव, प्रवीण इरकशेट्टी यांच्या हस्ते श्रींची विधिवत पूजा करण्यात आली. दरम्यान, मंडळाकडून २१ किलो चांदी श्रींच्या चरणी अर्पण करण्यात आली.



प्रतिवर्षी वर्षाप्रमाणे पत्रा तालीम युवक मंडळ व लोकमान्य संयुक्त गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक जल्लोषपूर्ण वातावरणात हजारो गणेश भक्तांच्या लेझीम ताफ्यासह संपन्न होणार आहे. वर्षभर मंडळाच्या वतीने वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येतात. पत्रा तालीमचा लेझीम ताफा पाहण्यासाठी गणेश भक्त सोलापूर शहर - जिल्ह्यासह महाराष्ट्रातून सोलापुरात आवर्जून दाखल होत असतात. गणेश विसर्जन मिरवणुकीचा आकर्षक देखावा पाहत मिरवणुकीत आनंदात सहभागी होत असतात. यावेळी पत्रा तालीमचे खलिफा पैलवान, दत्तात्रय कोलारकर, माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी परिवहन सभापती राजन जाधव, श्रीकांत घाडगे, मनोज गादेकर, राजेंद्र घुले, शिवाजी चव्हाण, ॲड. राम कदम, बापू जाधव, बापू धंगेकर, पैलवान अमर दुधाळ, दद्दु भोसले, बापू दुधाळ, उमाकांत घाडगे, शिवाजी घुले, उत्तम कोलारकर, पिंटू चव्हाण, पैलवान नवनाथ बन्ने, सचिन स्वामी देविदास घुले, प्रवीण इरकशेट्टी, सुहास कोलारकर, राहुल बनसोडे, ओंकार जाधव प्रसिद्धी प्रमुख वैभव गंगणे, मिरवणूक प्रमुख सौरभ कन्हेरी, कार्यालयीन प्रमुख प्रवीण जाधव, निशांत सावळे, जलपेश घुले, धनराज शिंदे, कपिल पवार, महेश जगदाळे, मयुरेश घाडगे, ओम घाडगे, किशोर गादेकर उपस्थित होते.

## वडीलांची एफडी मोड आणि माझे कर्ज फेड म्हणून विवाहितेचा छळ

**पतीसह पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

वडीलांची एफडी मोडून माझे कर्ज फेड असे म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबबात प्रणाली आदित्य पाखरे (वय २७, रा. शुक्रवार पेठ, लक्ष्मी मंदीरजवळ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती आदित्य, सासू जयश्री, सासरे राधेशाम, जाऊ शारदा, दीर अजिंक्य (सर्व रा. मंजुषा नगर, विकास नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रणाली या पती आदित्य याच्यासोबत २४ एप्रिल २०२४ ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सासरी नांदण्यास होत्या. त्या कालावधीत पती आदित्य व त्याच्या घरातील लोकांनी प्रणाली हिस तुझ्या म हेरच्यांनी आमचा लग्नात मानपान केला नाही, तुला स्वयंपाक येत नाही, तुझे खानदान चांगले नाही, तु लग्न करून आल्यापासून साडेसाती लागली आहे असे टोचून बोलून सतत तिचा अपमान केला. तसेच जाऊ शारदा हिच्या माहेरच्या लोकांनी आम्हांला भरपूर सोन्याचे दागिने घातले आहेत, तु तुझ्या आई-वडीलांकडून दागिने घेऊन ये असे म्हणून पती आदित्य याचे कर्ज फेडण्यासाठी तुझ्या वडीलांच्या नावावरील एफडी म ोडून ७ ते ८ लाख रुपये माहेरून घेऊन ये म्हणून प्रणालीला शिवीगाळ करून मारहाण केली आणि माहेरून हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राठोड तपास करीत आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - ११९२

**हे देह क्रिया आघवी । न करवितां होय बरवी ।**
**जैसा न चलवितेनि रवी । लोकु चाले ।।**

ज्ञानी माणसाला देहासक्ती नसल्याने सुख, दु:ख जाणवत नाहीत. भेद नांवाचा प्रकार त्याच्या ठिकाणी शिल्लक नसतो. सर्व विश्वात तो एक चैतन्यच पाहतो. हया चैतन्याच्या ठिकाणी तो व्यक्त आणि अव्यक्त असे पाहत नाही. सोन्याची लगड व सोन्याचे अलंकार वेगवेगळे दिसत असले तरी मुळात ते एक सोनेच असते. त्याप्रमाणे चैतन्य हे विश्वरुपाने नटले आहे आणि विश्वाचे विश्वत्व नष्ट झाले असता ते पुन्हा चैतन्य रुपच होणार असते याची जाण ज्ञानी व्यक्तिला असते. अर्थात चैतन्याला, जीवाला व विश्वाला ज्ञानी वेगळे पाहत नाही. पाटीवर लिहीलेली अक्षरे पुसली गेली तरी त्याचा अर्थ पुसला जात नाही. पाण्याच्या लाटा पाण्यापेक्षा वेगळया दिसत असल्या तरी मुळात पाणी व



लाटा भिन्न नसतात. त्याप्रमाणे विश्वात व चैतन्यात भिन्नता नसते हे ज्ञानी व्यक्तिला ज्ञात असते. देहात जे चैतन्य असते ते चैतन्य कोणत्याही क्रिया करीत नाही. देहाच्या क्रीया चालूच राहतात. दहा इंद्रियांचे मार्ग अनेक क्रियांच्या रुपाने वाहत राहतात. राजा झोपला तरी देशाचा लोकव्यवहार बंद पडत नसतो. प्रजा आपल्या इच्छेनुसार व्यवहार करीतच असते. त्याप्रमाणे बुध्दीची जाणण्याची क्रिया, इंद्रियांचे व्यापार, प्राणाचे स्पंदन होणे या क्रिया चैतन्याने, परमात्म्याने न करविता देखील होत राहतात. याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले,

**हे देह क्रिया आघवी । न करवितां होय बरवी ।**
**जैसा न चलवितेनि रवी । लोकु चाले ।।**

अर्थात सुर्याने न चालविताही त्याच्या प्रकाशात लोक सहज चालत राहतात. ज्ञानी पुरुषाला या सर्व गोष्टीचे ज्ञान असते, त्यामुळे त्याच्यात मी पणा शिल्लक राहत नाही. सुर्य चालत नाही किंवा लोकांना चालवत नाही, लोकच आपोआप सुर्याच्या प्रकाशात चालत राहतात. एवढाच अर्थ इथे अपेक्षीत नाही तर माऊलींचे भौगोलीक ज्ञान आपल्या लक्षात यायला पाहिजे. सुमारे सातशे वर्षापुर्वी माऊलींनी सुर्य स्थिर असल्याचे सांगीतले आहे. त्यांना जास्तीत जास्त अध्यात्मिक स्पष्टीकरण करावयाचे असल्याने ते भौगोलिक स्पष्टीकरणाकडे गेले नसावेत. ओघा-ओघाने जेवढे भौगोलिक स्पष्टीकरण देणे भाग पडले तेवढेच त्यांनी सांगीतले आहे. सुर्य जसा लोकव्यवहारात अडकत नाही तसे एकदा आत्मसुखात तल्लीन झालेला ज्ञानी पुन्हा संसारदु:खात अडकत नाही.. तापलेले पाणी थंड वा-यामुळे आपोआप थंड होते, सुर्यप्रकाश येताच अंधार आपोआप नष्ट होतो. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाच्या समोर मोह, स्वार्थ, चिंता, आल्या तरी त्याचे अस्तित्व आपोआप नष्ट होते. अग्नीत प्रविष्ट झालेले लाकुड अग्नीच होऊन जाते, तेव्हा त्यातील लाकूडपणा प्रयत्नानेही वेगळा करता येत नाही. प्रयत्नाअंती सुध्दा साखरेचा पुन्हा रस होत नाही. परिसाच्या स्पर्शाने एकदा लोखंडाचे सोने झाले की, पुन्हा त्याचे लोखंड होत नाही. दुधाचे दही, तूप केल्यास पुन्हा त्या दही, तुपाचे दूध होत नाही. हे सर्व जसे सत्य आहे, तसे आत्म ज्ञानी, आत्मसुखी माणसांचे आहे. ते एकदा या आत्मसुखाच्या, आत्मज्ञानाच्या, स्थिरतेच्या उच्चकोटी पदाला पोहचले की त्यांना कोठेही, कसलाही भेद दिसत नाही. आप-पर भाव त्यांच्या ठिकाणी शिल्लक राहत नाही. सर्वत्र सदा सम पाहण्याची त्यांची वृत्ती होऊन बसते.

**जय जय राम कृष्ण हरी।**
**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस, राष्ट्रीय क्रीडा दिन, सूर्यषष्ठी बलराम जयंती. |
| दि. २९ ऑगस्ट २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८२ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसु | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - भाद्रपद | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. षष्ठी (२०.२०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वर्षा | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - स्वाती (१९.३७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - ब्रह्मा (१४.११) | |
| करण - कौलव (०७.०८) | |

# अस्मिता आणि अस्तित्व सांभाळूनच विकास केला पाहिजे

### पद्मश्री चैत्राम पवार यांचे प्रतिपादन

### ‘समावेशक भारत, विकसित भारत’ यावर चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

‘विकास म्हणजे केवळ भौतिक बदल नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाचा समावेश असलेली प्रक्रिया आहे. यासाठी प्रथम समाज संघटीत करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी आपल्या कृतीमध्ये विश्वास व पारदर्शकता असली पाहिजे.’ असे उद्गार पद्मश्री चैत्राम पवार यांनी एम आयटी विश्वप्रयाग विद्यापीठात आयोजित ‘समावेशक भारत, विकसित भारत’ या चर्चासत्रात काढले. ग्रामीण विकास, शाश्वत शेती, जलसंधारण आणि समाज सक्षमीकरण या विषयांवर बोलताना, ‘विकास हा अस्मिता व अस्तित्व सांभाळूनच केला पाहिजे आणि शाश्वत विकासासाठी युवकांनी स्थानिक संसाधनांचा आधार घ्यावा’ असे मत पवार यांनी यावेळी व्यक्त केले.




धुळे जिल्ह्यातील बारीपाडा गावाचा उल्लेख करताना पवार यांनी सांगितले की, एकेकाळी शिक्षण व आरोग्य सुविधांच्या अभावामुळे मागासलेले, अन्न-पाण्यासाठी भटकंती करणारे आणि दारिद्र्य व व्यसनाधीनतेच्या विळख्यात असलेले हे गाव आज हजारो एकर हिरव्यागार जंगलासह जलसंपन्नता आणि स्वावलंबनाचे आदर्श उदाहरण बनले आहे. यामागे सामूहिक श्रम, व्यसनमुक्ती चळवळ, जंगल संवर्धन आणि महिलांसाठी रोजगारनिर्मिती अशा अनेक उपक्रमांचा मोठा वाटा आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी म्हणाले, ’एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. पद्मश्री पवार यांसारख्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांनी शिकावे तसेच ‘सर्व समावेशक विकास’ ही संकल्पना त्यांच्यामध्ये रुजावी हेच आमचे ध्येय आहे.’ प्रा. राहुल दामजी व गायत्री गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले तर माधव देशपांडे यांनी पवार यांच्याशी संवाद साधला. यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पद्मश्री पवार यांनी १९९१-९२ मध्ये रामायण मालिकेच्या प्रक्षेपणातून ग्राम स्थांना एकत्र आणून व्यसनमुक्तीची चळवळ उभारली. पुढे ११०० एकर जंगल संवर्धन, जलसंधारण, लघुबंधारे, फेरपालट पिकपद्धती आदी प्रयोगांतून गाव प्रगतिपथावर आले. जण, जंगल, जल, जमीन आणि जनावर - या पाच ज घटकांवर आधारित विकास त्यांनी घडवून दाखविला. महिलांना स्वावलंबनाचा मार्ग दाखवण्यासाठी मोहाच्या फुलांपासून प्रथिनयुक्त मनुके, चॉकलेट, साबण, मॉइश्चरायझर इ. उत्पादने तयार करण्याचा अभिनव प्रयोग राबवला. याशिवाय ‘वनभाजी महोत्सव’ व ‘डोंगरपूजा’ सारख्या उपक्रमांमुळे महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील बारीपाडा हे गाव संपूर्ण देशात नावारूपास आले आहे.

# डीजेमुक्त सोलापूरसाठी मिस कॉल द्या

### वीरशैव व्हिजन व डीजेमुक्त सोलापूर कृती समितीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

डीजेच्या आजारपणातून सोलापूरला बरे करण्यासाठी फक्त एक मिस कॉल देण्याची हाक समस्त सोलापूरकरांना वीरशैव व्हिजन व डीजेमुक्त सोलापूर कृती समितीच्या वतीने देण्यात आल्याची माहिती वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले व कृती समितीचे अध्यक्ष ड. धनंजय माने यांनी पत्रकार परिषदेत दिली. सध्या सोलापुरात नोकरी रोजगाराच्या संधी अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे परिणामी सोलापुरातील तरुण पुणे, मुंबई, बंगळूर अशा मोठ्या शहरात कायमस्वरूपी स्थलांतरित होत आहेत. हे रोखण्याची अत्यंत आवश्यकता असलेल्या काळात सोलापुरात विधायक कार्याऐवजी, पारंपरिक वाद्यांऐवजी तरुणांना डॉल्बी डीजेची आवड लागली आहे.

यामुळे सोलापूर डीजे मुक्त व्हावे अशी सामान्य जनतेची इच्छा आहे. त्यांची इच्छा मिस कॉलच्या रूपात आमच्यापर्यंत पोहोचेल. जितक्या नागरिकांकडून मिस कॉल येतील तेवढी संख्या पोलीस आयुक्तांना निवेदनाद्वारे देण्यात येऊन डीजे बंदीची मागणी करण्यात येणार आहे. या उपक्रमाला वेकअप सोलापूर डिजिटल मॅगझीनचे संचालक राहुल शेटे यांचे सहकार्य लाभले आहे. कॉल केल्यानंतर मेसेज येणार आहे. याकरिता ज्यांचा डीजेला विरोध आहे त्यांनी ९१६८७२९७२९ या या क्रमांकावर मिस कॉल द्यावा असे आवाहन वीरशैव व्हिजन व डीजे मुक्त कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस डीजे मुक्त कृती समितीचे सदस्य असीम सिंदगी, कौस्तुभ करवा, वेकअप सोलापूरचे राहुल शेटे, वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, सोशल मीडिया प्रमुख अमित कलशेट्टी, धानेश सावळगी, सोमनाथ चौधरी उपस्थित होते.



# वक्तृत्व स्पर्धेत प्रिती बगले प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात शहीद लेफ्टनंट दत्तात्रय पुजारी यांचे स्मरणार्थ मराठी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ एम. एन. जगताप हे होते. या स्पर्धेसाठी सोलापूर आकाशवाणीचे अनंत पुजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अनंत पुजारी यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. स्पर्धेत प्रिती बगले हिने प्रथम, मंजुळा खुटाळे हिने द्वितीय, ऐश्वर्या बिराजदार हिने तृतीय तर सदफ शेख हिने चतुर्थ क्रमांक पटकावला. विजेत्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा डॉ. जवाहर मोरे यांनी केले. परीक्षक म्हणून प्रा डॉ डी.के. देडे व श्रीमती डॉ. बी.एस. कोरे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. लतिका कट्टिमनी यांनी केले तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. एच. एल. जाधव यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करणायासाठी एस. ए. निंबर्गी व प्रा. विजय साळवे यांनी परिश्रम घेतले.

# गणेशोत्सव, ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर वेळापूर पोलिसांचा रूट मार्च



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २८ ऑगस्ट-**

आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण व्हावा यासाठी वेळापूर पोलिसांकडून रूट मार्च काढण्यात आला.

हा रूट मार्च मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता वेळापूर पोलीस स्टेशन येथून सुरू झाला. पोलीस स्टेशन-पालखी चौक-एसटी स्टॅन्ड-अण्णाभाऊ साठे पुतळा-शाही मदिना मस्जिद रोड-व्यापारी पेठ-तलाठी कार्यालय-ग्रामपंचायत कार्यालय-सांगोला रोड-महादेव मंदिर-तेथून पुन्हा पोलीस स्टेशन असा मार्ग ठरविण्यात आला होता. सदर रूट मार्च अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यामध्ये सपोनि विक्रम साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक आकाश शेळके, तसेच वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक, पोलीस अंमलदार, पोलीस पथक व होमगार्ड अशा एकूण ३० पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. रूट मार्चदरम्यान नागरिकांमध्ये उत्सव काळ शांततेत आणि सुरक्षिततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.

### साखर पेठेतून २० हजारांची दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

शहरातील साखर पेठेत असलेल्या विद्यानिकेतन शाळेच्या बाजूला पार्क केलेली २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत नागरात व्यंकटस्वामी श्रीराममोज (वय ४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागराज श्रीराममोज यांना त्यांची एम एच १३ डीबी ९७४४ क्रमांकाची दुचाकी ही २६ ऑगस्ट रोजी घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.



# निशा अबॅकस शाखा-अराईज स्कूलचे राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

हत्तुरे वस्ती येथील निशा अबॅकस शाखा-अराईज इंग्लिश मीडियम स्कूलचे राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत २०२५-२६ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. प्रथम क्रमांक विश्वजीत सोलापुरे (चॅम्पियन ऑफ चॅम्पियन), प्राची वाघमारे (सीओसी), वेदांत पडसलगी (सीओसी), द्वितीय क्रमांक ईश्वरी स्वामी, भावेश माळी, तृतीय क्रमांक रिदम पाटील, प्रथम आणि तृतीय क्रमांक वैष्णवी शावरी मिळवले आहे. संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार हत्तुरे व शिक्षिका अर्चना नडगिरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# राष्ट्रवादी पक्षाकडून मान्यवरांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ ऑगस्ट-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने राजकीय, सामाजिक, प्रशासकीय क्षेत्रात सर्वसामान्य नागरिकांसाठी काम करण्याची संधी मिळालेल्या तसेच क्रीडा क्षेत्रात यश मिळवलेल्या मान्यवर मंडळींचा सत्कार सोहळा उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते व शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष समाधान फाटे यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथील येथे झाला.



पंढरपूर शहर व ग्रामीण भागातील विविध कर्तृत्ववान मान्यवरांनी संघटनांच्या पदावर निवड होऊन कार्यभार स्वीकारला आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. याप्रसंगी संभाजी ब्रिगेड केंद्रीय कार्यकारणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल किरणराज घाडगे यांचा सत्कार करण्यात आला तसेच नूतन संभाजी ब्रिगेड पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्ष बाळासाहेब बागल, आष्टी तालुका मोहोळ विविध कार्यकारी विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन धनंजय गुंड, महाराष्ट्र पोलिस कोल्हापूर विभाग गणेश मोरे, एलएलबी मध्ये उत्तम यश मिळवल्याबद्दल महादेव बागल, एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी शासकीय निवड झाल्याबद्दल सृष्टी नितीन बागल, एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी शासकीय निवड झाल्याबद्दल सुरेश गळवे, तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल श्रद्धा मेलगे, खेड भाळवणी येथे नूतन सरपंच संतोष साळुंखे, खेड भाळवणी येथे उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल लक्ष्मण साळुंखे यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी किरण घाडगे, बाळासाहेब बागल, महादेव बागल, डॉ. मस्के आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी डॉ. रमेश फाटे, संजय बागल, शांतिनाथ बागल, संतोष गुंड, बापू मलगे, नितीन बागल, मोहन गुजर, शुभम फाटे, शशांक फाटे, संतोष पुणेकर, ओंकार कथले, समाधान बागल, ऋषिकेश बागल, समाधान कांबळे, किशोर नपते उपस्थित होते.

# मुराराजी पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

शहरातील मुरारजी पेठ परिसरातून १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली.

याबाबत पवन गुलाब खांडेकर (वय ३१, रा. मुरारजी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पवन खांडेकर यांनी त्यांची एमएच १३ एजी ४४३५ क्रमांकाची दुचाही ही घरासमोर पार्क केली होती. ६ जूनच्या रात्री ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस नाईक भद्रशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

# मुळेगाव रोडवर खड्डेमय रस्ता; नागरिकांची दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

मुळेगाव रोड टर्न येथील एलपीजी पेट्रोल पंप ते बिस्मिल्ला नगर या दरम्यानचा रस्ता अत्यंत खड्डेमय व धोकादायक झालेला आहे. या रस्त्यावरून दररोज ये-जा करणाऱ्या नागरिकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.




स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्यावरून ग्रामीण भागाशी संपर्क होतो. त्यामुळे शेतकरी, शाळकरी विद्यार्थी तसेच कामानिमित्त रोज या मार्गाने प्रवास करणारे प्रवासी मोठ्या संख्येने जातात. याशिवाय वाहनांची वर्दळही मोठी असल्याने अपघात होण्याची शक्यता कायम आहे. पावसाळ्यानंतर या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने दुचाकी, चारचाकी व मालवाहतूक वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा लहानसहान अपघात घडल्याचेही निदर्शनास आले आहे. मुळेगाव रोड हा हैद्रबाद रोडवर महत्त्वाचा संपर्क मार्ग असल्याने तात्काळ दुरुस्ती करावा, अशी मागणी तेथील स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

# लहान मुलांच्या भांडणावरून महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

लहान मुलांच्या भांडणाच्या कारणावरून महिलेस मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत सोनाली अजय आंबेवाले (वय २०, रा. महाराणा प्रताप नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फियादीवरुन राज सुरज चौधरी, राजा सत्तारवाले, चुम्मा सत्तारवाले (रा. महाराणा प्रताप नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ ऑगस्ट रोजी साडेआठच्या सुमारास सोनाली आंबेवाले या घरी होत्या. त्यावेळी राज चौधरी व त्याच्या साथीदारांनी लहान मुलांच्या भांडणावरून तसेच मागील झालेल्या भांडणावरून राग मनात धरून सोनाली आंबेवाले व त्यांची सासू गंगा हिस हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. तसेच राज चौधरी याने त्याच्या हातात दगड घेऊन सोनाली यांच्या डोक्यात मारून जखमी केले. म्हणून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

# अखेर टप्पा वाढसाठी शाळांना अनुदान मंजूर

### शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी १ ऑगस्टपासून टप्पा अनुदान मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

राज्यातील अशंतः अनुदानित शाळांना टप्पा प्रमाणे अनुदान वितरीत केले जाणार आहे. शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे १४०० कोटी रुपये मागितले आहेत. १९९८-९९ पासून सुरू असलेल्या अनेक शाळा अजूनही ६० ते ८० टक्के अनुदानाच्या टप्प्यावर आहेत. त्या शाळांमधील शिक्षक आता सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत, तरीदेखील त्यांना पूर्ण पगार मिळाले नाही. आता वाढीव अनुदानानुसार ऑगस्ट पेड सप्टेंबरचा पगार मिळेल, अशी सर्वांना आशा आहे.



यापूर्वी विनाअनुदानित शाळांच्या नैसर्गिक टप्पा अनुदानासंदर्भात अनेक शासन निर्णय निघाले, पण त्यानुसार कार्यवाही झाली नाही. तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनीही दरवर्षी २० टक्के अनुदान देण्याचे आश्वासित केले, मात्र शालेय शिक्षण मंत्री बदलले आणि ते अश्वासन कागदावरच राहिले. त्यामुळे पावसाळी अधिवेशन सुरू होताच शिक्षकांनी मुंबईचे आझाद मैदान गाठले होते.

> राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांनी अनेक वर्षे तुटपुंज्या पगारावर काम करत होते. आता अनुदान देण्यात येत आहे यामुळे उशीरा पण न्याय मिळाला. यापुढे शासनाने नैसर्गिकरीत्या दरवर्षी टप्पा वाढ अनुदान देणे अपेक्षित आहे. आत्ता अनुदान मंजूर झाले असल्यामुळे हजारो शिक्षकांना न्याय मिळाला आहे.
>
> **- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष**
> **स्पर्धा परीक्षा तथा डिएड बीएड असोसिएशन, महाराष्ट्र राज्य.**

### आझाद मैदानावरील मोर्चाचा प्रभाव

आंदोलनाची दखल घेऊन शालेय शिक्षणमंत्र्यांनी अधिवेशनात ग्वाही दिली आणि आंदोलन थांबले. आता चालू महिन्याची पगार बिले कोषागार कार्यालयात गेली असून शिक्षकांचा पगार २ ऑगस्टपर्यंत होईल. त्यानंतर ऑगस्टचा पगार ज्यावेळी सप्टेंबरमध्ये होईल, त्यात २० टक्के वाढीव टप्पा अनुदान असेल, असे वरिष्ठांनी सांगितले.यावेळी राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर संघटनाने प्रयत्न केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शंभर कंत्राटी विशेष शिक्षकांचे समायोजन

- समग्र शिक्षण कंत्राटी शिक्षकांना केंद्रस्तरीय नियुक्ती
- दिव्यांगाना मिळणार आता पूर्णवेळ शिक्षक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट ..**

जिल्हा परिषद, महापालिका अंतर्गत कार्यरत १०० कंत्राटी विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. या प्रक्रीयामुळे जिल्ह्यातील ६ हजार ६५५ पेक्षा अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांना आता प्रशिक्षित, पूर्णवेळ शिक्षक मिळणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या उपस्थितीत समायोजनाची प्रक्रीया पार पडली.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, महापालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे उपस्थित होते. मागील २१ वर्षांपासून अवघ्या २० हजार रुपये मानधनावर काम करणाऱ्या १०० शिक्षकांचे पारदर्शक पद्धतीने समायोजन झाल्याने संघर्ष आणि सचोटीला न्याय मिळाल्याची भावना त्या शिक्षकांनी व्यक्त केली. या समायोजनामुळे जिल्ह्यातील ६,६५५ पेक्षा अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांना आता प्रशिक्षित, पूर्णवेळ शिक्षक मिळणार आहेत.

### सीईओंच्या हस्ते नियुक्तीपत्र

समायोजित शिक्षकांची नियुक्ती आदेशाची मुख्यप्रत, स्वाक्षरी करून द्यावयाची प्रत एकत्रित नव्हती. तसेच, निवड यादीतील नावाप्रमाणे नावं नसल्यामुळे थोडा वेळ लागत असल्यामुळे दुसऱ्या नियोजीत बैठकीस जाऊन येतो, असे सांगून सीईओ त्यांच्या दालनातील बैठकीसाठी गेले होते. व्यवस्थित नावाच्या यादीनुसार नियुक्ती आदेश तयार झाल्यानंतर सीईओंच्या हस्ते सर्वांना त्याचे वितरण झाले.

**- शिक्षणाधिकारी, प्राथमिक**



### समायोजन प्रक्रियेत नियोजन अभाव, सीईओ संतप्त

शिक्षण विभागाने आयोजिलेल्या समायोजन प्रक्रियेत नियोजन, समन्वयाचा अभाव दिसून आला. यादीतील नावानुसार शिक्षकांना केंद्रस्तरीय नियुक्ती आदेशाची मूळप्रत सापडत नसल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम संताप व्यक्त करीत सभागृहातून निघून गेले. समायोजित शिक्षकांची संपूर्ण फाईल एकत्रित केल्यानंतर शिक्षणाधिकारी शेख तुटीची पूर्तता झाली असून कार्यक्रमास येण्याची विनंती केल्यानंतर जंगम पुन्हा आले. दरम्यान, शिक्षण विभागाच्या ढिसाळ कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.

## महत्वाचे...




## प्रा. झोळ यांनी दोन मंत्र्यांना दिले मागण्यांचे निवेदन

**करमाळा, दि.२८ ऑगस्ट-**

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व बहुजन कल्याण विकास मंत्री अतुल सावे यांना दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,भाजपा नेते रामदास झोळ यांनी नुकतेच निवेदन दिले. यामध्ये पंजाबराव देशमुख वस्तीग्रह निर्वाह भत्ता ही योजना खुला प्रवर्ग, इबीसी प्रवर्ग, एसईबीसी तसेच ई डब्ल्यू एस च्या विद्यार्थ्यांना शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागासाठी सरसकट लागू आहे. तसेच त्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ही आठ लाख रुपये एवढी आहे. याचप्रमाणे ओबीसी, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आहे परंतु ही योजना फक्त शहरी भागाकरता असून उत्पन्नाची अट अडीच लाख रुपये एवढी आहे आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी फक्त ६०० विद्यार्थ्यांनाच याचा लाभ देण्याची मर्यादा आहे. त्याचबरोबर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना आहे परंतु ही योजनाही फक्त शहरी भागांसाठीच लागू असून उत्पन्नाची अट अडीच लाख रुपये एवढी आहे. या तीनही योजनेमधील फरक पाहता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले योजनेमध्ये उत्पन्नाची अट अडीच लाखावरून आठ लाख रुपये करावी तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही याचा लाभ मिळावा. असे निवेदन प्रा.झोळ यांनी दिले आहे.

## चौडेश्वरी देवीच्या श्रावणमास भजन मंडळ समाप्ती निमित्त शुक्रवारी पालखी मिरवणूक

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील हटगार कोष्टी समाजाची आराध्य दैवता वळसंगची ग्रामदैवता श्री रामलिंग चौडेश्वरी देवी श्रावण मास भजन मंडळ समाप्ती निमित्त दिनांक २९ ऑगस्ट रोजी शुक्रवार सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्री चौडेश्वरी देवीची पालखी मिरवणूक आणि वळसंग पंचक्रोशीतील भक्तांसाठी महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या बारा वर्षापासून वळसंग येथील श्री सिद्धारूढ कलेक्शन यांच्या वतीनं खैराटे परिवाराच्या माध्यमातून महाप्रसादाची अखंड सेवा बजावीत आहेत किमान वळसंग पंचक्रोशीतील दहा ते पंधरा हजार भाविकांसाठी महाप्रसादाची सोय ते करीत असतात तरी या सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे आपण या सोहळ्यात सहभागी व्हावे असे आव्हान एस आर सी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नागराज उर्फ आप्पा कोंडे यांनी केले आहे.



## मोरवड तंटामुक्त समिती अध्यक्षपदी बापू दिवटे यांची पुनर्निवड

**करमाळा, दि.२८ ऑगस्ट-**

मोरवड (ता. करमाळा) येथील तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी बापू दिवटे यांची पुनर्निवड करण्यात आली. मागील कार्यकाळात त्यांनी दाखविलेली कामगिरी, न्यायनिष्ठ भूमिका आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती लक्षात घेऊन ग्रामस्थांनी त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला. गेल्या कार्यकाळात बापू दिवटे यांनी गावातील छोटे-मोठे वाद, जमिनी संबंधित वाद, कुटुंबीयांतील मतभेद अशा अनेक प्रकरणांचे शांततेत व समेटातून निवारण केले. गावात सौहार्दाचे वातावरण निर्माण करून तंटामुक्त गाव या संकल्पनेला खरी दिशा दिली. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामस्थांमध्ये परस्पर विश्वास वाढला आणि गावात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून नुकत्याच झालेल्या सभेत त्यांची सर्वानुमते पुन्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडीनंतर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

## पिलीव अनेक जनावरांना लंपीची लागण; काही जनावरे दगावली

**पिलीव, दि. २८ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात अनेक जनावरांना लंपीची लागण झाली असून यातील काही जनावरे बरी झाली मात्र अनेक जनावरे दगावली आहेत. येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे पशुवैद्यकीय सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. पिलीव, सुळेवाडी, झिंजेवस्ती या तीन गावांचा समावेश येथील दपवाखान्यअंतर्गत होतो. सध्या पिलीव परीसरात फक्त तीन जनावरांना लंपीची लागण झाली आहे अशी माहीती याठिकाणी असणाऱ्या प्रभारी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितली. २०२२-२३ मध्ये जसा लंपीचा प्रादुर्भाव होता तसा सध्या नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे. येथील प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी असो वा तालुका पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे मयत जनावरे किंवा लंपीग्रस्त जनावरांची खरी नोंद नसल्याचे शेतकऱ्यांतून बोलले जात आहे.

## गुळपोळी पोलीस पाटलास मारहाण करुन चौघांनी तांदळाचे कट्टे पळवले

**बार्शी, दि. २८ ऑगस्ट-**

गुळपोळी गावामधील स्वस्त धान्य दुकानाचे कुलूप तोडून पोलीस पाटलास मारहाण करुन तांदळाचे कट्टे घेऊन गेले. याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवार रोजी घडली. याबाबत पोलीस पाटील बाळकृष्ण पिसे (वय ३८, रा. गुळपोळी, ता. बार्शी) यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी निशिकांत विजय चिकणे, प्रशांत श्रीधर मचाले, धन्यकुमार शिवाजी चिकणे, सिराज युनूस शेख (सर्व रा. गुळपोळी, ता. बार्शी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## न्यू पाच्छा पेठेत लाखाची घरफोडी

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

न्यू पाच्छा पेठेतील पाथरूट चौकात एक लाखांची घरफोडी झाली आहे. याबाबत आनंद केशव मुदगल (वय ४३, रा. न्यू पाच्छा पेठ, पाथरूट चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुदगल हे २४ ऑगस्ट रोजी सायंकाळी घरी असताना त्यांच्या घराच्या गच्चीवरील उघड्या असलेल्या दारातून चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश केला. आणि बेडरूममधील दोन पात्याच्या लोखंडी कपाटातील रोख १ लाख रुपये चोरून नेले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुलांमधील जिज्ञासा संपत चालली आहे : हभप देशमुख

- तांदुळवाडीत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ ऑगस्ट-**



आधुनिकतेच्या काळात मुलांमधील जिज्ञासा संपत चालली आहे. विद्यार्थी दशेतील मुलांना सतत प्रश्न पडले पाहिजेत. प्रश्न शोध घेण्याला कारणीभूत असतात. आणि शोधानेच प्रगती होते असे प्रतिपादन प्रख्यात वक्ते हभप धैर्यशीलभाऊ देशमुख यांनी केले.

वै. ह. भ. प. सुखदेव शिंदे यांच्या ८८ व्या जयंतीनिमित्त हनुमान हायस्कुल व ज्यु. कॉलेज, तांदुळवाडी, (ता. माळशिरस) येथे आयोजित राजस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी हभप देशमुख बोलत होते. यावेळी मिलिंद शिंदे, शिवाजी दुधाट, दत्तात्रय उघडे, विजय पवार, अभिमान मिले, शशिकांत कदम, ज्ञानेश्वर उघडे, बाळकृष्ण कारंडे, बापूसाहेब काकडे, सोपान काकडे, गजेंद्र मिले, मुख्याध्यापक देवकर, मुख्याध्यापिका अनिता कदम उपस्थित होते. जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या शिबिरात ५४ जणांनी रक्तदान केले. मुलींसाठी सायकल बँकेची स्थापना करण्यात आली. परिसरातील दानशूर व्यक्तींनी या बँकेला ११ सायकल भेट दिल्या.

विठ्ठल साळूंखे यांनी प्रस्ताविक केले. वक्तृत्व स्पर्धेच्या इ. १ ली ते ५ वी गटामध्ये (प्रथम ते पाच क्रमांक) इरीना पठाण, यशवंतनगर, आरोही दुधाट, व सार्थक कुलकर्णी, सातारा, गार्गी कडीले, वडूज, सदफ शेख, अकलूज व प्रणिती जाधवर, वडूज, नंदतनुज ढेकळे, डोकेवाडी. ५ वी ते ७ वी गटामध्ये संस्कृती बेहेरे, सांगोला, कुणाल संकुडे, सातारा, जोतिरादित्य जाधव, लाखेवाडी, गाथा मिले, तांदुळवाडी, समृद्धी मगर, चांदापुरी, ८ वी ते १० वी गटात प्रणव जाधव, दुधोंडी, अनुष्का कुलकर्णी, सातारा, मनराज कारंडे, श्रीपूर, शुभम आसबे, पंढरपूर, जेबा शिकलगार, माळशिरस, महाविद्यालयीन खुल्या गटात संकेत पाटील, गडहिंग्लज, भारती मोटे, मेथवडे, गौरी बोडरे, अकलूज, सानवी वालवेकर, सोलापूर, मोनाली पाटील, पंढरपूर यांनी यश मिळवले. स्पर्धेचे हे १६ वे वर्ष आहे. परीक्षक म्हणून प्रा. उत्तम सावंत, डॉ. चंद्रकांत साळुंखे, प्रा. औदुंबर बुधावले, शशिकांत तेरखेडकर, समाधान काळे, संजय दुपडे, रमेश गायकवाड, विठ्ठल राजगुरू यांनी काम पाहिले.

## सोलापूरकरांच्या कलाकारांना दिल्लीकरांची दाद




- विराज जोशी यांच्या अभंगवाणीत कार्यक्रमात साथसंगत

**करकंब, दि. २८ ऑगस्ट-**

दिल्लीच्या सार्वजनिक गणेशोत्सव समिती गुरुग्रामच्या गणेशोत्सवात यंदा सांस्कृतिक कार्यक्रमामधील पहिलं पुष्प भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांचे सुमधुर, सुश्राव्य अभंगवाणीने गुंफले. या अभंगवाणीसह साथसंगत करणारे सोलापूरच्या कलाकारांना दिल्लीकरांनी उत्तम दाद दिली.

कार्यक्रमाची सुरूवात पं. भिमसेन जोशी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी विराज जोशी, अतुल मोघे, संतोष कुलकर्णी, ज्ञानेश्वर दुधाणे, स्वराज कुलकर्णी आदी उपस्थित होते. शास्त्रीय गायनाची सुरूवात राग पूरीया कल्याणने झाली. नंतर भिमसेन जोशी यांनी अजरामर केलेले अभंग त्यामध्ये वंदीन अयोध्येचा राजा, नामाचा गजर, काया ही पंढरी आत्मा पांडुरंग, माझे माहेर पंढरी, खास दिल्लीकरांच्या आग्रहाने भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, तिर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल आदी अभंग गात विठूरायाच्या जयजयकाराने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यांना सुंदर साथसंगत हार्मोनियम संतोष कुलकर्णी, तबला स्वराज कुलकर्णी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ मैत्रेय कुलकर्णी तर सुंदर निवेदन अतुल मोघे यांनी केले.

भारतरत्न भिमसेन जोशी यांचा चाहतावर्ग अधिक असल्याने त्यांचे नातू विराजचे अभंग ऐकायला गुरुग्रामकरांनी उदंड प्रतिसाद दिला. संदीप जोशी, मंदार कुलकर्णी, सुजय विभूते, दिपक हरळ, आशिष ताले यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला. सार्वजनिक गणेशोत्सव समिती गुरूग्रामच्या वतीने विष्णु पाटिल, अविनाश जोशी,आर बी माढेकर, उल्हास भंगाळे या वरिष्ठ मंडळींचे मार्गदर्शन लाभले. समितीचे अध्यक्ष शांताराम उदागे, उपाध्यक्ष गंगाधर गुंडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## स्वेरी व कोरीयातील इंडियन चेंबर ऑफ कॉमर्समध्ये सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ ऑगस्ट-**

स्वेरीतील संशोधन व विकास विभागाला आणखी गती मिळण्यासाठी तसेच विद्यार्थी व सांस्कृतिक देवाण-घेवाण यासाठी स्वेरी व कोरीयातील इंडियन चेंबर ऑफ कॉमर्समध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे.

'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स इन कोरीया' चे चेअरमन तथा टीसीएस चे कोरियातील मुख्य अधिकारी रमेश अय्यर हा यानिमित्त येथे आले होते. या सामंजस्य करारावर श्री. अय्यर तसेच स्वेरीचे नूतन सचिव डॉ. सुरज रोंगे यांनी स्वाक्षरी केली. यावेळी माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वनाथ अय्यर, ॲड. दिनेश अय्यर, डॉ. रामदास बिरादार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, आदी उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, सामंजस्य करार समन्वयिका डॉ. नीता कुलकर्णी, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी या सामंजस्य कराराचे स्वागत केले. चेअरमन श्री अय्यर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी 'रिसर्च अँड इंटरनॅशनल ॲकडमीक्स'चे सल्लागार डॉ. दिनेश अंमळनेरकर हे होते. कोरीयामधील 'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स इन कोरीया' ही शैक्षणिक, सांस्कृतिक व व्यावसायिक सेवा पुरवणारी आणि तंत्रज्ञानात अनुभव असलेली संस्था आहे. या राष्ट्रीय दर्जाच्या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना भारतीय आणि कोरीयन विद्यापीठांमधील संयुक्त अभ्यासक्रम घेता येईल. कोरीयन भाषा, कौशल्य यांचा अभ्यास युवा पिढीला करता येईल. या सामंजस्य करारामुळे स्वेरी अंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांचा दर्जा आणखी सुधारण्यास मदत होणार आहे. मार्केटमध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना आपल्या विचारांतून समाजाचे प्रश्न देखील सोडवता आले पाहिजेत असे सांगून श्री. अय्यर यांनी चेंबर ऑफ कॉमर्सचे कार्य तसेच बिजनेस, आयडिया, भांडवल उभारणी याबाबतही मोलाची माहिती दिली. अध्यक्षस्थानावरून डॉ. अंमळनेरकर यांनी आपण सेवा देण्यात पुढे आहोत पण वस्तूंचे उत्पादन करण्याबाबत कमी पडतोय यासाठी संशोधनावर भर देण्याचे आवाहन केले.

## श्री चन्नय्या स्वामी मठात श्रावणमास समाप्ती कार्यक्रमाचे आयोजन

**वळसंग, दि. २८ ऑगस्ट-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे श्रावणमासनिमित्त महिनाभर चालू असलेल्या कार्यक्रमाचे सोमवार दि.१ सप्टेंबर रोजी श्री चन्नय्या स्वामी मठात विविध धार्मिक कार्यक्रमासह समाप्ती संपन्न होणार आहे.

दि.१ सप्टेंबर रोजी पहाटे ५ वाजल्यापासून श्री चन्नय्या स्वामी यांच्या मूर्ती लघुरुद्राभिषेक करण्यास सुरुवात होईल. नंतर नगारी व शंखनाद सह स्वामींचे नामस्मरण करण्यात येईल. विधिवत पूजा पुजारी नागय्या स्वामी यांच्या हस्ते होत आहे.



यावेळी उपाध्यक्ष अनिल शहापुरे, सचिव चंद्रशेखर केशट्टी, खजिनदार सचिन तडलगी,श्रीशैल भैरामडगी, बसवराज किणगी, शिवानंद घोडके, शिवबसप्पा कलशेट्टी, सोमशेखर केशट्टी, ग्रा.प.सदस्य विनोद सुरपुरे, पत्रकार कल्लय्या स्वामी उपस्थित होते.

## वेळापूर नगरीत गणरायाचे जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २८ ऑगस्ट-**



लाडक्या श्री गणरायाचे वेळापूर नगरीत घरोघरी आगमन झाले. येथील वेळापूर अर्धनारी नटेश्वराच्या नगरीत व परिसरात श्रींचे प्राणप्रतिष्ठा करून गणरायाचे स्वागत करण्यात आले. वेळापूर ग्रामपंचायत येथील श्री क्षेत्र महात्मा फुले गणेश उत्सव मंडळ येथे ही गणरायाचे भक्तिमय वातावरणात उत्साहात आगमन झाले. यावेळी प्रा. बलभीम काकुळे व सौ कीर्ती काकुळे यांच्या हस्ते विधीवत पूजा करण्यात आली.

यावेळी माजी जि.प. सदस्या सुनंदा फुले, मंडळाचे मार्गदर्शक व माजी उपसरपंच शंकरराव काकुळे, ॲड. दत्तात्रय राऊत, तुकाराम राऊत, चंद्रकांत क्षीरसागर, दिपक राऊत, राजकुमार शिंदे, सुरज माने-देशमुख, प्रा. तुकाराम अनंतकवळस, अभिजीत फुले, जयदीप फुले, मंडळाचे अध्यक्ष राजकुमार पोरे, कार्याध्यक्ष विलास राऊत, सचिव शंकर राऊत, सोमनाथ चांडोले, बापू भानवसे, उमेश भानवसे, नागेश क्षीरसागर, चंद्रकांत राऊत, गिरीश कुलकर्णी, पिनू काका देशपांडे, जब्बार मुलाणी, सुरेश भानवसे, पार्थ करमाळकर, प्रथमेश भानवसे, विनीत राऊत, सोन्या भानवसे उपस्थित होते. अर्धनारीनटेश्वर गणेशोत्सव मंडळ पोलीस स्टेशन परिसर, वेळापूर नवतरुण गणेश उत्सव मंडळ व्यापारी पेठ तलाठी कार्यालय, त्रिमूर्ती गणेश उत्सव मंडळ व्यापारपेठ वेळापूर, साई गणेश उत्सव मंडळ मारुती मंदिर जवळ वेळापूर, सिद्धिविनायक गणेशोत्सव मंडळ पालखी चौक वेळापूर, नवसाचा झिरप्या गणपती आदी ठिकाणी गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

## ग्रामीण जिल्हा पोलिस दलात अत्याधुनिक फॉरेन्सीक व्हॅन दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलात आता अत्याधुनिक अत्याधुनिक फॉरेन्सीक व्हॅन दाखल झाली असून या व्हॅनची पूजा विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.



महाराष्ट्र शासनाकडून गुन्ह्याच्या तपासामध्ये तपासी अंमलदार यांना वैज्ञानिक पुरावा अधिक चांगल्या पध्दतीने गोळा करून त्याचे परीक्षण करून तो आरोपीविरूध्द न्यायालयात सादर करता यावा यासाठी अत्याधुनिक फॉरेन्सीक व्हॅन पुरविण्यात आले आहेत. सोलापूर ग्रामीण दलास पुरविण्यात आलेल्या या फॉरेन्सीक व्हॅनचा उद्घाटन विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्या हस्ते सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे पार पडला. यावेळी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्परर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर उपस्थित होते.

तसेच या वाहनासोबत शासनाने ३ फॉरेन्सीक एक्सपर्ट, ३ सहायक, २ लॅब असीसीस्टंट, २ चालक असे मुनष्यबळ देखील पुरवले आहे. यावेळी उपअधिक्षक शिरीष हुंबे, पोलिस निरीक्षक संजय जगताप, न्यायसहायक तज्ञ सत्यम गाडे, निश्चय जुगल, राहूल शेवाळे तसेच अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

### शासनाकडून पुरविण्यात आलेल्या फोरेन्सीक व्हॅनमध्ये या सुविधा

- **ब्लड किट** - रक्त, रक्ताने माखलेले कपडे, रक्तमिश्रीत माती, रक्ताचे डाग उचलून पॅकींग करून देण्यासाठी.
- **एनडीपीएस किट** - अंमली पदार्थ कोणता आहे हे ओळखून त्याची माहिती देण्यासाठी.
- **फायर आर्म किट** - घटनास्थळावरील अग्नीशस्त्र, पुगळी व नमुने जप्त करणेसाठी.
- **कास्टिंग किट** - घटनास्थळावरील फुट प्रींट कास्टींग करून देण्यासाठी.
- **सायबर किट** - सायबर गुन्ह्यासंदर्भात डीव्हाईस जप्त, मोबाईल रीपोर्ट प्राप्त करण्यासाठी.
- **जनरल किट** - घटनास्थळावरील इतर भौतीक पुरावा शोधून ते पुराव्याकामी वापरण्यासाठी अशा एकूण ६ कीट आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पंढरपूर बस स्थानकावर दीड लाखांचे चैन लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पंढरपूर येथील बस स्थानकावर पुण्याच्या प्रवाशाच्या गळ्यातील दीड लाख रुपये किंमतीची ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरट्यांनी चोरून नेली. याबाबत विनायक तुळशीराम पन्हाळे (वय ५४, रा. पार्श्व रेसिडेन्सी, वंडर सिटीजवळ, कात्रज, पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ ऑगस्ट रोजी विनायक पन्हाळे हे पत्नीसोबत बेगमपूर येथील नातेवाईकाच्या लग्न समारंभासाठी आले होते. लग्न समारंभ संपवून पुणे येथे जाण्यासाठी पन्हाळे हे पंढरपूर येथील नविन बस स्थानकातील फलाट क्र. १४ वरती पंढरपूर ते स्वारगेट बस क्र. एमएच २० बीएल ४२६८ मध्ये चढत होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने पन्हाळे यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरून नेली. पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गोसावी तपास करीत आहेत.






## महत्त्वाचे



### पिलीव परीसरात गणेशोत्सवास उत्साहात प्रारंभ

**पिलीव दि २८ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व परीसरात गणेश मंडळांनी वाजत गाजत मिरवणूक काढून विधीवत पुजा करीत गणेशाची प्रतिष्ठापना केली. येथील बाजारपेठेत सकाळपासूनच गणेश मुर्ती खरेदी करणयासाठी मोठी गर्दी होती. सायंकाळी पाच वाजता वरुणराजाने जोरदार हजेरी लावली. पिलीव येथील सर्वच मंडळांनी ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत बाजारपेठेतुन मिरवणूका काढल्या. येथील सिद्धीविनायक गणेश मित्रमंडळाने बैलगाडीतुन गणेशाची मिरवणूक काढली. तर संग्राम गणेश मित्र मंडळ, अष्टविनायक गणेश मित्र मंडळ, महाराणा प्रताप गणेश मित्र मंडळ, व्यापारी प्रतिष्ठान मित्र मंडळाने लहान वारकऱ्यांच्या समवेत मिरवणूक काढली. नरसिंह प्रतिष्ठान, श्रीकृष्ण मित्र मंडळ यासह झिंजेवस्ती येथील सिद्धनाथ व महात्मा फूले मित्र मंडळ यांनी थाटामाटात व जल्लोषात मिरवणुक काढुन तसेच विधीवत पुजा करीत श्री ची प्रतिष्ठापना केली. यंदा जिल्हयासह पिलीव परीसरात सुद्धा डि जे मुक्त गणेशोत्सवाची घोषणा आहे.

### पत्नीला मारहाण; पतीसह तिघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २८ ऑगस्ट-**

पत्नीला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी पतीसह तिघांविरुध्द बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पल्लवी रविंद्र सोनवणे (वय ३४, रा. यशोदा पार्क, कासारवाडी रोड, बार्शी) या महिलेच्या फियादीवरुन रविंद्र सोनवणे, अपेक्षा राजकुमार देशमुख, अपेक्षाचे आई, भाऊ (सर्व रा. बार्शी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास पल्लवी सोनवणे या घरी जात होत्या. त्यावेळी सोनवणे यांच्या घरासमोर त्यांचा नवरा रवि सोनवणे, अपेक्षा देशमुख व तिची आई आणि भाऊ हे सर्वजण आले. त्यांनी पल्लवीला रविंद्रची बायको नाही व आमचे प्रेमसंबंध राहु दे असे म्हणून अपेक्षा देशमुख हिने पल्लवीला लाकडी काठीने पाठीवर, दोन्ही हातावर, डोक्यावर मारहाण केली. तसेच पल्लवीला जातीवाचक शिवीगाळ करून तु जर आमच्या विरोधात तक्रार दाखल केली तर तुझे हातपाय तोडू अशी धमकी दिली. तसेच पल्लवीचा नवरा रविंद्र व अपेक्षाची आई, भाऊनेदेखील शिवीगाळ करून मारहाण केली. म्हणून बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपअधिक्षक अशोक सायकर पुढील तपास करीत आहेत.



### मातृभूमी प्रतिष्ठानकडून १०० झाडांचे वृक्षारोपण

**वैराग, दि. २८ ऑगस्ट-**

गावात व परगावी राहणाऱ्या नागरिकांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या मातृभूमी प्रतिष्ठान मार्फत बार्शी तालुक्यातील यावली येथे नेहमीच विविध उपक्रम घेतले जातात. यामध्ये ओढा दुरुस्ती, शालेय विद्यार्थ्यांना मोफत साहित्य वाटप, अपघात झालेल्या कुटुंबाला आर्थिक मदत, व्याख्यानमाला असे उपक्रम राबवले जातात, विशेष म्हणजे या प्रतिष्ठान मध्ये पुणे, मुंबई येथे राहणारे गावातील नागरिक या प्रतिष्ठानमुळे गावासोबत नाळ जोडून आहेत, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नागनाथ काकडे, उपाध्यक्ष बाळासो कदम, सचिव श्रीहरी पाटील, खजिनदार सुधीर काकडे, सदस्य गोरख काकडे, सुनील काकडे व रघुनाथ सरवदे या सर्वांनी सुरु केलेल्या या प्रतिष्ठान मार्फत हे उपक्रम घेतले जातात. यावर्षी प्रतिष्ठानने विविध फळ व निसर्ग उपयोगी १०० झाडांचे वृक्षारोपण करून त्याचा संगोपनाची जबाबदारी घेतली असून शालेय विद्यार्थी पण यासाठी मदत करत आहेत.

### सिंहगड मध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानावर व्याख्यान संपन्न

**पंढरपूर, दि.२८ ऑगस्ट-**

कोर्टी (ता.पंढरपूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे आधुनिक माहिती तंत्रज्ञानातील प्रवाह या विषयावर डॉ. ए. सी. अडमुठे यांचे व्याख्यान झाले. यावेळी प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, विभाग प्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांच्या हस्ते डॉ. अठमुठे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अडमुठे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, क्लाऊड कॉम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्स, बिग डेटा आणि ब्लॉकचेन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर सखोल माहिती दिली. द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रा. पुनम गवळी यांनी सूत्रसंचालन केले,.डॉ. एस. व्ही. पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन झाले. प्राचार्य डॉ. के. जे. करांडे यांनी या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या उद्योगम ान्य कौशल्यांचा विकास होईल, तसेच त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोठा आधार मिळेल असे मत व्यक्त केले.

# डॉल्बी व डीजेच्या बंदीमुळे बार्शीकरांनी घेतला मोकळा श्वास

### गणरायाचे जल्लोषात व उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ ऑगस्ट-**

बार्शी शहर आणि तालुक्यात काल श्री गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने झाले. यंदा गणेशोत्सवाला विशेष रंगत आली आहे, कारण पोलीस प्रशासनाने डॉल्बी डीजे सिस्टमवर घातलेल्या कडक बंदीमुळे ध्वनी प्रदुषण आणि वीज पुरवठ्याच्या समस्यांवर नियंत्रण मिळाले आहे. यामुळे बार्शीकरांनी घेतला मोकळा श्वास तर व्यापारी, महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महावितरण यांच्यासह सर्व स्तरातून पोलीस प्रशासनाचे बार्शीकर कौतुक करत आहेत.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली बार्शी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत डॉल्बी डीजे सिस्टम बंद केली. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे आणि सहा. पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांनी स्थानिक आणि तालुका पातळीवर प्रभावी अंमलबजावणी करत हा निर्णय यशस्वी केला. यामुळे गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत त्रासदायक डीजेचा जोरदार आवाज नाहीसा झाला असून, भक्तांना शांततेत आणि आनंदात श्री गणरायाचे दर्शन घेता येत आहे. शहरातील वीज खंडित होण्याची समस्या संपली असून, व्यापाऱ्यांचे व्यवसाय सुरळीत चालू राहिले आहेत. दुकाने उघडून बसलेले व्यापारी आता आनंदाने आपला व्यवसाय करत आहेत.

या बंदीमुळे शहरातील ट्रॅफिक जामची समस्याही दूर झाली आहे. डॉल्बी डीजेमुळे रस्त्यांवर होणारी गर्दी आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा आता कमी झाल्या असून, गणेशोत्सवाच्या मिरवणुका सुरळीतपणे पार पडल्या पूर्वी डीजेमुळे रस्त्यावर गोंधळ होत असे, पण आता वाहतूक व्यवस्थित सुरु आहे आणि मिरवणुकीचा आनंद द्विगुणित झाला आहे, असे एका स्थानिक रिक्षाचालकाने सांगितले.



विशेषतः बार्शी तालुक्यातील महिला वर्ग आणि लहान मुलांनी या निर्णयाचे मनापासून स्वागत केले आहे. डॉल्बी डीजेच्या जोरदार आवाजामुळे लहान मुलांना अभ्यासात आणि झोपेत अडथळा येत होता तर महिलांना घरगुती कामे आणि दैनंदिन जीवनात त्रास सहन करावा लागत होता. आता आमच्या मुलांना शांततेत अभ्यास करता येतो आणि गणपती बाप्पांचे दर्शन घेताना आम्हालाही त्रास होत नाही. पोलीस प्रशासनाचे खूप खूप आभार, असे महिला वर्गातून बोलले जात आहे. लहान मुलांनीही पोलिसांचे कौतुक करत, आता रात्री शांत झोपता येते आणि गणपती बाप्पांचा उत्सव खूप मजेत साजरा होतोय, अशी भावना व्यक्त केली. महावितरणनेही या बंदीचे स्वागत केले आहे. डॉल्बी डीजे सिस्टममुळे कर्मचाऱ्यावर येणारा ताण कमी झाल्याने वीज पुरवठा स्थिर राहिला आहे. पोलीस प्रशासनाच्या या निर्णयामुळे आमच्या वीज यंत्रणेवरील ताण कमी झाला असून, गणेशोत्सवात नागरिकांना अखंडित वीज पुरवठा देणे शक्य झाले आहे. आम्ही पोलीस प्रशासनाचे आभार मानतो, असे महावितरणच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

## जिल्हयात ४ सप्टेंबर रोजी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सूट



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ ऑगस्ट -**

गणेशोत्सवातील नवव्या दिवशी दि. ४ सप्टेंबर रोजी ध्वनीची कायद्याने विहीत केलेली मर्यादा पाळून सकाळी ६.०० वाजलेपासून ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सुट जाहिर करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद जारी केला आहे

सोलापूर जिल्हयात गणपती उत्सवावेळी सुशोभिकरण व देखावे मोठ्या प्रमाणात नागरीकांकरीता दाखविण्यात येतात यामध्ये समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमाचे देखावे इत्यादीचे आयोजन करण्यात आलेले असते. सदरचे देखावे पाहण्यासाठी शेवटच्या तीन दिवसांत नागरीकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होत असते. बरेच नागरीक देखावे पाहण्यासाठी संध्याकाळी उशीराने घरातुन बाहेर पडत असतात त्यामुळे ०४ सप्टेंबर २०२५ रोजी सुशोभिकरणा व देखावे याकरीता ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर करणेस रात्री २२.०० वाजे पर्यंत ऐवजी रात्री २४.०० पर्यंत वाढ करण्यात आली.

सदरचा आदेश हा सोलापूर जिल्हयाचे हद्दीत लागू राहिल. दिनांक २७ ऑगस्ट रोजी ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ अन्वये देण्यात आलेली सुट या सुधारीत आदेशान्वये रद्द करत असून त्याऐवजी दि.०४ सप्टेंबर २०२५ रोजी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धन वापराकरिता जाहिर केली आहे. तथापी सदरची सुट शासनामार्फत घोषित शांतता क्षेत्रात लागू राहणार नाही. याची दक्षता सर्वांनी घ्यावी. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.




## ‘सह्याद्री’मध्ये ऑपरेशन सिंदूर देखावा

### गणेशाचे जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२८ ऑगस्ट-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे गणपती बाप्पा मोरया असा जयघोष करीत वाजतगाजत सर्वांचे आराध्य दैवत असलेल्या श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

प्रथमतः श्री गणेश बाप्पाची मूर्ती वाजतगाजत, ढोल, झांज ताश्याच्या गजरात, समूह नृत्य करत व लेझीम खेळत महाविद्यालयात आणण्यात आली. त्यानंतर श्री गणपती बाप्पाची विधिवत पूजा सृष्टी दिलीपकुमार इंगवले यांच्या हस्ते व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, नागरिक यांच्या उपस्थितीत झाली. विद्यार्थ्यांनी श्री गणेशाच्या प्रतिष्ठापनेसाठी जोरदार तयारी केली होती. त्यात आकर्षक स्टेज, रंगीबेरंगी सजावट, लक्ष्यवेधून घेणाऱ्या रांगोळ्या काढल्या होत्या. तसेच पहलगाम हल्ला व ऑपरेशन सिंदूर चित्रित करणारे पोस्टर्स व हुबेहूब प्रतिकृती विद्यार्थ्यांनी बनवले होते. त्यांचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले. हि गणपती सजावट पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दिलेल्या अचूक आणि प्रतीकात्मक लष्करी प्रतिक्रियेला म्हणजेच ऑपरेशन सिंदूरला तसेच निष्पाप जीव गम ावलेल्यांचे स्मरण करत होती. तसेच आपल्या सशस्त्र दलांच्या सामर्थ्याचा देखील सन्मान करत होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय सांस्कृतिक विभागाचे डॉ. एन.ए.तांबोळी, प्रा.ए.आर.पवार, तृतीय वर्ष बी.फार्मसी व द्वितीय वर्ष डी.फार्मसीचे विद्यार्थी यांचे योगदान लाभले.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्यावतीने गणेशोत्सव संगीत महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ ऑगस्ट-**

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या काळात गणेशोत्सव संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

येथील श्री संत तुकाराम भवन मध्ये दररोज सायंकाळी साडेसात ते दहा या वेळेत या संगीत म होत्सवातील कार्यक्रम सादर होणार आहेत, अशी माहिती मंदिर समि तीचे प्रभारी कार्यकारी अधिकारी तथा प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली. मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा तसेच प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगितले की, या संगीत महोत्सवा



मध्ये येत्या शुक्रवारी (दि.२९ ऑगस्ट) मुंबई येथील भाग्यश्री देशपांडे यांच्या शास्त्रीयगायन व भक्तीसंगीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या नंतर रविवारी (ता.३१ ऑगस्ट) पुणे येथील डॉ.भावार्थ देखणे यांचा नमो ज्ञानेश्वरा (एक सांगीतीक जीवनपट) कार्यक्रम होणार आहे. बुधवारी (दि.३ सप्टेंबर ) गुंजेगाव येथील प्रियंका क्षीरसागर यांचा अभंगरंग या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. पनवेल येथील श्रुती पाटील या गुरुवारी (दि.४ सप्टेंबर) बोलावा विठ्ठल हा कार्यक्रम सादर करणार आहेत. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी अर्थात शुक्रवारी (दि.५ सप्टेंबर) बेळगाव येथील रजत कुलकर्णी यांचे शास्त्रीय गायन व भक्तीसंगीत या कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. शहर परिसरातील रसिक श्रोत्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले आहे.

## एकता महिला मंचतर्फे सजावट स्पर्धेचे आयोजन

### मंच सदस्यांसह अन्य महिलांनाही आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२८ ऑगस्ट-**

बार्शी तालुका एकता महिला मंचातर्फे मंचच्या सदस्यांसाठी गौरी गणपती उत्सव सजावट स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त सदस्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मंचाच्यावतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या घरातील गौरी गणपती सजावटीचे २ फोटो व १ मिनिटाचा व्हिडिओ मो. ७२१८३३८००९ या व्हाट्सअप क्रमांका वर पाठवायचा आहे. फोटोच्या खाली स्पर्धकाचे नाव, पत्ता, आणि मोबाईल क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. या स्पर्धेसाठी १ ते २ सप्टेंबर रोजी फोटो आणि माहिती स्वीकारण्यात येणार आहे. स्पर्धेत बार्शी तालुक्यातील सदस्य व अन्य महिला सहभागी होऊ शकतात. त्यासाठी नाव नोंदणी आवश्यक असून अंतिम मुदत ३० ऑगस्टपर्यंत राहील. स्पर्धा १ व २ सप्टेंबर रोजी होईल तसेच गौरी गणपती स्पर्धेमध्ये एकता महिला मंच बोर्ड लावणे बंधनकारक राहील त्याशिवाय स्पर्धेमध्ये सहभागी केले जाणार नाही याची नोंद घ्यावी. प्रथम बक्षीस ५००० रुपये, द्वितीय बक्षीस ३००० रूपये आणि तृतीय बक्षीस २००० रु किमतीचे तसेच उत्तेजनार्थ ९ बक्षिसे ५०० रु किमतीचे,असणार आहेत. व्यसनमुक्ती या विषयावर एकपात्री किंवा ग्रुपने नाटके किंवा सामाजिक संदेश देणारे प्रदर्शन केल्या जाणाऱ्या सदस्यांना योग्य ते बक्षीस दिले जाईल. विशेष प्रायोजक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र जामगाव (ता. बार्शी) येथील डॉ. संदीप तांबारे हे लाभले आहेत. तरी बार्शी तालुक्यातील जास्तीत जास्त सदस्यांनी या स्पर्धेमध्ये व कार्यक्रमांम ध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे ठिकाण आयुष व्यसनमुक्ती केंद्र जामगाव (आ )ता.बार्शी, बुधवारी दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बक्षीस वितरण सोहळा संपन्न होणार आहे.तरी अधिक माहितीसाठी ७२१८३३००९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांनी केले आहे.

## अकलूज बनतय अमली तस्करीचे हब

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ ऑगस्ट-**

अकलूज शहराची ओळख एकेकाळी सहकार पंढरी अशी होती. सहकारी चळवळीच्या माध्यमातून निर्माण झालेली शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक प्रगती ही अकलूजची खरी ताकद आहे. मात्र, आज परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. अकलूज हे अमली पदार्थ तस्करीचे हब बनू लागले आहे, गांजासह विविध अंमली पदार्थांची खुलेआम विक्री, व या धंद्यांचे वाढते जाळे पाहता यामागे पोलीस प्रशासनातील अधिकारीच सामील आहेत का? याची चौकशी होणे गरजचे असून याबाबत वरिष्ठ पातळीवर याची तक्रार करणार असल्याचे अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी थेट पत्रकार परिषदेत अकलूज पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभा केले आहे.

अकलूज आणि परिसरात अमली पदार्थांच्या तस्करीमुळे गुन्हेगारी टोळ्या निर्माण होत असल्याचे चित्र आहे. गांजा विक्रीसह अवैध वाळू उपसा, मटका, आणि गुटखा विक्री बिनदिक्कतपणे सुरू आहे. स्थानिकांचा आरोप आहे की, पोलिसांच्या आशीर्वादाशिवाय हे धंदे एवढ्या मोठ्या प्रमाणात चालणे शक्य नाही. या विषयावर देखील खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी अवैध धंद्यात पोलिसांची भागीदारी आहे आणि याचे पुरावे गृहखात्याकडे योग्यवेळी सादर केले जातील असे स्पष्टपणे सांगितले. यापूर्वी आमदार उत्तमराव जानकर यांनीही विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करून अवैध धंद्याबाबत पोलिस प्रशासनालाच जबाबदार ठरवले होते.



अकलूजचे सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेची आपणास माहिती नसून याची माहिती घेऊन पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या व आलेल्या कारवाईबद्दल माहिती देऊ. **- संतोष वाळके,**
उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज

अंमली पदार्थांच्या व्यापारातून टोळ्या निर्माण होत आहेत, युवकांचे भवितव्य धोक्यात येत आहे आणि कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. पोलिस अधिकारीच या रॅकेटमध्ये भागीदार असतील तर मग कायदा सुव्यवस्था कोण राखणार? लोकप्रतिनिधींच्या तक्रारी असूनही जर कारवाई होत नसेल तर त्याम ागे यंत्रणेतील संगनमत असल्याचा संशय अधिकच गडद होतो.

मी अकलूज मध्ये चार्ज घेतल्यापासून २८ दारू दुकाने १४ जुगार अड्डे वाळू तस्करी तसेच तडीपारच्या केसेस केल्या आहेत याबाबत आपण वरिष्ठांशी म्हणजे डीवायएसपी साहेबांशी बोलावे असे पीआय उबाळे यांनी सांगितले.